शहा-शिवाजी.

(गद्यपद्यात्मक नाटक.)

लेखक व प्रकाशक,

यशवंत नारायण टिपणीस,

...हण, राज्यारोहण, मत्स्यगंधा, कमला, राधामाधव, जरासंध,
पुण्याचा-मार्ग, गुरुचरणीं-इ० नाटकांचा कर्ता.

आवृत्ती पहिली प्रती ५०००.

किंमत १ रुपाया.

शहा-शिवाजी नाटकाच्या पहिल्या प्रयोगांत काम करणाऱ्या नटांची व नेपथ्यरचनाकारांचीं नांवें:—

शिवाजी—श्री. केशवराव भोंसले.

सईबाई—श्री. शंकरराव नीळकंठ चाफेकर.

शहाजी—श्री. दत्तोपंत भोंसले.

जिजाबाई—श्री. रघुनाथराव शितूत

तुकाबाई—श्री. व्यंकटेश ब. पेंढारकर.

बाजी घोरपडे—श्री. बळवंतराव जोशी.

देवराव—श्री. दत्तोपंत कुळकर्णी.

रणदुल्लाखान—श्री. गोपाळराव गुत्तीकर.

तानाजी—श्री. यशवंतराव पिंगळे.

विश्वासराव—श्री. धोंडोपंत सुर्वे.

पहारेकरी, पेशवे, जासूद, वगैरे—श्री. विजापूरकर, विश्वनाथ प्रसादे, शंकरराव जोशी, भास्करराव पाठक, नरहरी कानडे, फकीर खानोलकर, इ.

चित्रकार—श्री. पुरुषोत्तमराव काळे व श्री. पांडुरंगपंत.

स्टेजमॅनेजर्स—श्री. सोहनी व श्री. बाळकृष्णपंत जोशी.

ड्रेस मेकर—श्री. यशवंतराव जाधव, [illegible] टेलरिंग फर्म.

पगडीवाले—श्री. बापु किसन पगडीवाले.

पेटीवाले—श्री. दत्तात्रय जोशी तारदळकर.

तबलजी—श्री. नरहरपंत बोरगांवकर, श्री. [illegible]पतराव गुरव.

मॅनेजर—श्री. केशवराव रामकृष्ण शितूत.

हें पुस्तक नं. ३८८ गिरगांव रोड, मुंबई इंदुप्रकाश छापखान्यांत रा. रा
सखाराम यंदे यांनीं मालकाकरितां ~~छापिलें आणि रा. रा. ये~~
नारायण टिपणीस यांनीं पुणें येथें किर्लोस्कर थिएटरांत प्रसिद्ध के

समर्पण.

कै. ति. नारायण बाळकृष्ण टिपणीस;

ज्यांनीं माझ्यामध्यें लहानपणापासून वसत असलेल्या
नाट्यलोलुपतेस प्रतिबंध न करितां उलट उदार
अंतःकरणानें मला प्रोत्साहनच दिलें; त्यां
माझ्या परमपूज्य पित्याच्या कैलासवासी
आत्म्यास पितृऋणाच्या फेडीचें
अल्प निदर्शक म्हणून हें
नाटक अर्पण केलें
आहे.

य. ना. टिपणीस.

प्रस्तावना.

शिवचरित्र हें एक दुसरें महाभारत आहे. चंद्रग्रहण नाटकाचें
रातिथ्य महाराष्ट्रीय रसिक प्रेक्षकांनीं व वाचकांनीं अत्यंत
नें केल्या कारणानें हें नाटक लिहिण्यास उत्तेजन आलें, हें
क मूळ आर्यावर्त–नाटक–मंडळीकरितां गद्यस्वरूपांतच लिहि-
ण्याचा विचार होता; परंतु दोन वर्षांपूर्वीं ती मंडळी बंद झाल्यावर
तकलादर्श सं. नाटक–मंडळीचे मालक श्री. केशवराव भोंसले
ां तें संगीतरूपांत रंगभूमिवर आणण्याची इच्छा दर्शविली.
या इच्छेप्रमाणें हें नाटक तयार करून त्यांच्या मंडळीकडूनच
गभूमीवर येत आहे. हा योग घडवून आणण्यास माझे मित्र
सेद्ध नाटककार श्री. भार्गवराम वि. वरेरकर हे सर्वांशीं कारण
, याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

चंद्रग्रहण नाटकाच्या वेळीं मी जसा अज्ञातवास भोगला
ाहीं खडतर अज्ञातवास मला या नाटकाच्या लेखनप्रसंगीं
वा लागला. या काळांत माझ्या ज्या प्रेमळ मित्रांनीं माझी
स्थिति संतोषित ठेवण्याचा प्रयत्न केला त्यांत माझे मित्र व
ाष्ट्राच्या परिचयाचे नाटककार श्री. विश्वनाथराव शेळ्ये,

प्रस्तावना.

शिवचरित्र हें एक दुसरें महाभारत आहे. चंद्रग्रहण नाटकाचें आदरातिथ्य महाराष्ट्रीय रसिक प्रेक्षकांनीं व वाचकांनीं अत्यंत प्रेमानें केल्या कारणानें हें नाटक लिहिण्यास उत्तेजन आलें, हें नाटक मूळ आर्यावर्त-नाटक-मंडळीकरितां गद्यस्वरूपांतच लिहिण्याचा विचार होता; परंतु दोन वर्षांपूर्वी ती मंडळी बंद झाल्यावर ललितकलादर्श सं. नाटक-मंडळीचे मालक श्री. केशवराव भोंसले यांनीं तें संगीतरूपांत रंगभूमीवर आणण्याची इच्छा दर्शविली. त्यांच्या इच्छेप्रमाणें हें नाटक तयार करून त्यांच्या मंडळीकडूनच तें रंगभूमीवर येत आहे. हा योग घडवून आणण्यास माझे मित्र सुप्रसिद्ध नाटककार श्री. भार्गवराम वि. वरेरकर हे सर्वांशीं कारण झाले, याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

चंद्रग्रहण नाटकाच्या वेळीं मी जसा अज्ञातवास भोगला त्यापेक्षांही खडतर अज्ञातवास मला या नाटकाच्या लेखनप्रसंगीं सोसावा लागला. या काळांत माझ्या ज्या प्रेमळ मित्रांनीं माझी मनःस्थिति संतोषित ठेवण्याचा प्रयत्न केला त्यांत माझे मित्र व महाराष्ट्राच्या परिचयाचे नाटककार श्री. विश्वनाथराव शेट्ये,

विनायकराव पाटारे, श्री. आत्मारामपंत कापडी, व श्री. माधवराव आगाशे बुकसेलर व पब्लिशर, रा. सिताराम दा. गोंधळेकर, इ. मित्रांचा मी अत्यंत आभारी आहे.

संगीत नाटकाचा यशस्वीपणा गोड व नवीन चाली यावर बराच अवलंबून असतो. श्री. केशवराव भोंसले यांच्याकडून मला तशाप्रकारची मदत होईल, याबद्दल शंकाच नव्हती; परंतु दुधांत साखर पडावी त्याप्रमाणें सुप्रसिद्ध गायनाचार्य प्रो. रामकृष्णबुवा वझे यांनीं अत्यंत उदारपणानें; व श्री. केशवराव भोंसले यांच्या-विषयीं त्यांच्या मनांत वसत असलेल्या शिष्यप्रेमानें, योग्य चालींची निवड करून जें सहाय केलें त्याबद्दल श्री. केशवराव भोंसले व मी स्वतः त्यांचे अत्यंत आभारी आहोंत. प्रो. वझेबुवांच्यापाशीं नाटकाला योग्य अशा चालींचा समुद्रासारखा संग्रह आहे. त्यांचा उपयोग नाटककार व नाटकमंडळ्या करून घेतील तर महाराष्ट्र-रंगभूमीस श्रीमंती येऊन ती आपल्या वैभवानें इतर रंगभूमींना दिपवून टाकील यांत शंका नाहीं.

नट असतांनाच मी नाट्यलेखन करूं लागलों; व परमेश्वराच्या कृपेनें मला त्यांत थोडेंबहुत यशहि आलें. माझ्याप्रमाणेंच प्रयत्नानें नाट्यलेखन करूं लागतील असे कांहीं नट मराठी रंगभूमीवर आहेत, असा माझा समज आहे. ललितकलादर्श सं. नाटक मंडळींत अशाप्रकारचे गुण खुद्द त्या मंडळीचे मालक श्री. केशवराव भोंसले यांच्या ठिकाणीं असल्याचें परिचयानें मला आढळून आलें. या शहा–शिवाजी नाटकांत यांनीं रचलेलीं तीन पदें (१)

शांतिधना मानसा० (२) खला तुला तुलाचना०, व (३) ये जागीं प्रलयकाल० मी मोठ्या आनंदानें घालीत आहे. हीं पदें निःसंशय प्रासादिक असून, यशस्वी संगीत नाटककाराला साजे-शींच तीं आहेत, याबद्दल कोणाचीही खात्री होईल. त्यांनीं हा व्यासंग बंद पडूं न देतां नटाच्या शाखेंतूनच यशस्वी नाटककार निर्माण होतात, याचा अनुभव सर्वांना आणून द्यावा. तसेंच याच मंडळींतील प्रसिद्ध नट श्री. ~~पेंढारकर यांनीं~~ रचलेलीं दोन पदें [१ केंवि जीवा जीवीची, व २ प्रमदमया माया] होतकरू नाट-काराचे गुण पूर्णपणें दाखवीत आहेत, असें म्हणण्यास मला मुळींच हरकत वाटत नाहीं. तसेंच, नटवर्य श्री. दत्तोबा भोंसले यांनीं रचलेलें ईश्वरभाक्ति विषयक पदहि मी मोठ्या आनंदानें या नाटकात घालीत आहे. या नाटकांतील पद्यांच्या बाबतींत माझे मित्र श्री. भार्गवराम वरेरकर यांचें मला बिनमोल सहाय झालें, याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत.

सीनसिनरी व कपडेलत्ते या बाबतींत ऐतिहासिक काळाशीं परिचय प्रेक्षकांना करून द्यावा; म्हणून श्री. केशवराव भोंसले यांनीं त्या कामांत अत्यंत वाकब चित्रकार व शिवणकाम करणा-ऱ्यांचें सहाय घेऊन आपल्या इच्छेप्रमाणें सजावट करून घेतली, व रंगभूमीचें पाऊल पुढें नेलें, याबद्दल एक नाटकभक्त या नात्यानें मी त्यांचा आभारी आहे.

श्री. केशवराव भोंसले; व त्यांचे मॅनेजर श्री. केशवराव शितूत व ललितकलादर्श—नाटक-मंडळीतील नटवर्ग, यांनीं परिश्रम करून

नाटक बसविलें; व पुस्तकाकरिता फोटो दिले, याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

शेवटीं, माझे मित्र इंदुप्रकाशछापखान्याचे मालक श्री. दामोदर सावळाराम यंदे यांनीं पुस्तक छापण्याच्या कामीं उदारपणाची मदत केली; व अगदीं अल्पावधींत पुस्तक छापून दिलें, याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे. श्री. शिवछत्रपतीच्या कृपेनें सर्वांच्या ऋणांतून मुक्त होण्याचें सामर्थ्य मला मिळो, अशी प्रार्थना करून मी ही प्रस्तावना संपवितों.

पुणें, शिवशक २४६
वैशाख शुद्ध २

सर्वांचा सेवक
यशवंत नारायण टिपनीस,

श्री

शहा-शिवाजी.

अंक पहिला.

प्रवेश पहिला.

स्थल—शहाजीचा वाडा.

(तुकाबाई आणि व्यंकोजी.)

तुका०—

पद-(चाल—गडबा लगावो)

स्मरण श्रीहरी तव सुख मज देइ । भो सदया भजन तव विमल ॥ धृ०॥ कंसकाल मर्दुनिया मुक्त करिशि जनक जननी । तूंचि रवि सबल करिसि सुफल माहितल ॥ १ ॥

कायरे बाळ ! मघापासून एवढा वाकून वाकून काय पाहतो आहेस ? काय आहे तिथ ? आतां इतक्यांत दहा वीस वेळां गेला असशील त्या खिडकीजवळ. काय आहे तिकडे एवढं पहाण्यासारखं ?

व्यंको०—काहीं नाहीं. बाबा येत आहेतसं पहात होतों.

तुका०—अरे, ते इतक्यांत कसे येतील ? अजून दिवस तरी मावळला आहे का ? करकरित तिन्हीसांजा होतात दररोज यायला. एवढ्यांत रे कसे येतील ?

व्यंको०—नाहीं. पण आज लवकर येईन, असं म्हणाले होते.

तुका०—तुझ्या समजुतीकरतां तसं बोलले असतील. हट्टबिट्ट धरून बसला असशील !

व्यंको०—छे: मी नाहीं बुवा हट्ट धरला. तेच म्हणाले, मला आज लवकर आलं पाहिजे म्हणून. मी काहीं वेडाबिडा आहें वाटतं, हट्ट करायला !

तुका०—तूं जर हट्ट केलास, तर उद्यां सगळे लोक म्हणतील कीं, व्यंकोजी हट्टी आहे. शहाजीराजांच्या मुलाला हट्ट शोभत नाहीं.

व्यंको०—काय-काय नाहीं शोभत ? कुणाच्या मुलाला काय नाहीं शोभत ?

तुका०—चल, लबाड कुठला ! मी नाहीं सांगत.

व्यंको०—पण सांगच. मला समजलं नाहीं बरोबरसं.

तुका०—चल. मी सहज बोलून गेले, तर तेवढंच घेऊन बसला. गप् बैस.

व्यंको०—मी नाहीं गप् बसायचा. बोल, काय बोललीस तें मघाशीं. नाहींतर बाबांना सांगेन.

तुका०—सांगेनास, मी नाहीं तिकडचं नांव घ्यायची.

व्यंको०—' नाहीं घ्यायची ' म्हणजे ! घेतलं पाहिजे.

तुका०—' घेतलं पाहिजे ' म्हणजे ? तूं तरी शिवाजीसारखाच हट्टी होणार वाटतं ? भाऊच पडलास-लागणारच घराण्याचा गुण थोडा तरी ! अरे, चाललास कुठं इतक्यांत ?

व्यंको—काहीं नाहीं. बाबांना पाहतोंय्. अजून कसे येत नाहींत ? तूं म्हणतेस तेंच खरं. त्यांनीं मला फसवलं. आतां येऊं तर दे—त्यांच्या तोंडावर सांगेन तुह्मीं मला फसवलं म्हणून. (शहाजी येतो)

शहा०—कुणी फसवलं रे तुला ? ए, गुलामा, बघ कीं आतां माझ्या-कडे असा.

व्यंको०—आई म्हणाली, मी नाहीं म्हणालों.

तुका०—चल, चहाडखुचका मीं म्हणालें कारे ?

व्यंको०—नाहीं वाटतं म्हणालीस! तूं नेहमीं असंच खोटं बोलतेस. आणखी काय म्हणालीस, सांगू का !

शहा०—काय काय म्हणाली रे ?

तुका०—त्याचं काय ऐकायचं! पण आज गडे लवकरसं येणं झालं!

शहा०—सांगूनच गेलों होतों, लवकर येईन म्हणून.

तुका०—कुणाला सांगून गेलां होतां ? मला ?

शहा०—याला सांगितलं होतं कीं–(त्र्यंकूला)–कायरे, सांगितलं नाहींसं वाटतं हिला ?

त्र्यंको०—कुणाला ? आईला ? आतांच सांगितलं ना, तुह्मीं यायच्या अगोदर.

तुका०—पण यांनीं तुला सांगितल्याबरोबर कां नाहीं सांगितलंस ?

त्र्यंको०—नाहीं सांगितलं, आम्हांला नाहीं वाटलं सांगावसं.

तुका०—वाहवा रे आह्मी! देउंका एक गालफडांत !

शहा०—कां त्याला उगीच ? पोर आहे. काय लागतेस त्याच्याबरोबर ?

तुका०—अशींच पोरं लाडालाडानं बिघडतात. थोरले होते जरा हुकमांत, पण मधले लागले कीं नाहीं दरोडे घालायला ? यांना जरा चढवलेत, कीं गिरवतील त्यांचाच कित्ता !

शहा०—मी भांडण करायला कांहीं आज लवकर आलों नाहीं. तुम्हांला वाटेल त्याप्रमाणं त्र्यंकूला वळण लावा. आम्हीं एक अवाक्षरसुद्धां त्या बाबतींत काढणार नाहीं. त्या भागांत आपण सरकार आहांत. आपला अधिकार आम्हांला अगदीं मान्य आहे. खरंच, पातशहाच्या रागापेक्षां आम्हांला बायकोच्या रागाला जास्त भ्यायला पाहिजे.

तुका०—उगीच कांहींतरी बोलायचं झालं !

शहा०—उगीच कसं—

पद—(चाल—पायलिया मोरी)

कां चपला वेधी मेघाला । चमकत गर्जत अरिसम
रडवित मेघाला ॥ धृ० ॥ ती कमला वरि मधुकर सुंदर ।
धरि बंधनांत गम्मत सतत ही भृंगाला ॥ १ ॥

तुका०—एखाद्याला खुष कसं अगदीं एका शब्दांत करायचं—

पद-(चाल-तोरी मैना.)

केंवि जीवा जीवींची माझी कलिका हांसलि । सेविता विनय वचन सुरस केलि ॥ धृ० ॥ शशिमुख दिसता कुमुदिनि विकसित । तिमिरा ना राहि थारा । तेंवि रति स्फुरलि विरलि ॥ १ ॥

पण खरंच, गडे, आज लवकर येणं कां झालं ?

शहा०—आज आपल्याकडे एक पाहुणे येणार आहेत.

तुका०—कोण पाहुणे येणार आहेत ? कुणी मराठे सरदार का येणार आहेत ?

शहा०—छे:, फार बडे पाहुणे येणार आहेत.

तुका०—तर मग कुणी मुसलमान अमीर येणार असतील !

शहा०—छे: ! त्यांच्याहूनही बडे आहेत ! फार बडे आहेत !

तुका०—स्वत: सुलतान येणार आहेत कीं काय ?

शहा०—छे: ! सुलतान त्यांच्या खिजगणतींतही नाहीं. सुलतानापेक्षांही बडे आहत.

तुका०—सुलतानापेक्षां—विजापुरच्या पातशहापेक्षांही बडे आहेत ? कोण बाई ?

शहा०—चालवा, जरा तर्क तरी चालवा.

तुका०—आपला नाहीं गडे तर्क चालत. सांगाना कोण येणार आहेत ?

शहा०—सांगूं ? माझा मुलगा येणार आहे.

तुका०—हं !—

शहा०—माझा शिवबा आज मला भेटायला येणार आहे.

तुका०—होयका ? तर मग फारच मोठे पाहुणे यायचे आहेत म्हणायचे ! विजापुरचा सुलतानच काय,—दिल्लीच्या पातशहापेक्षां मोठे !—

मग अजून गुढ्या तोरणं नाहीं उभारलीं ? पताका नाहीं लावल्या ? केंवराचे सडे नाहीं घातले ? फुलांच्या माळा नाहीं टांगल्या ? वाजंत्री चौघडा नाहीं वाजूं लागला ? बंदुकांची फैर नाहीं अजून झडली ? एवढा बडा पाहुणा येणार आणि त्याला असला मुका पाहुणचार ?

शहा०—त्याच्या पाहुणचारासाठीं मी याहीपेक्षां जंगी तयारी केली आहे. असल्या भिकार दिवाणखान्यांत असला भिकार पाहुणचार मी त्याला कसा करीन ?—त्याच्या स्वागताकरतां केवढी अपूर्व थाटाची तयारी चालली आहे ?

तुका०—इतकी अपूर्वाईची तयारी चालली आहे ?-कुठं ?

शहा०—इथं ! या माझ्या हृदयांत ! पित्यानं पुत्राचं आदरातिथ्य ज्या प्रेमळ भावनांनीं केलं पाहिजे, त्या साऱ्या भावना शिवबाच्या स्वागता करतां इथं सज्ज होऊन आल्या आहेत. माझ्या अंतःकरणाचा कोनाकोंपरा आज माझ्या शिवबानं व्यापून टाकला आहे !

तुका०—मग आता तिथं दुसऱ्या माणसांना जागा राहिली नसेल ?

शहा०—माझं हृदय महासागरासारखं आहे. तिथं सर्वांना जागा आहे. चंद्राला कवटाळण्याकरितां महासागर भरतीनं भरून येतो खरा, पण बेटं, दगडधोंडे, आणि मासे वगैरे जलचरं त्याच्या पोटांत नेहमींप्रमाणेंच खेळत असतात.

तुका०—बरं, आम्ही आपले दगडधोंडे ! मासे वगैरे गरीब प्राणी ! या महासागरांत आहों, तोंपर्यंतची आमची प्रतिष्ठा !-पण महासागर तरी इतक्या सगळ्यांशीं खेळून, चंद्राला कवटाळायला कां बघतो ?

शहा०—कां म्हणजे ? चंद्र त्याचा पुत्र म्हणून. पुत्राला हस्तगत करून त्याला आपल्या हृदयांत बुडवून टाकण्याचा प्रयत्न करणं, पित्याचा धर्मच आहे. महासागराचा लाडका पुत्र–हा चंद्र–बाळपणींच बापाच्या कबज्यांतून दूर निसटला; आणि स्वतंत्रपणानं आपल्या पराक्रमाचा प्रकाश पाडूं लागला. इतक्या तेजस्वी पुत्राचं कौतुक करण्याकरतां कोणता बाप अतुर होणार नाहीं !

तुका०—पण शिवबाला आपलासा करण्याचे आपले प्रयत्न शेवटीं समुद्राच्या प्रयत्नाप्रमाणंच निष्फळ व्हायचे. चंद्राची प्राप्ती न झाल्या-कारणानं, महासागर शेवटीं निराशेनं धाय मोकलून रडूं लागतो; आणि आपले दगडधोंडे चंद्रासारखे स्वैर निपजूं नयेत, म्हणून आपल्या उराशीं कवटाळून घेतो. आपल्यावरसुद्धां तशीच पाळी यायची!

शहा०—महासागर रडूं लागतो! काय विचित्र कल्पना ही! महा-सागर जर रडूं लागला तर तो महासागर कसला! चंद्राचा तेजस्वीपणा पाहून महासागर काळोख्यारात्रींही प्रफुल्लित होतो. चंद्राची स्वातंत्र्य-प्रीति पाहून महासागर आनंदानं गर्जना करूं लागतो, आणि चंद्राशीं तादात्म्य पावून, आपल्या अंतःकरणांत प्रतिबिंबानं चंद्राला खेंचून आणून इतरें भावंडाबरोबर त्याला खेळायला लावतो.

तुका०—पण आपले चिरंजीव चंद्र कसले? जंगली जनावर आहेत. त्यांच्या संगतीनं दुर्गुण मात्र लागण्याचा जास्त संभव! ते शहाण्याचे कांदें कधीं यायचे आहेत ते तरी नक्की सांगा; म्हणजे बाळाला घेऊन जरा दुसरीकडे जाऊन बसेन. आपल्या त्या दिवट्या चिरंजीवांचा इथं काय प्रकाश पडायचा असेल तो पडूं द्या.—त्यांचा काय पाहुणचार व्हायचा असेल तोही होऊं द्या.—हो! इकडचं त्याचं हितगुज व्हायचं असेल! थोरल्या राणीसाहेबांचे प्रेमाचे निरोप एकायचे असतील! आणि आम्हां मायलेकरांना कदाचित घराच्या बाहेर काढायच्या मसलती देखील चालायच्या असतील! हो, मी कशाला इथं बसूं? ही मी चालले.

शाहा०—थांब. मी त्याच्याजवळ काय बोलणार आहे, तें तुझ्या समक्षच बोलतो. म्हणजे तुझ्या या शंकांना आपोआपच जबाब मिळेल. जिजाऊचा आणि तुझा हरघडीं तंटा उडे, म्हणून मी तिला पुण्यास पाठवून दिली, असा तुझा समज झाला असला, किंवा महागिरीचा बंदोबस्त नीट व्हावा म्हणून मी तिची तिकडे रवानगी केली, असा लोकांचा ग्रह असला, तरी खरं कारण काय आहे, याचा मागमूस मोठमोठ्या मुत्सद्यांनांही लागणं शक्य नाहीं.

तुका०—मोठमोठ्या मुत्सद्यांना जी गोष्ट कळणं अशक्य ती आमच्या सारख्या मूर्ख माणसांना काय कळणार? या आतांच्या बापलेकांच्या भेटींत कदाचित् त्या कारणाचा स्फोट व्हायचा! म्हणून म्हणते, आम्ही जवळ नसलेलीं बरीं.

शहा०—थांब. तो पहा कोण येतो आहे! ती त्याची चर्या पहा! ती त्याची ऐट पहा! चालण्याची ती ढब पहा! सांग, असा पुरुष कधीं तुझ्या पहाण्यांत आहे?—माझ्यातर नाहीं. याच्या उदयाबरोबर त्या महा-सागरासारखीच माझी स्थिति झाली आहे! ये, ये, शिवबा ये. (शिवाजी येतो, व शहाजीच्या पायावर डोकें ठेवतो. व्यंकोजी तुका-बाईच्या आड उभा राहून वांकून पहातो.)

शिवा०—माईसाहेब! (तिच्या पाया पडतो.)

तुका०—माझ्या कशाला पाया पडायला हवं.—शतायु भव. उठा.

शिवा०—अरे हा कोण—व्यंकू!—अरे चोरा, तिकडून आडूनशा पहातोस? ये असा पुढं. (पुढें ओढतो. व्यंकोजी ओरडतो.) अरे रडतोस काय? मी तुझा भाऊ आहे, जंगली जनावर नाहीं.

शहा०—तो अगदी भित्रा आहे. याच्या वयांत तूं स्वारीशिकारीवर जायला नाचत होतास. वाघाच्या अंगावर घोडा फेकीत होतास. गाईचा हंबरडा ऐकलास तर कसायानं तिची मान कापण्यापूर्वी त्या कसायाचीच गर्दन उडवीत होतास! आणि हा अजून परकी मनुष्य पाहिला कीं, आईच्या आड लुगड्याच्या पदरांत दडून बसतो.—कोण आहेरे? मुधोजी! जा याला घेऊन बाहेर. (मुधोजी येतो व व्यंकोजीस घेऊन जातो.) शिवबा, अरे उभा कां? बैस.

शिवा०—(शहाजीकडे दुर्लक्ष्य करून) माईसाहेब, त्याला जरा मोकळा सोडीत जा. म्हणजे बनेल धीट. नेहमीं जवळ बाळगून असं चालेल कसं? आपलं घराणं शिपाईगिरीचं आहे.

तुका०—शिपायगिरीचं तसं मुत्सद्दीगिरीचंही आहे.

शिवा०—कबूल. मुत्सद्दीपणाचं शिक्षण त्याला वरवसल्या मिळेल खरं, पण एकटी मुत्सद्दीगिरी शिपाईगिरीशिवाय लंगडी असते. शिपाई-गिरीच्या कर्तृत्वावांचून मुत्सद्दी मुका बनतो. पोलादी मनगटावांचून मेंदूचा कापूस होतो. हरएक मराठा शिपाई असला पाहिजे; आणि प्रत्येक भोंसला उजव्या हातानं शिपाई आणि डाव्या हातानं मुत्सद्दी असा दो-हसबी वीर असला पाहिजे. डाव्या हाताच्या कारवाईची धूळ शत्रूच्या डोळयांत फेंकून उजव्या हातांतल्या समशेरीनं त्यानं शत्रूची गर्दन उडवली पाहिजे.

तुका०—नकोग बाई माझ्या बाळाला असलं वळण लागायला ! बरा तो इथं नाहीं हें ऐकायला. हा असला कित्ता लहानसहान मुलां-बाळांना घालून देण्याकरतांच तुझा अवतार झाला आहे वाटतं !

शिवा०—हा कित्ता प्रथम घालून देण्याचा मान, माईसाहेब, आपल्या समोर असलेल्या या माझ्या बाबांचाच. त्यांनींच घालून दिलेला कित्ता मी गिरवतो आहे.

तुका०—पातशहाच्या मुलखांत पुंडाई करण्याचा कित्ता यांनींच घालून दिला वाटतं ?

शहा०—हो मीच घालून दिला. गप बैस. तुझ्या मुलानं माझा कित्ता गिरवूं नये, अशी तुझी इच्छा असली तर तूं त्याला असल्या गोष्टींचा गंधही लागूं देऊं नकोस. तूं त्याला हवंतसं वळण लाव.—शिवबा, अरे बैस, उभा का ? अगोदर हा पोषाख उतर. जरा विश्रांती घे. जेवण झाल्यावर जें कांहीं बोलायचं आहे तें बोलूं.

शिवा०—पण मला जेवायला फुरसत नाहीं. उजाडण्यापूर्वी मला पुण्याला परत गेलं पाहिजे.

शहा०—म्हणजे इतक्यावर्षांनीं आज तूं मला भेटलास; आणि जेव-ल्यावांचून मी तुला तसाच जाऊं देऊं ! तें कांहीं नाहीं. तुला जेवलं हें पाहिजेच.

तुका०—पण त्यांना कदाचित् इथलं—आमच्या इथलं अन्न मानवत नसेल.

शिवा०—माईसाहेब, एक एक कल्पना काढतां झालं. मी परका का आहे? एरवीं तरी मी आपलंच अन्न खातो आहे, नाहींतर काय? कुठंही अन्न घेतलं तरी तें आपल्या इथलंच आहे. माझं म्हणणं इतकंच, कीं निव्वळ जेवणामुळं ज्या मुख्य कामाकरिता बाबांनीं मला बोलावलं ते मागं पडून वेळ मात्र व्यर्थ जाईल.

शहा०—ठीक. कांहीं हरकत नाहीं. अगोदर आपण कामासंबंधानं बोलूं. नंतर ताटावर बसूं. जेवलास की लागलाच नीघ. माझी परवानगी आहे.

शिवा०—मग कांहींच हरकत नाहीं.—बरं आपण मला कां बोलावलं?

शहा०—पण अगोदर इथं जरा बैस. मी सकाळपासून दहादा सांगितलं असेल तुला; पण तूं माझ्या बोलण्याकडे समजून उमजून दुर्लक्ष्य करतो आहेस. या एका क्षुल्लक बाबतींत जर तूं माझं ऐकत नाहींस तर ज्या महत्वाच्या गोष्टी मी आतां तुला सांगणार आहे, त्या तूं कितीशा मानणार?

शिवा०—आपल्याला ही गोष्ट जितकी क्षुल्लक वाटते तितकी ती नाहीं. आपण वडील आहां, मी आपला पुत्र आहे, माझा धर्म आपल्या समोर उभं राहण्याचाच आहे. वडिलांबरोबर वडिलांच्या मांडीशीं मांडी भिडवून बसणं म्हणजे वडिलांचा उपमर्द करणं आहे.

शहा०—मी सांगितल्यावर बसणं; म्हणजे माझा उपमर्द नव्हे, माझी आज्ञा पाळणंच आहे.

शिवा०—आपली आज्ञा पाळली जाईल खरी; पण यांत धर्माज्ञा मोडली जाते. धर्माज्ञेचं महत्व पित्राज्ञेपेक्षां अर्थात् जास्त आहे. धर्माज्ञा मोडण्याचा हुकूम पित्यानं करूं नये आणि पुत्रानं तो मानूं नये.

पद. (चाल—कवन सुख०)

अमरपद पावे। धर्म जो आचरित। आधार ध्रुव तोहि ॥ ध्रु० ॥
विधिनियम भंगितां। दोष ये धार्मिका।
केंवि नरनायका। मान्य व्हावें ॥ १ ॥

शहा०—जाऊ दे तें. तुझ्या मनाला तसं वाटत असेल तर तूं उभाच रहा. अगदीं बारीक सारीक बाबतींत सुद्धां तूं इतक्या चोखपणानं वागतोस, हें तुला आणि मला भूषणावहच आहे. अशाच प्रकारानं आपणां उभयतांना ज्यांत सुख होईल; आणि आपली उभयतांची शोभा वाढेल, अशाच गोष्टी तुझ्या हातून व्हाव्यात, अशी माझी इच्छा आहे.—शिवबा, गेल्या तीन वर्षांत तुझ्या हातून जशा तऱ्हेचीं कृत्यं घडलीं, तशा तऱ्हेचीं कृत्यं यापुढं घडत राहिलीं तर आपल्यावर केवढी आपत्ति येईल, याची तुला कल्पना आहे का ? माझा तर आतांपर्यंत मिळविलेला नांवलौकिक फुकट जायची वेळ आली आहे. शारीरिक बळापेक्षां बुद्धिबळानंच तुझा कार्यभाग शेवटास जाईल, असा मला पूर्ण भरंवसा आहे. शिवबा ! हा तूं कसला खेळ मांडला आहेस ?

शिवा०—मी हा नवीन खेळ मांडला नाहीं. आपणच मांडलेला बुद्धिबळाचा खेळ मी पुढं चालू केला आहे. डावावर डाव करून मी एक एक घर—एक एक किल्ला सर करीत चाललों आहे. आडवी आलेली मोहरी नामोहरम करून मी पातशहाला शह देतों आहे. सुलतानानं शहाजी राजाचं मोहरं हरेला घातलं असलं तरी माझ्या भीमथडी तट्टानं अडीच घरं उडी मारल्याबरोबर मराठेशाहीचा बिनीचा हत्ती विजापुरच्या राजवाड्यांत सहज उभा राहील; आणि या शिवाजीचं प्यादं पातशहासमोर उभं राहून पातशहाची प्यादी करील.

शहा०—या तुझ्या कल्पना शेवटीं फोल ठरतील. असल्या कल्पनांचे घोडे उधळून हा शहाजीही एकदां आदिलशाही—निजामशाहीशीं डाव टाकीत होता. पण पातशाही जोरी डावापुढं आपला कमजोरी डाव चालणं शक्य नाहीं, असंच त्याच्या अनुभवाला आलं.

शिवा०—पातशाही जोरी डाव मारामारी करून कमजोरी केला असता, म्हणजे पातशहाला वाटेल तसा कचाटींत धरता आला असता. मराठेशाही स्थापन करण्याचा शहाजीराजांचा डाव फसला, त्याच

वेळीं शहाजीराजांतल्या ‘ शहा ’ चा अंत होऊन ‘ जी हांजीराजा ’ शिल्लक राहिला. अशा तऱ्हेनं राजकारणाच्या डावांत खऱ्या शहाजी-राजांचा अंत झाल्यामुळं वारसाच्या हक्कानं डाव मांडण्यासाठीं मी पुढं आलों आहे. सुलतानी सत्ता धुळीला मिळून आमच्या विजय-पताका महाराष्ट्राच्या पटावर झळकूं लागल्या, कीं राज्याभिषेकाच्या उदकानं शहा-जीराजांना तिलांजली देईन; आणि मराठेशाहीचा पिंड अर्पण करून त्यांची सगळी इच्छा तृप्त करीन

शहा०—तुझा उत्साह वाखाणण्यासारखा आहे—स्फूर्तिजनक आहे. माझ्यासारख्या वृद्धाच्या अंतःकरणांतही अवसान आणण्यासारखा आहे. पण तो शेवटपर्यंत असाच टिकला पाहिजे. आम्ही मराठे कोणत्याहि कृत्याचा आरंभ करण्यांत शूर असतो, पण—

शिवा०—मराठ्यांच्या कर्तबगारीवर—त्यांच्या वैभवावर उत्तरेकडच्या घमेंडखोरांनीं मारलेला हा शिक्का अगदीं भ्रामक आहे, याची प्रचिती अलम दुनियेला लवकर येईल. स्वपराक्रमाच्या परमेश्वरावर आमची निष्ठा आहे. साधुसंतांच्या तपश्चर्येचं आम्हांला पाठबळ आहे.मराठा स्त्रियांच्या पातिव्रत्याचं आमच्या हातांत रणकंकण आहे. महाराष्ट्र धर्माचं कवच आम्ही आपल्या हृदयावर धारण केलं आहे. आम्हांला यश मिळणारच; आणि मराठे-शाहीचा जरीपटका महाराष्ट्राच्या वैभवशाली किल्ल्यावर फडकणारच.

शहा०—तरुणपणच्या तडफेला साजणारी ही सुखस्वप्नं तुझी दिशाभूल करीत आहेत. रात्रीच्या पूर्वरंगांत पडलेलीं स्वप्नं नेहमीं पोकळ ठरतात. पहाटेच्या उत्तररंगांत दिसणारींच खरीं होतात. तुझ्या कर्तृत्वाची रात्र आतांच सुरू झाली आहे. प्रौढपणाची पहाट अद्याप दूर आहे. एखाद्या सामान्य माणसाला हें कळणार नाहीं; पण तुला हें कळायला पाहिजे होतं.

शिवा०—तर मग मी सामान्य मनुष्य नाहीं ? असामान्य माणसाचं सारंच असामान्य ! असामान्य माणसांची प्रौढपणाच्या पहाटेचीच नव्हे,–

बाळपणच्या रात्रीचीही नव्हे, तर दिवसाच्या उजेडांतलीं भर दोन प्रहरचीं स्वप्नं खरींच ठरणार.

शहा०—ठरोत! आणि तशीं खरीं ठरलीं तर त्यांत मला आनंदच आहे. पण शिवबा, हीं स्वप्नं खरीं व्हायचा काळ अद्याप दूर आहे. आजच्या स्थितींत जरी मराठेशाही स्थापन झाली, तरी ती औट घटकाच टिकणार. स्वतंत्रपणानं राज्य करण्याची अजून आमची लायकीच नाहीं. इतकं नकोच. मी म्हणतो हाच तुला अनुभव येईल. एकदा बंडखोर म्हणून तुझं नांव पडलं, म्हणजे मोठेपणाचे सर्व मार्ग खुंटून तूं पस्ताव्यांत पडशील. त्यापेक्षां, आहे त्या स्थितींत संतोष मानून विजापूरच्या दरबारीं नोकरी कर. पंचहजारी, दरुहजारी तुला आज मिळेल. आस्ते आस्ते तूं प्रमुख उमराव बनून वजीरीही मिळवशील. आदिलशाहींत राहायचं नसेल तर कुतुब-शाहींत जा. कुतुबशाही आवडत नसेल तर दिल्लीच्या पातशहाच्या पदरीं रहा. तूं दख्खनचा सुभेदार होशील. दौलताबादेची दौलत पायाखालीं तुडवशील. शिवबा!—लौकिकाचे—शहाणपणाचे—वैभवाचे हे मार्ग सोडून, तूं कसल्या भयंकर धोक्याच्या मार्गानं जातो आहेस!

शिवा०—बाबा, आपण सांगितलेल्या सगळ्या गोष्टी मला दिसत होत्या; पण ज्या अर्थी मी त्या केल्या नाहींत, त्या अर्थीं मला त्या मुळींच पसंत नाहींत, हें उघडच आहे. मी जाणूनबुजून हा संकटाचा—हाल-अपेष्टांचा मार्ग पत्करला आहे. मी अज्ञान असतांना बाराव्या वर्षी आपण माझं लग्न केलंत; पण तेव्हांही हट्ट धरून हमेश गोवध होणाऱ्या विजा-पुरांत मी तें होऊं दिले नाहींत. मी 'नको नको' म्हणत असतांना जबर-दस्तीनं आपण मला दरबारांत नेलंत; पण मी पातशहाला खडीताजीम दिली नाहीं आणि कुर्निसादही केला नाहीं. माझा हा स्वभाव ओळखूनच आपण मला स्वतंत्र विचाराचं स्वैर वातावरण मिळावं; म्हणून आईबरोबर पुण्यास पाठवून दिलंत. दादोजी कोंडदेवाचं शिष्यत्व पत्करून जसं मी त्यांच्या-कडून राजकारणाचं अमृत सेवन केलं, तसंच माझ्या आईकडून देश-

भिमानाचं, शूरपणाचं, बाणेदारपणाचं, स्वतंत्र विचाराचं दुग्ध ग्रहण केलं. परमेश्वरी प्रेरणेनं मी मराठे तितके मिळवले, अगदी आपलेसे केले! माझे मराठे म्हणजे जातीचे मराठे नव्हत. तर महाराष्ट्रांतले कुणबीमाळी, महारमांग, ब्राम्हणप्रभु, वैश्यवंजारी, माझे मराठेच आहेत. इतकंच नव्हे तर महाराष्ट्रांतले मुसलमानसुद्धां माझे मराठेच आहेत. धर्माज्ञेप्रमाणं मी अठरा वर्षं हें अध्ययन करून अज्ञानांत आनंद मानला. पण एकोणिसाव्या वर्षी मी धर्माज्ञेनंच सज्ञान झाल्यावर कर्तबगारीच्या मार्गाला लागलों. मी आपला पहिला पंजा तोरण्यावर मारून तो सर केला, यांत मी गैर तें काय केलें ? दादोजींना तें खपलं नाहीं. आपल्यालाही तें आवडलं नाहीं. पण माझ्या आईला ते आवडलं! आईनं मला शाबासकी दिली, हृदयाशीं धरून तिनं माझं कौतुक केलं!

शहा०—पण पातशहाच्या समजुतीनं तूं हें उघड उघड बंडाचं निशाण उभारलंस! स्वतंत्र राजाप्रमाणं तूं मंत्रिमंडळ निर्माण केलंस! बरोबरीच्या नात्यानं तूं दरबारशीं खलिते लिहूं लागलास.

शिवा०—यांत मी कांहींएक गैर करीत नाहीं. माझा जरीपटका बंडाचं निशाण नाहीं. माझं मंत्रिमंडळ दरोडेखोरांची टोळी नाही. मराठे स्वराजाला पात्र आहेत, हें आपल्यासारख्यांना दाखवण्याकरतांच मीं हें केलं. आपली जहागीर हें एक चिमुकलं राज्य कल्पून दरबारी पद्धतीनं त्याचा कारभार आम्हांला करतां येतो, हें दरबारला दाखवण्याकरतांच मी हें मंत्रिमंडळ निर्माण केलं आहे.

शहा०—पण यामुळं तुझ्यावर केवढा भयंकर प्रसंग ओढवणार आहे, याची तुला कल्पना आहे ? आदिलशाही, कुतुबशाही, आणि दिल्लीपत् पातशाही, या तीन हत्तींच्या हैदोसांत तूं चिरडून जाशील. मोठमोठे मातबर उमराव तुझ्यावर चाल करून येतील; आणि सुलतानाचा हुकूम झाला तर न जाणों खुद्द मलाही तुझ्याशीं लढण्याकरतां निरुपायानं यावं लागेल. शिवबा! तूं आणि मी शत्रू म्हणून समरांगणांत समोरासमोर उभं राहावं, याहून दुर्दैव तें कोणतं ?

शिवा०—यांत दुर्दैव कसलं ! उलट भारतीय युद्धापेक्षांही अलौकिक युद्धप्रसंग पहायला मिळाला म्हणून सगळा महाराष्ट्र आपल्याला दैववान् समजेल. भारतीय युद्धांत कृपाचार्य, द्रोणाचार्यादि गुरुवर्यांशीं, दुर्योधन दुःशासनादि बांधवाशीं, भीष्माचार्यासारख्या पितामहाशीं, कर्णासारख्या अज्ञान बंधूशीं लढण्याचा प्रसंग पांडवावर आला होता. पण पिता-पुत्रांच्या युद्धाचा प्रसंग राम-लवांकुश किंवा पार्थ—बभ्रुवाहन यांच्या वांचून कुणाच्याही भाग्याला आला नाहीं.

शहा०—तुझ्याशीं लढण्याचा प्रसंग आला तर मी आत्महत्या करीन, पण—

शिवा०—आपल्याशीं लढण्याचा प्रसंग येऊं द्या, समोरासमोर युद्ध करून हा शिवाजी स्वयंभू धर्मवीर आहे, हें मी आपल्याला सिद्ध करून देईन.

शहा०—मला ठार केल्यावांचून तुझं ध्येय साधत नाहीं, असं जर तुला वाटलं, तर तूं मला ठारही करशील ?

शिवा०—त्या प्रसंगीं मी काय करीन, हें या वेळीं शब्दांनीं सांगण्यापेक्षां तो प्रसंग येईल त्यावेळीं कृतीनंच सांगणं बरं.

शहा०—पण सांग, मला ठार करशील ? बोल, माझं मस्तक धडापासून वेगळं करशील ?

शिवा०—माझ्या दुर्दैवी महाराष्ट्राची मुक्तता करण्याकरतां धर्माला अनुसरून मी वाटेल ती गोष्ट करीन.

शहा०—(शिवाजीला पोटाशीं धरून) शिवबा ! शाबास—शाबास ! धन्य हा शहाजी ! खरा भाग्यवान् म्हणून माझ्या पोटीं हा दिव्यात्मा जन्मास आला.

पद-(चाल-सावरिया मोहन प्यारी.)

बा तनया राजसराया । मधु अनुभव हा हृदया आला ॥ धृ ॥
हा रवि तिमिरा नेत हिरावुनि । तेज विमल दे या जगा ।
तनुज नव्हे हा देव धांवला । सुचवित काल नवा आला ॥ १ ॥

छे: छे: ! तुला असं हृदयाशीं धरून माझी तृप्ति होत नाहीं. या नेत्रांनीं तुला अवलोकन करून माझ्या वृत्तीला शांती मिळत नाहीं. या मस्तकामध्यें तुझ्या देवतुल्य गुणाचे विचार आणूनही तें थंड होत नाहीं. तुझ्याच चरणतीर्थावर तें असं अर्पण केल्यावांचून मला आराम वाटणार नाहीं. (मिठी सोडून मस्तक शिवाजीच्या पायावर ठेवतो.)

शिवा०—(त्याला आडवून एकदम उठवतो) बाबा ! हें काय !

तुका०—हा पागलखाना ! (व्यंकोजी येतो.)

व्यंको०—आई, हें काय !

तुका०—पागलखाना. बाळ, तूं या पागलखान्यांत कशाला आलांस ! चल, चल इथून लौकर.

शहा०—नको. बाळ व्यंकू, जाऊं नकोस. माझ्याप्रमाणं तूंहि याच्या पायावर मस्तक ठेव. तुकाऊ, तूंही या नरश्रेष्ठाला नमस्कार कर–वेडीतर नाहीं–दुर्दैव तुमचं म्हणून तुम्हांला बुद्धि होत नाहीं. मला जें सुख मिळालं तें तूंही भोग. बाळाला तरी घेऊं दे.

तुका०—हें काय मांडलं आहे आपण ! असे भ्रमिष्टासारखे काय करता ? अहो, हा शिवाजी ! तुमचा मुलगा ! पाया काय पडता त्याच्या ! बाबा ! कोणत्या मुहूर्तावर आलास आणि वडिलांना वेडं करून सोडलंस ! मावळची कुणब्याची पोरं तुझ्या नादीं लागून वेडीं झालीं, म्हणून आतापर्यंत ऐकत होत्यें. पण जुनी–समजुतदार–शहाणी माणसंही नुसती एकाघटकेच्या सहवासानं भ्रमिष्ट झालेलीं आज प्रत्यक्ष पाहिलं.

शहा०—व्यंकू ! चल, शिवबाच्या पाया पड.

तुका०—कांहीं नको पडायला. नको पडूस पायां.

व्यंको०—पण कां नको पडूं ? बाबा सांगतात पाया पड; आणि तूं नको म्हणतेस ? बाबा ते पाया पडले, मग मी कां नको ?

तुका०—तूंही फिरलास कां ? तूं माझं ऐकणार का नाहीं, बोल !

व्यंको०—तुझं नाहीं ऐकणार बाबांचं ऐकेन.

शहा०—शाबास बाळ ! तूं माझं ऐकणार ना ?

व्यंको०—तुमचंही नाही ऐकणार. आबासाहेबांचं ऐकेन. त्यांच्या इतकं कुणाचंच नाहीं ऐकणार.

तुका०—आबासाहेब कोण ?

व्यंको—हे. बाबा ज्यांच्या पाया पडले ते.—आबासाहेब, मला तुमच्याबरोबर घेऊन चला. इथं किनई आईनं मला बायकासारखा भित्रा केला आहे. मला घोड्यावर बसतां येत नाहीं, तरवार फिरवतां येत नाहीं, कांहीं नाहीं, हिनं मला असा घरकोंबडा करून ठेवला आहे. मी येतो तुमच्याबरोबर.

पद. (चाल–काहे मोहे क्यौ०)

जननिचा छंद मज मुळि न रुचत । कर शिरिं फिरवित सतत सुखाचा । पदरिं लपवि मज । रणभय शिकवित ॥ ध्रु० ॥ उगिच घरिं कसा । राहुं तरि असा । हंसतिल जन मला । म्हणति मम खुळि माता ॥ कर शिरिं० ॥ १ ॥

तुका०—झालं ! माझ्या बाळालाही वेडं केलन् ! सैताना, गप्प का ? नुसतं मुलाकडे पाहिलंस मात्र तों त्यानं घेतलन् वेड तुझं.

शिवा०—माईसाहेब ! मी न बोलतांसुद्धां सगळे माझ्यावर प्रेम करूं लागतात, यांत माझा काय दोष ! सगळ्यांनीं आपल्या मर्जीविरुद्ध माझ्या पाया पडून, आपला अपराध केला आहे. मीच आपल्या पायांवर डोकं ठेऊन सगळ्यांना माझ्या करतां क्षमा करा, म्हणून पदर पसरतो. (तुकाबाईच्या पायां पडतो.)

तुका०—हा मानभावीपणा मला समजतो बरं. माझ्या पाया पडून काय उपयोग. वडिलांची गर्दन छाटायला तयार असलेला मुलगा, वेळीं प्रसंगीं वडिलांच्या कितीसा उपयोगी पडेल, हें दिसतंच आहे. इतरांच्या मुलांकडे पहा. आईबापांचा प्राण जायची वेळ आली तर स्वतःचा प्राण द्यायला तयार होतात. इथला प्रकारच निराळा !

शिवा०—माईसाहेब ! आईबापासंबंधानं मुलाचं जें जें कर्तव्य आहे, तें तें करण्यांत मी चुकेन, हें कालत्रयीं घडणार नाहीं.

शहा०—माझा शिवबा माझ्या संबंधाचं प्रत्येक कर्तव्य करण्यांत तत्पर आहे, अशी माझी खात्री आहे. समजा, उद्यां सुलतानाचा माझ्यावर राग झाला–(जासूद येतो.) कायरे ? कां आलास ?

जासू०—राजेसाहेब, पातशहाकडून हा हुकूम आला आहे. (हुकूम देतो.)

तुका०—(शहाजी हुकूम वाचतो त्यांस) काय आहे हुकुमांत ? कांहीं इथलीच कामगिरी आहे कां स्वारीबिरीवर जायचं आहे ?

शहा०—मला ताबडतोब विजापूरला बोलावलं आहे. कारण कांहीं लिहिलं नाहीं. पण पातशहाचा हुकूम; गेलं हें पाहिजेच.

शिवा०—(तंद्री लागून) तूर्त जाऊं नये. दगा आहे. मित्र म्हणविणारे गळा कापतील !

तुका०—पुत्र म्हणविणारे जर कापायला तयार झाले, तर मित्रांचं काय नवल !–बरं निघायचं केव्हां आणि कोण कोण ?

शहा०—मी तर जाणारच. तुझी इच्छा असली तर तूंही चल व्यंकूला घेऊन. काय नेम, किती दिवस विजापुरांत काढावे लागतील त्याचा !

शिवा०—पण तूर्त न जालं तर—

शहा०—शिवबा, हा पातशहाचा हुकूम आहे. गेलं हें पाहिजेच.

शिवा०—मग एवढं तरी करा. माझ्या कृत्याबद्दल, माझ्या पुंडाई-बद्दल–किंवा बंडाबद्दल म्हणा हवं तर–जर सुलतान आपल्याला जबाबदार धरूं लागला, किंवा आपल्याला अटक करून माझा बंदोबस्त करायला सांगू लागला, तर स्पष्ट सांगा, माझा मुलगा बहकला आहे. तो माझ्या ताब्यांत नाहीं. अगदी खरं सांगा, माझा मुलगा माझं ऐकत नाहीं. त्याला तुम्ही धरा, मारा–ठार करा–माझी हरकत नाहीं. आश्चर्य करूं नका. हा प्रश्न तुम्हांला होणार आहे. मी सांगितलं हेंच उत्तर द्या. गाफिल राहूं नका.

शहा०—शिवबा, हें काय तूं उगीच बरळतो आहेस ? माझ्या राजनिष्ठेबद्दल सुलतानाला केव्हांहि शंका येणं शक्य नाहीं. या सुलतानाला माझ्यामुळं बादशाही मिळाली आहे. तो माझ्यावर फिरणं, त्यानं दगा करणं; म्हणजे सूर्यानं पश्चिमेकडून उगवण्यासारखं आहे. माझ्यावर प्रसंग आला तर आदिलशाहीची दौलत-खर्ची घालीन, असं तख्तावर बसतांना त्यानं मला वचन दिलं आहे.

शिवा०—राज्यावर बसतांना दिलेलीं वचनं जर सगळे राजे पाळते, तर काय न होतं ?

पद. (चाल—अब रसीला प्याला०)

जर विषाचा प्याला नरपति हा। नाग जरी पय प्याला।
अधमाचि हरि प्राणा ॥ धृ० ॥ नृपतिवचनिं नर भुलता।
मूढमति अंध होत। खल-कृतिला मग फसता। मुकतचि
निज प्राणा ॥ १ ॥

शहा०—या सुलतानाच्या वंशवानें तरी हें खरं नाहीं. तो—

शिवा०—आपलं वचन पाळील म्हणता ?—बरं. माझे शब्द मात्र लक्ष्यांत ठेवा. (मुधोजी येतो.)

शहा०—कोण मुधोजी ! तारटं तयार आहेत ? बरं झालं आपलं काम अगोदर उरकून घेतलं, जेवण झाल्यावर आपण एकदमच घराच्या बाहेर पडूं. तूं पुण्याचा रस्ता धर, मी विजापुराला कूच करतो. आपले दोघांचे मार्ग निराळे आहेत, अगदी एकमेकांच्या उलट आहेत.

(जातात. पडदा.)

अंक १ ला—प्रवेश २ रा.

स्थळ—बाजी घोरपड्याच्या वाड्यासमोरची बाग.

(बाजी घोरपडे, देवराव आणि एक हुजऱ्या)

देव०—हे पहा घोरपडे, मेरी एक बात सुनो. देवडीच्या आसपास भिकाऱ्यांची बरीच गर्दी उसळली आहे. त्यापैकीं मुसलमान भिकारी वेगळे

काढून त्यांना जिलबी, मोतीचूर, बीसक्कर वगैरे चारा. हिंदुभिकाऱ्यांना उभेसुद्धां करूं नका. कडके लागावो नाहीं गेले तर, मुळींच गय करूं नका.

बाजी०—या विजापुरांत मुसलमान भिकारी फकीरावांचून कुणी येतच नाहींत. हिंदु भिकारीच फार येतात. त्यांतसुद्धां गोसावी जास्त.

देव०—या हिंदु गोसाव्यांच्या [illegible] आणि जटांना आग लावा. [illegible] हीसकून [illegible]. [illegible] फकीर [illegible] हरामखोरांना.

बाजी०—आणि फकिरांना ?

देव०—तें काय विचारायला पाहिजे? त्यांना [illegible] बोलवा, [illegible] बसायला [illegible]. [illegible] हो, [illegible] अवलीया [illegible] यांना असरं बोलून, गुलामपाण्यानं त्यांना [illegible] नका हो. ध्यान में रक्खो. चुकना मत् हं ! मुसलमान आहेत ! भिकारडे हिंदु नाहींत.

बाजी०—बरं तसा हुकूम देतो. पण देवराव,——

देव०—हें पहा, तुम्ही अद्याप मला त्या नांवानंच हांक मारता. वह भिकार नाम मत लेना मुझें फिर. मला नबाबजादा म्हणून नेहमीं म्हणत जा. ध्यान में रखना, सरदार घोरपडेसाहेब !

बाजी०—मी पुष्कळ आठवण ठेवतो हो, पण बघा, पहिल्यापासून आपल्याला देवरावअण्णा म्हणायची संवय, त्यामुळं असं होतं. आपलं मानकरीसाहेब नांव सुद्धां तोंडी येत नाहीं एकदम. हे बघा देवराव——

देव०—तेंच. तें तुमच्या डोक्यांत असं ठिरायचं नाहीं. म्हणा ' नबाबजादा ' म्हणा, नबाबजादा. '

बाजी०—नबाबजादे,

देव०—असं.—बोलाना आतां पुढं काय म्हणत होता तें.

बाजी०—हो. पुढं म्हणत होतो कीं, कांहीं पंडित ब्राह्मण येतील, त्यांचं काय करायचं ? त्यांना कांहीं दिलं पाहिजे. उगीच विथरवून उपयोग नाहीं. लेकाचे ओरड फार करतात.

देव०—करूं द्या ओरड हवी तितकी. डरना मत्. कोंडा सगळ्यांना नेऊन काळ्या कोठींत. त्यांचा गलबला ऐकूं जाऊ नये म्हणून मुसलमान मुल्लाकडून कुराण म्हणवा जोरजोरसे. मला कीं नाहीं, आपले हे वेदमंत्र आणि ते देवे का फेवे—ते ऐकले कीं डोकं फिरून जातं. त्यापेक्षां कुराण पढणं चालतं, तें ऐकणं गोड वाटतं !

बाजी०—पण देवराव !—नव्हे नबाबजादे ! तसं केलं तर उगीच आजच गोंधळ उडायचा. मी सांगितलं आहे त्यांना थोडी दक्षणा वाटायला.

देव०—छेः—छेः—छे: ! अशानं तुमचं आमचं पटायचं नाहीं. बरं निदान ऐसा करना, फकीराला जर एक एक मोहोर दिलीत तर दर ब्राह्मणाला एक एक कवडी वाटा. तुम्हांला वाईटच वाटत असलं तर चांगल्या मूठ मूठ वाटा ! खूष करो गुलाम को. समजे ?

बाजी०—कोण आहेरे ?—हो, तूं आहेसच बरोबर. यांनीं आतां सांगितलं तसं करा. समजलांस ? जा लौकर. (हुजऱ्या जातो.)—बरं देवराव,—नाहीं नाहीं चुकलो, पुन्हा चुकी होणार नाहीं. स्मरण ठेऊन नबाबजादाच म्हणेन.

देव०—माझ्या वडिलांनीं माझं हें असलं घाणेरडं नांव ठेवलं, यामुळं मला नेहमीं कमीपणा येतो. म्हणे देवराव ! त्यापेक्षां दाऊदखान ठेवलं असतं तर ?—पण छेः, सगळ्यांच्या अकला गेल्या होत्या खड्यांत माझ्या बारशाच्या वेळीं ! तोबा ! तोबा !

बाजी०—आतां मुलांचीं नांवं ठेवलीं आहांत ना मनासारखीं ?

देव०—अलबत्. पहिल्याचं नांव ठेवलं आहे महंमुद ! दुसऱ्याचं सबक्तगीन ! तिसऱ्याचं इस्मायलखां !

बाजी०—आणि मुलींचीं ?

देव०—मुलींची ठेवलीं आहेत, गोदी, यमी, बनी पाळण्यांत. पण मी हाक मारतो, फतिमा, अलिज्ञा, रेझिया !

बाजी—असं कां ? पाळण्यांतच हीं नांवं का ?

देव०—अहो घरांत ती ऐकेना. बाकी तिला सुद्धां मै बेगमबिबी ऐसे पुकारतें. अहो आपल्याला वाटत नाहीं, पण हिंदू नांवानं आपलं फार नुकसान होतं. तेंच शहाजी राजांचं पहाना; नांव मुसलमानी पडलं, वजीरी मिळाली. कांहीं आड आलं नाहीं. माझं जर असंच कांहीं नांव असतं, अल्लाउद्दीन जर माझं नांव असतं, तर मी आज केवढा मोठा झालों असतों. बहोतही बडा !

बाजी०—जाऊं द्या हो. झालेली गोष्ट कांहीं आतां बोलून येत नाहीं. असेना नांव देवराव ? आम्ही आपल्याला नबाबजादा म्हणतोच आहोंत. आजच्या मेजवानीच्या यादींत तुमच्या सूचनेप्रमाणं सगळयांचीं नांवं मुसलमानी हुद्दे किताब घालूनच लिहवलीं. पक्वान्नांसुद्धां सुचलीं तितकीं मुसलमानी नांवें ठेविलीं आहेत. लाडूला लड्डु, जिलबीला जेलबी, शिऱ्याला बिर्याणी, दारूला शराब म्हणायचं, म्हणून सगळयांना ताकीद दिली आहे.

देव०—आच्छा–बहोत आच्छा. जेवायला बसताना उठताना ‘ हरहर महादेव ’ म्हणायचं नाही, ‘ या अल्लापरवरदिगार ’ ‘ अल्लाहो अकबर ’ असं कांहीं तरी म्हणायची वहिवाट पाडली पाहिजे. मी आपल्या घरांत हिंदु देवाचं नांवसुद्धां घेऊं देत नाहीं.

बाजी०—हं ! असं ! ठीक.

देव०—पण आपली मंडळी आली का सगळी ?

बाजी०—हो केव्हांच. जो तो आपली जागा धरून आहे. शहाजी आल्याबरोबर एकदम हल्लान् काय.

देव०—बहोत आच्छा ! मग इशारा होताच त्याला पकडतीलच ते ?

बाजी०—असं ठरवलं आहे, कीं देवडी ओलांडून तो आंत येताच, आपण स्वतः सामोरं जायचं. म्हणजे अर्थातच तो घोड्यावरून खालीं उतरेल.

देव०—बराबर है.

बाजी०—लागलीच तुम्ही, इकडच्या तिकडच्या गप्पा मारीत, त्याचा हात हातांत घेऊन चालू लागायचं.

देव०—कोण मी ?

बाजी०—हो आपण—आपणच. नबाबजादे, आपणास एवढी कामगिरी केली पाहिजे.

देव०—छे: बुवा, आपल्याला नाहीं व्हायचं तें काम. कधीं त्याच्या हाताला हात लावण्याचा प्रसंग आला तर छातींत धडधड होतं माझ्या ! हां पहा, तुमची आठवण होतांच कशी धडकी भरली ती. आतांच मी आपल्या वाड्यांत जाऊन बसतो.

बाजी०—अहो थांबा, जाता कुठं ?—नबाबजादे, अफजलखां, समशेरखां, म्हणवून घ्यायला पाहिजे; आणि एवढंही काम होत नाहीं ? कांहीं तलवार मारायला सांगत नाहीं. थांबा, तुम्हीच हें केलं पाहिजे. काम कांहीं माझं एकट्याचं नाहीं. तुमचं,—माझं,—मुस्ताफाखानांचं,—सगळ्यांचच आहे.

देव०—अहो तें खरं, पण आम्ही मुत्सद्यांनीं नुसतं कारस्थान करायचं. तें पार पाडायचं काम आमच्या बापाच्यानंही व्हायचं नाहीं. तें काम तुमचं तरवारबहाद्दरांचं ! मेरा नहीं.

बाजी०—मग आलांत कशाला इथं ? एवढा लग्नविधि पार पाडायला नको ?

देव०—तुम्ही लग्नविधि म्हणता, पण मला तो प्रेतविधि दिसतो आहेना?

बाजी०— प्रथम आग लावली आपण. शिवाजीच्या धुंडाईला महाबीरराजांची आंतून फूस आहे,—विजापूरची आदिलशाही उलथून पाडण्याच्या मुळाच्या कटाला आंतून त्याची मदत आहे,—तो त्याला दारूगोळा हत्यारंपात्यारं पुरवीत असतो, अशी सुल्तानाशीं चुगली केली आपण, आणि आता मागं राहतां !

देव०---पण ही चुगली केली कुणाच्या, तुमच्याच सांगण्यावरून ना ? शहाजीचा दरबारांतला मान, सुलतानाजवळचं त्याचं वजन, तुम्हांला होईना सहन; म्हणून आमच्यासारख्याकडून परस्पर सुलतानाचे कान भरलेत आणि हा घाट घडवून आणलांत. खूप किया ! असाच पाहु-ण्याच्या हातून विंचू मारीत जा.

बाजी०---अहो नवाबजादे, पडद्याआडच्या गोष्टी अशा उघड्या हवेंत कडबडायच्या नसतात—या पहा, घोड्याच्या टापा ऐकूं येऊं लागल्या ! तुम्ही होतां पुढं कीं नाहीं ?—नच्वेपेरी ! लक्ष्यांत ठेवा, या बाजी घोरपड्याशीं गाठ आहे. शहाजीला गुपगणानं पकडायचा कां असेना पण सुलतानाचा राजरोस हुकूम आहे. ऐका, टापा अगदीं जवळ येत चालल्या. काय ? होता कां नाहीं पुढं ?—काय नवाबजादे ?

देव०---क्या करना मेरी मा. होतो पुढं, तुम्ही तरबारबहाद्दर जेव्हां तेव्हां आम्हांला असला दंडुका दाखवता. या अल्ला !

बाजी०---बरं, चला व्हा पुढं. ते पहा, शहाजीराजे आपल्याला पाहताच घोड्यावरून खालीं उतरलेहि. धांवा अगोदर पुढं जलदी, नवाबजादे ! (देवराव हात जोडून धांवत सुटतो.) या—या—राजेसाहेब ! (शहाजी व देवराव येतात. आंत कोणी—दगा दगा, शहाजीराजे दगा,—असें ओरडतो.)

शहा०---दगा ! (घोरपडे खूण करतो. दहा बारा लोक येऊन शहाजीला पकडूं लागतात.) खरोखरच दगा. मला पकडायला तुमचे सगळ्यांचे पितर खालीं उतरले पाहिजेत. (लोक त्याच्या अंगावर घसरतात. तो बऱ्याच जणांना आदळतो.)

बाजी०---राजेसाहेब, दंगा करूं नका. हे पातशहाचे लोक आहेत. पातशहाच्या हुकमानं आम्ही तुम्हाला कैद करीत आहोंत.

शहा०---पातशहाचा हुकूम ? पातशहाच्या हुकमानं तुम्ही मला कैद करतां असं !

बाजी०--अलबत, पातशहाच्या हुकमानं.

शहा०--पातशहाचं नांव घेतलंत म्हणून मी मुकाट्यानं कैद व्हायला तयार आहे. नाहीं तर असल्या शेंपन्नास घुंगुरट्यांना आतांच नरकाचा रस्ता दाखवला असता. मी तुमचा कैदी आहे. चला घेऊन सुलतानासमोर.

बाजी०--राजेसाहेबांचा माझ्याबद्दल उगीच गैरसमज व्हायचा. मी आपला अगदीं जवळचा नातेवाईक. लांबचं का असेना; पण चुलत्या-पुतण्याचं नातं. स्नेहसंबंध तर विचारायला नको. मला उगीच वाईट-पणा आला. शिव ! शिव ! शिव !

देव०--मलाही उगीच वाईटपणा आला. राजेसाहेब, मला कांहींएक माहीत नव्हतं हो यांतलं. अगदीं अल्लाकी कसम ! मी आपल्यासारखाच इथं जेवायला आलों होतों. माझ्यावर उगीच राग नसावा.

शहा०--देवराव, माझ्या सगळं लक्ष्यांत आलं. पुरे झालं.

बाजी०--पातशहाचा हुकूम ऐकला; आणि मला असा संताप आला विचारूं नका. असं वाटलं, ज्या शहाजीराजानं या सुलतानाला शोधून आणून तक्तावर बसवलं, ज्याच्या तरवारीमुळें या आदिलशाहीचा एवढा विस्तार झाला, ज्याच्या राजकारणामुळं या दौलतीनं मोगलसत्तेशी-सुद्धां टक्कर दिली, त्याच शहाजीराजाशीं हा हरामखोर सुलतान बेइमान झाला !

शहा०--बाजी, खबरदार पातशहाबद्दल अपमानाचा शब्द काढाल तर. मी जरी कैदी असलों, निःशस्त्र असलों, तरी पातशहाला हरामखोर म्हणणाराचं नरडं नुसत्या दातांनीं काडकन् फोडून टाकीन.

बाजी०--असल्या सोज्ज्वळ राजनिष्ठेचं हें फळ ! म्हणून तर वाईट वाटतं; आणि पातशहाचा असा राग येतो--

शहा०--बाजी, एक शब्दसुद्धां जास्त बोलूं नका. मला अगोदर, कैद कां केलं, तें विचारायचं आहे.

बाजी--पण मला वाटतं, अगोदर चार घास खाऊन नंतर तिकडे जाणं बरं. आपण कैदी अहां तरी आपल्याला आज माझ्याइथं मेजवानी ! या गरीबाच्या घरीं हात भिजला, तर तेवढं तरी समाधान माझ्या मनाला वाटेल. मग काय ? सांगूं वाढायला ? ताटं मांडून तयार आहेत.

शहा--बाजी, तुम्हाला काय म्हणावं तेंच मला कळत नाहीं. लक्षांत ठेवा, मीं एकादा साधाभोळा मनुष्य नाहीं. तुमच्यासारखीं शेंकडों सुतं नुसत्या फुंकारीसरशीं मी पळविलीं आहेत. असलीं मानभावी भाषणं जों जों तुह्मी बोलतां, तों तों तुह्मीच आपल्याला जास्त जास्त काळेपणा आणतां. मी तुमच्याइथं चार घास खावेत अशी जर तुमची खरोखरच इच्छा असती, तर मेजवानी झाल्यावरसुद्धां तुम्हांला मला कैद करतां आलं असतं.

बाजी०--आमचा तोच विचार होता. पण आतांच पहा. 'दगा' 'दगा' असं ओरडून आपल्याला कुणी इशारा दिला, आणि आपणही एकदम पळूं लागला.

शहा०--असले विचार--असले पळण्याचे विचार, मनांत येण्याइतका मी कमअस्सल नाहीं. सुलतान कैद करतो म्हणून मी पळणार ? तुझ्या-सारख्या निमकहराम--बेइमान--

बाजी०--गप्प बैस. मुलाच्या बंडाला मदत करून पातशहाशीं दगल-बाजी करणारा तूंच निमकहराम--तूंच बेइमान ! शिपाई हो, बघता काय ? या राजेसाहेबांना मोकळे नेऊं नका. काढण्यांनीं--जेरबंदांनीं आवळून घेऊन चला. (जातो.)

देव०--राजेसाहेब हा या नवाबजाद्याचा मुजरा घ्या. आपण जेव्हां तेव्हां मला हिडिसफिडिस करीत होता, पण त्याची आठवण द्यायची ही वेळ नाहीं. आमच्यासारखीं चांगलीं माणसं दुःखाच्या वेळीं कुणाला हिणवीत नसतात.--कायरे बांधलं का नीट आवळून ? सुटून नांहीं ना जाणार ? अश्री राजेसाहेब, गरीबपर मेहरनजर रखो. (देवराव जातो. शहाजीला शिपाई घेऊन जातात.)

प्रवेश ३ रा.

स्थळ–पुणे–शिवाजीच्या वाड्यांतील एक दिवाणखाना.

(सईबाई चित्रपट पहात आहे.)

सई०—(स्वगत) हा चित्रपट म्हणजे एक आरसाच आहे. पुराणकाळीं जे पुरुष आपल्या पराक्रमानं प्रख्यातीस आले, आणि ज्या स्त्रिया आपल्या पातिव्रत्यानं प्रकाशित झाल्या, त्यांचीं चरित्रं चित्ररूपांनीं दाखवणारा हा चित्रपट मला बोलका आरसाच वाटतो.

पद. (चाल–कान रहे आपने)

कां न रुचे अनुभवास। रुचिर मार्ग हा हितकारी। सुख शोक कथा प्रतिमा रूप ॥ ध्रु० ॥ जो जो नव समय येत। शोधिताचि साम्य त्यांत। रंग कळे कैसा। दिसति मम नेत्रां। सुख शोक कथा प्रतिमारूप ॥ १ ॥

(जिजाबाई येते.)

जिजा०—मुली, तूं चित्रपट का पहाते आहेस? अहाहा! हीं कृष्णाच्या बाळपणचीं चित्रं! या पहा, या गौळणी कृष्णाच्या विरुद्ध तक्रारी करण्याकरितां यशोदेकडे आल्या आहेत. माझ्याकडेही शिवबाबद्दल मावळी बायका अशाच तक्रारी आणित असत.

सई०—श्रीकृष्णाच्या चरित्रांत आणि इकडच्या चरित्रांत किती विलक्षण हें साम्य!

जिजा०—शिवबाच्या खऱ्या चरित्राला आता कुठं प्रारंभ झाला आहे. धर्म रक्षणाचं व्रत ज्यांनीं अंगिकारलं आहे, त्यांच्या चरित्रांत सारख्याच सारख्या गोष्टी, सारखेच सारखे प्रसंग आढळणारच. मुली, तुझ्या पतीच्या जिवावरही असेच प्रसंग येण्याचा संभव आहे. तो साहसी वीर आहे आणि तूंही साहसी वीराची पत्नी आहेस हें विसरू नकोस.

सई०—आईसाहेब, मी ही गोष्ट कशीवरं विसरेन ? तिकडचे विचार काय आहेत, तिकडचा स्वभाव कसा, त्यांचे बालमित्र कोण आहेत, आपणं त्यांना कसं प्रोत्साहन देत आलां, हें मी अष्टोप्रहर पहात आहे- मग ही गोष्ट मी एक क्षणभर तरी विसरेन का ? मी साहसी विराची पत्नी आहे, यावद्दल मला अभिमानच वाटतो.

जिजा०—मुली, एकावेळीं मलाही असाच अभिमान वाटत असे. शिवबाच्या वयांत राजे देखील शिवबाप्रमाणं साहसी वीर होते. या खानाला चुरड, त्याला धुळीला मिळव; ही पातशाही बुडव, ती उखडून टाक; अशा महत्वाकांक्षेनं राजानींही निजामशाहींत धुमाकूळ घातला. माझं माहेरचं राज्य - मुसलमानांनीं बुडवलेलं जाधवांचं सिंहासन—राजे परत घेतील, अशा आशेचीं किरणं माझ्या हृदयांत पडूं लागलीं. पण काय ! दैव आडवं आलं ! पातशहानं फासा टाकला ! राजे पातशाही सरदार बनले ! वजीर होऊन पातशाही राज्य चालवूं लागले ! पण खरेखुरे राजे व्हायच्या ऐवजी ' राजा ' हा किताब मिळून नांवाचे मात्र राजे बनले.

सई०—पण आजपर्यंत तरी कोणत्या मराठा सरदाराला वजीरी मिळाली होती !

जिजा०—मिळाली नव्हती खरी, पण ती मिळण्याची हांव राजांनीं कां धरावी, ती वजीरी- ती पातशाही नोकरी—ती सोनेरी बेडीच. शेवटीं त्यांच्या आणि शिवबाच्या ताटातुटीला कारण झाली.

सई०—ती कशी ?

जिजा०—पतीला पतित पाहून कोणत्या पत्नीला दुःख होणार नाहीं ? माझ्या पतीला—माझ्या राजांना हालअपेष्टांची भीति वाटूं लागली ! डाम-डौलाची हाव सुटली ! सुखाच्या चैनीच्या गोष्टी आवडूं लागल्या ! माझ्या-डोळ्यांपुढें विजयनगरची अपेक्षा दिसत होती. माझ्या कानांत जाधवांचं वैभव रडत होतं. माझ्या मस्तकांत वाडवडिलांचं स्मरण धडपडत होतं. मी चैन भोगूं ? डामडौलांत मिरवूं ? परांच्या गाद्यावर लोळूं ? माझ्या

शिवबाला असल्या गुलामगिरीचा घडा देऊं ? मला स्वप्न पडलं. दृष्टीला प्रत्यक्ष दिसलं. शिवबाचं अवतारी स्वरूप प्रकाशित झालं. वाटलं, शिवबाच्या जोपासनेचं राजांचं काम संपलं. पतिप्रेम दूर लोटलं, लोकापवादाकडं पाठ फिरवली, आणि पुण्याची—खरोखर पुण्याची वाट धरली !

सई०—मग राजांना काय वाटलं ? खरोखर त्यावेळीं त्यांच्या मनाची काय स्थिति झाली असेल ?

जिजा०—त्यांना काय वाटायचं ?—पण तुला ही माझी कर्मकथा काय करायची आहे ? जगांत स्थिति निराळी दिसली तरी अंतर्यामीं निराळ्या गोष्टी असतात. बाराव्या वर्षापासून शिवबाला दूर ठेवा, अशी मुळीं भवानीची आज्ञा होती. त्या आज्ञेप्रमाणं वागणं तिकडचं कर्तव्यच होतं. निराशेच्या अंधार कोठडींतून महाराष्ट्राची सुटका करण्याकरितां—हा बघ शिवबा आला ! (शिवाजी, पेशवे, सुरनीस, डबीर, सरनोबत वगैरे मंत्री व तानाजी येतात.)

शिवा०—आई, विजापुराहून पत्र आलं आहे. त्याचा निकाल आतांच्या आतां लावला पाहिजे. पत्र खासगीच आहे, पण त्याच्या अंतर्यामीं राजकारण आहे.

जिजा०—कुणाचं पत्र आहे ?

शिवा०—पत्र बाबांचं आहे. पातशहानं दगा करून अंधार कोठडींत ठेवलेल्या माझ्या बाबांचं पत्र आहे.

जिजा०—काय दगा !

शिवा०—हो, दगा.

जिजा०—दगा झाला असं त्या पत्रांत आहे ?

शिवा०—पत्रांत कसं असेल ? पण बाबांना अंधारकोठडींत ठेवलं आहे, तें दग्यावांचून नाहीं; आणि त्यांनीं हें पत्र लिहिलें आहे, तेंही जबरदस्तीवांचन नाहीं.

जिजा०—पेशवे, वाचा पाहूं पत्र. (पेशवे जिजाईंना पत्र वाचून दाखवितो.)

शिवा०—(स्वगत) असह्या दुःखद प्रसंगीं देखील आईची किती ही शांतवृत्ति ! ही पूर्वजन्मीची पुण्याई, का या जन्मीची तपश्चर्या ?

पद--(चाल-करुण क्यौं बिसारी.)

तुलना ना गुणांना । त्रिभुवनांत ही माता ॥ सुलभ मार्ग
मज व्हाया । भवरि या आली ॥ धृ० ॥ योगाचें ज्ञान
ध्यान । किंवा हें तपसाधन । विविधकला सरिता ही ।
माता अधिकारी ॥ १ ॥

जिजा०—सात दिवसाच्या आंत तूं स्वतः पातशहाला शरण जाऊन जर त्याची क्षमा मागितली नाहींस, तर आठव्या दिवशीं राजांना—तुझ्या वडिलांना—भिंतींत चिणून टाकणार, असंच ना ?

शिवा०—होय.

जिजा०—बरं, या गोष्टीला आज किती दिवस झाले ?

शिवा०—मुदतीपैकीं दोन दिवस पत्र यायला लागले तेवढेच.

जिजा०—उत्तर जायला किंवा तूं स्वतः जाणार असलास तर तुला पोहोंचायला आणखी दोन दिवस लागतील. पण तूं काय करायचं ठरविलं आहेस ?

शिवा०—तुझा विचार घेतल्यावाचून कांहींच ठरवायचं नाहीं, अशी माझी नेहमीचीच रीत आहे. मला समजूं लागल्यापासून कोणतीही महत्वाची गोष्ट तुझ्या संमत्तीवांचून मी कधींतरी केली आहे कीं ? आई, बोल, मी काय करूं ? तुझी जी कांहीं इच्छा असेल, ती मी पुरी करीन.

जिजा०—बाळ! माझी प्रत्येक इच्छा पुरी करायला तूं तत्पर आहेस, हें ठीकच आहे. पण याप्रसंगीं माझी इच्छा काय आहे, याचा उच्चारसुद्धां मी करणार नाहीं, किंवा तुला कांहीं सल्लाही देणार नाहीं.

शिवा०—कां बरं ? मागच्या कोणत्याही प्रसंगीं जरी तूं मला सल्ला दिली नसतोस तरी मला वाईट वाटलं नसतं. पण असल्या भयंकर बिकट प्रसंगीं तुझी नुसती सल्लाच नव्हे, तर तुझी जी कांहीं आज्ञा असेल तीच पाळणं माझं कर्तव्य आहे. आई, बाबांच्या विभक्तपणापासून आतांपर्यंत आपल्यावर अगणित आपत्ति आल्या, पण भवानीच्या कृपेनं आपण त्यांमधून पार पडलों. त्यावेळीं फक्त राष्ट्रकार्यावर लक्ष ठेवून, त्या आपत्तींचं निवारण केलं. पण सध्याचा प्रसंग निराळा आहे. राष्ट्रकार्य आणि पितृऋण या दोहोंच्या कैचींत मी सांपडलों आहे. तूं आणि बाबा जरी निराळे रहात असलां, तुमची वर्षांनवर्षं जरी भेट होत नसली, तुमचे एकमेकांचे स्वभाव जरी उत्तरध्रुव दक्षिणध्रुवा इतके दूर असले, तरी तुमचीं हृदयं एक आहेत, तुम्ही पतिपत्नी अहां, तुम्ही एकरूप अहां बाबांच्या तळमळणाऱ्या जीवाकडे यावेळीं मला लक्ष्य पुरवलं पाहिजे, तुझ्या पोळलेल्या मनःस्थितीचा यावेळीं मी विचार केला पाहिजे.

जिजा०—बाळ, तुला माझ्याबद्दल काळजी करायला नको. काळजीशीं झगडतां झगडतां माझा जन्म गेला. पण बाळ, तुझ्या सावत्र आईवर आणि बाळ व्यंकूवर हा केवढा प्रसंग आहे, याचा विचार कर. विजापुरांत, त्या काळसर्पांच्या बिळांत एकटीं माणसं ! तीं बिचारीं कितीतरी घाबरून गेलीं असतील! आपल्याला जगांत कुणाचा आधार नाहीं असं त्यांना वाटत असेल ! सुखाचे जीव ! दुःखाचं कधींही स्वप्न नाही ! ऐषआराम, चैन, याशिवाय कधीं विषय नाहीं ! त्यांच्या हृदयांत केवढा वणवा पेटला असेल ! त्या वणव्यांत त्यांचीं मनं रानोमाळ पळत असतील ! शिवबा, जा जा त्यांना सोडव.

शिवा०—मग आतां जातो आणि त्यांना सोडवतो. सात दिवसांच्या आंत बाबांची सुटका करून त्या मायलेकरांचे चेहरे आनंदानं खुललेले तुला दाखवतो.

जिजा०—हें सारं केलंस तरच तूं माझा पुत्र !

शिवा०—हो हो, तरच मी तुझा पुत्र ! तरच मी शहाजीराजांचा पुत्र !

जिजा०—मग तूं आतां काय करणार ?

शिवा०—मी ? बाबांची सुटका करणार.

जिजा०—कशी ? पातशहाला शरण जाऊन ?

शिवा०—पातशहाला तर मी कधींच शरण जाणार नाहीं.

जिजा०—मग राजांची सुटका कशी करणार ? युद्ध करून ? तूं विजापूरावर स्वारी का करणार ?

शिवा०—मी जर एकादा अविचारी, अदूरदर्शी शिपाई असतो तर यावेळीं विजापुरावर स्वारीही केली असती. विजापुरावर स्वारी करण्या-इतकी आज माझी तयारी नाहीं, पण जरी असती, तेवढं सैन्य दारुगोळा जरी माझ्या संग्रहीं असता, तरी मी ती केली नसती. कारण बाबांना सोडवणं हें माझं स्वतःचं काम आहे. या करतां मी स्वतःचा प्राण देईन, पण सैन्यांतल्या एखाद्या यःकश्चित शिपायाचाही बळी देणं मला अन्यायाचं वाटतं.

तान्हा०—महाराज ! आम्हाला न्याय अन्याय कांहीं समजत नाहीं. आपल्या करतां मरायला आमच्यापैकीं एकूण एक असामी तयार आहे.

शिवा०—तुम्ही माझ्याकरता मरायला तयार असलां म्हणून याप्रसंगीं मी तुम्हाला मरणाच्या तोंडाशीं देऊं ? छेः छेः, ही गोष्ट शक्यच नाहीं. शहाजीराजे तुमच्या करितां—या महाराष्ट्राकरितां—कैदेंत गेलेले नाहींत. तसं असतं तर तुमचा बाणा योग्य होता. पण तशी गोष्ट नाहीं. ते माझ्यामुळं अंधार कोठडींत हाल काढीत आहेत. त्यांची मुक्तता मलाच केली पाहिजे.

तान्हा०—महाराज ! आपण म्हणजेच महाराष्ट्र !

शिवा०—मी म्हणजे महाराष्ट्र इतकी जर तुमची निष्ठा असेल तर असं करा, बाबांना सोडवतांना मी संकटांत पडलो तर त्यावेळीं माझ्या-करतां प्राण द्या, मग तर झालं ? आई, आज संध्याकाळीं मी विजापूरला प्रयाण करणार.

ताना०—महाराज आपला निश्चय ठरलाच, तर मग या तानाजीचाही निश्चय ऐका. जिथं आपण तिथं मी ! विजापूरच्या वाटेनें आपल्या घोड्याबरोबर माझाही घोडा दौड करताना आपल्याला दिसेल. हा निघालों पहा तयारीला. (तानाजी जा तो.

सई०—(स्वगत) धन्य धन्य हा पुरुष ! म्हणून असे तानाजीसारखे एकनिष्ठ सेवक याला लाभले !

जिजा०—(स्वगत) सईचे डोळे शिवबाकडे सारखे लागले आहेत. जणू काय आपल्या दृष्टीनें त्याच्या चरित्राचं सारं रहस्य ती उकलित आहे.

पेश०—आईसाहेब ! महाराजांना जाऊ देऊं नका.

जिजा०—नाहीं. शिवबाला स्वतः विजापूरला जायलाच पाहिजे. त्या पलिकडच्या दिवाणखान्यांत चला, म्हणजे तो स्वतः का जातो आहे तें मी तुम्हांला सांगत्यें. (जिजाबाई, पेशवे, वगैरे जातात. शिवाजी व सईबाई राहतात.)

शिवा०—थोर माणसांच्या मनाचा मोठेपणा सागराप्रमाणं अफाट असतो; आणि त्याचं धोरणही त्यांच्या धुरिणत्वाला शोभण्यासारखंच असतं. तुला मला इथं ठेऊन आई आंत गेली !

सई०—ते माझ्या लक्षांत आलं. तानाजीच्या तडफेला कोणत्या स्फूर्ति देवानं चेतना दिली तें पहावं म्हणून मी सहज समोर पाहिलं. तोंच आपली ही, दुसऱ्याची मनं आकर्षण करून घेणारी मर्दानी मूर्ति माझ्या दृष्टीस पडली ! माझे नेत्र तिथून हालतच ना. आपल्याशीं दोन शब्द बोलावेत, असं एकदम मनांत आलं !

शिवा०—आणि तो तुझ्या मनाचा हुकूम तुझ्या चेहऱ्यावर लिहीला. आतांच आई देखतहुकूम दूर गेली. आई तर गेली; आतां आम्हांला काय हुकूम आहे ?

सई०—हुकूम कसला ? एक मागणं आहे. विजापुरास आपण मला बरोबर घेऊन जावं.

शिवा०—हें विलक्षणच मागणं ! शांततेच्या वेळीं ऐष-आराम चैन करण्याकरितां ' बरोबर न्या ' म्हणून आर्जव करणाऱ्या बायकांच्या कथा ऐकत होतों, लढाईवर जातांना तरवारीचे हात नवऱ्यांना दाखविण्याकरतां ' मला बरोबर न्या ' म्हणून हट्ट धरून बसलेल्या बायकांच्या गोष्टी ऐकत होतों; पण अशा फिकीरीच्या प्रसंगीं अशा अज्ञातवासाच्या वेळीं ' मला बरोबर घेऊन चला ' असं म्हणणारी स्त्री तूं एकच मला आढळलीस.

सई०—एकच का ? द्रोपदी नव्हती का अज्ञातवासांत पांडवांबरोबर. तिला नाहीं कां अज्ञातवासाचं महत्त्व कळलं ?

शिवा०—द्रोपदीला अज्ञातवासाचं महत्त्व कळत होतं. पण एकट्या द्रोपदीमुळं कीचकवधाच्या वेळीं तो अज्ञातवास फुकट जाऊन पुन्हां बारा वर्षं वनवास पांडवांच्या नशीबीं येणार होता.

सई० —येणार होता, आला तर नाहींना ? द्रोपदीसारखी तामसी वृत्तीची स्त्री सुद्धां, पांडवांच्या गुप्तपणाचा स्फोट करायला कारण झाली नाहीं, मग माझ्यासारख्या गरीबबापड्या स्त्रीची आपल्याला अडचण व्हायचं कारणच नाहीं.

शिवा०—ती पुराण काळची गोष्ट होती. त्या वेळीं धर्मयुद्ध जिवंतपणानं नांदत होतं. सत्याच्या पायावर राजकारणाचं मंदिर शोभत होतं. नीतीचं--धर्माचं राज्य गाजत होतं.

सई०—पण पतिव्रतांची अब्रू भर दरबारांतही घेतली जात होती.

शिवा०—कबूल ! पण त्या पतिव्रतांच्या तेजानं देखील दुर्जनांच्या अंगाची लाही होत होती. पांडव साहसी होते, आणि द्रोपदीही साहसप्रिय होती.

सई०—मग आपण साहसी अहांना ? मी आपली सहचरिणी आहे. आपल्याबरोबर उडी घ्यायला कचरेन का ?

शिवा०—विजापुर म्हणजे हा वाडा नव्हे, सिंहाचा जबडा आहे.

सई०—सिंहाचा जबडा सुद्धां दोन सशक्त हात तेव्हांच पिंजून टाकतात.

शिवा०—काळाच्या दाढेंत उडी घ्यायची आहे-प्राणावरचा प्रसंग आहे !

सई०—या माझ्या प्राणावर प्रसंग आहे; म्हणूनच मी येते आहे. सावित्रीप्रमाणं काळाचा पिच्छा पुरवून त्याच्या दाढेंतून मी माझा प्राण परत आणीन.

शिवा०—या तोंडाच्या गोष्टी नाहींत, हातांनीं कृती करावी लागते.

सई०—पण हातांनीं कृति करायला बांधलेले हात तर मोकळे केले पाहिजेत ना ? बायकांचे हात पाय बांधून ठेवायचे, त्यांना कर्तबगारीचं कोणतंही काम करूं द्यायचं नाहीं; आणि मग म्हणायचं ' बायकांची अक्कल चुलीपुरती ' ! त्या तोंडानं बडबडतील हातांनीं कृती मात्र व्हायची नाहीं.

शिवा०—योग्यता दाखविली म्हणजे संधी मिळते.

सई०—पण संधी मिळाल्यावाचून तरी योग्यता कशी दिसावी ?

शिवा०—थोडक्यांत परीक्षा ! एकच प्रश्न.

सई०—उत्तर बरोबर आलं तर संधी मिळेल ?

शिवा०—संधी ? नुसती संधीच नव्हे, लागलीच कामगिरीही मिळेल. हा आतांचा प्रश्न घे. पातशहानं बाबांना अंधारकोठडींत ठेवलं आहे; आणि मी आठदिवसांच्या आंत पातशहाला शरण जाऊन माझ्या अपराधाबद्दल क्षमा मागितली नाहीं तर पातशहा बाबांना भिंतींत चिणून ठार करणार ! मी शरणही जाणार नाहीं, आणि क्षमाही मागणार नाहीं. आणि बाबांची तर सुटका झाली पाहिजे. बोल उत्तर अगदीं जलद.

सई०—बोला काय ? हें राजकारणाचं कोडं आहे. मुत्सद्दीपणाचा डाव आहे. याचं उत्तर मी कसं देऊं ?

शिवा०—कसं देऊं ? या प्रश्नाचं उत्तर बरोबर आलं तरच करार कबूल, नाहीं तर रद्द.

सई०—असं ? मग ऐका उत्तर. मी ही मुत्सद्दीपतीची पत्नी आहे—मी म्हणते विजापुरास न जातां इथूनच शहाजीराजांना सोडवतां येतं.

शिवा०—तसा संभव असतां तर मी तेंच केलं असतं.

सई०—मी म्हणते तसं इथूनही करतां येईल. विजापुरच्या सुलतानाला आपण शह देऊं या. आपण नुसते इथून डाव टाकू.

शिवा०—तूं काय डाव टाकायचा म्हणतेस, माझ्या लक्ष्यांत येत नाहीं.

सई०—आतां येईल. शह कुणाकडून द्यायचा त्याचं नुसतं नांव उच्चारलं कीं, आपल्या सारं लक्ष्यांत येईल. दिल्लीच्या पातशहाचा—शहाजाहनचा शह द्यायचा.

शिवा०—अस्सं !

सई०—पुष्कळ दिवसांपासून शहाजहानच्या मनांतून विजापूर आणि गोवळकोंडा या दोन्ही पातशाही काबीज करायच्या आहेत; पण शहाजीराजांनींच आतांपर्यंत त्याची डाळ शिजूं दिली नाहीं. शहाजीराजे विजापूरच्या दरबारीं आहेत, तोंपर्यंत आपल्याला दक्षिणेकडे वांकडी नजर करून पहातांही येत नाहीं, हें शहाजहान खूप समजून आहे. शहाजीराजांच्या अंगीं कर्तुमकर्तुम् शक्ति आहे, आणि आपणही दक्षिणची दहशत आहां, अशी शहाजहानची खात्री आहे. तेव्हां शहाजीराजे आपल्याला मिळण्यासारखे आहेत, असा जरी त्याला नुसता वास लागला, आणि आपलीही मदत मिळेल, असं नुसतं आश्वासन आपण जरी दिलंत, तरी तो या प्रसंगीं आपण सांगाल ते करील. विजापुरावर स्वारी सुद्धां करील. या खोखोच्या डावांत आपण शहाजहानला खो द्यावा.

शिवा०—शाबास ! शाबास ! (हृदयाशीं धरून) या वेळीं तुला काय बक्षीस देऊं ? (चुंबन घेऊन) तुला कुठं ठेऊं असं मला झालं आहे ! हा महाराष्ट्र बेटा लहान आहे, ही पृथ्वी अगदीं अपुरी आहे, हें ब्रह्मांड अत्यंत अरुंद आहे, हे माझं हृदय–

सई०—अगदीं पुरेसं आहे. त्याचा एक चिमुकला कोपरा देखील मला जन्मोजन्म खेळायला पुरेसा आहे.

पद. (हां मोरा संय्या०)

हा हृदयिचा जिवाचा झोला । झुलविता नवरंग सुखाला ॥ धृ० ॥ तोचि गडे मज त्रिभुवन भासे । झुलता जीव निमाला ॥ १ ॥

शिवा०—अगोदर आईला बोलावूं दे.–आई !

सई०—जरा थांबायचं गडे.–उत्तर बरोबर आलंना ?

शिवा०—अगदीं बरोबर. स्वतः परीक्षकाला सुटलं नव्हतं हें कोडं ! ही तुझी मसलत मोठ्या मुत्सद्यालाही तोंडांत बोट घालायला लावील.

सई०–कांहींतरी बोलायचं झालं! कां उगीच गरीबाची थट्टा करायची ?

शिवा०—गरीब ? असले गरीब जर पांचच मिळाले तर या दख्खनच्या पांच पातशाहीच्या पंचप्राणांना गचांडीच मिळेल की. आईला ही मसलत ऐकूं दे, पहा ती तुझी पाठ थोपटते की नाहीं. खरंच सांग, आईप्रमाणं, तूं मला आतांपर्यंत सल्लामसलत कां दिली नाहींस ?

सई०—आपण आतांपर्यंत विचारली कां नाहीं ? विचारल्यावांचून कोण देतं ? ज्याला त्याला थोडा तरी मान आहे. आतांच समजा मला काय वाटतं तें मी बोललें असतें, आणि आपण जर ‘ आहांत ठाऊक आम्हांला उपदेश करणाऱ्या ’ ह्मणून टोला दिला असतात, तर आह्मांला तोंडांत मारूनच घ्यावी लागली असती किनई.

शिवा०—पण मी असं बोललोंच नसतों आधीं.

सई०—आईसाहेब म्हणाल्या असत्या ‘ लहान तोंडी मोठा घांस कुणी कशाला हवा ’ म्हणून !

शिवा०—हें तर अगदी खोटं. आई कधींच असं म्हणाली नसती, तुला पक्कं ठाऊक आहे. शिवाय असली सफाईची मसलत ऐकून तर ती आणि मी दोघंही गार झालों असतों.—आई ! आईग !—

सई०-मला विजापुरांत बरोबर न्यायचं ठरलं आहे, ध्यानांत असूं द्या.

शिवा०—आई ! अग आई ! (जिजाबाई वगैरे मंडळी येतात.)

जिजा०—काय बाळ ?

शिवा०—कांहीं नाहीं.—रघुनाथपंत, तुम्ही शहाजहानच्या छावणींत वकील म्हणून जायची तयारी करा. पातशहाला सांगायचं, कीं शहाजी-राजांच्या जिवावर असा असा प्रसंग आहे. आपण साऱ्या दुनयेंतल्या पातशहाचे पातशहा आहां. महंमद पैगंबराचे वंशज आहां. अन्यायाचे रक्षणकर्ते,–स्वतंत्रतेचे पुरस्कर्ते आहां. शहाजीराजे आपल्या एका शब्दानं स्वतंत्र होतील; आणि आपल्या उपकाराचं ऋण जन्म-भर आपली सेवा करून फेडतील. मी—म्हणजे—शिवाजी आपल्याच कृपेनें या दक्षिणेंत उदयाला येत आहे. आपला शब्द विजापूरच्या सुलता-नानं अमान्य केला, तर हा शिवाजी सुलतानाला खावंदाच्या पायाजवळ लोटांगण घालायला लावील. चला, तयारी करा–कारस्थानाचं धोरण कसं ठेवावयाचं तें मग तुम्हांला सांगतों.

जिजा०—बाळ ! ही युक्ती अगदीं रामबाण काढलीस ! बरोबर लागू पडेल बघ.

शिवा०—आई ही माझी युक्ती नव्हे.

जिजा०—तुझी नव्हे, मग कुणाची ?–हिची ?–माझ्या मुलीची ?–सईची ?–शाबास. (तिच्या पाठीवरून हात फिरवून) मुत्सद्दी सासऱ्याची तूं सून शोभतेस खरी ! शिवाजीच्या दरबारीं पुष्कळ राजकारणपटु मुत्सद्दी जमतील, पण त्याच्या अंतःपुरांत त्या मुत्सद्यांनांही खालीं पहायला लाव-णारा महामुत्सद्दी सांपडला, हें चांगलं झालं. बाळ आज मी निष्काळजी झालें.

सई०—युक्ती यशस्वी झाल्यावर स्तुति करणं बरं.

जिजा०—ही युक्ति यशस्वी होणार यांत शंकाच नाहीं. शिवबा, आतां विजापूरला स्वतः जायचा बेत तूं रहित केलास तरी चालेल.

शिवा०—आई, या युक्तीनं बाबांची सुटका होणारं, याबद्दल मलाही शंका नाहीं. पण जरी ही युक्ती सफल झाली, तरी उद्यां शहाजहान मला असंच म्हणणार कीं नाहीं, कीं माझ्यामुळं तुझ्या बापाचे प्राण वांचले! आई, उपकारांनीं मनुष्य दुसऱ्याचा गुलाम होतो. मी विजापूरच्या सुलतानालाही शरण जाणार नाहीं, आणि दिल्लीच्या पातशहाचाही मी मिंधा राहणार नाहीं. स्वतःच्या कर्तृत्वावर माझी भिस्त! स्वतंत्रपणानं—कुणाच्याही मदतीवांचून मी बाबांची सुटका केली तरच मी शिवाजी!

जिजा०—मग तूं आज विजापूरला जाच. पण तूं एकटा—

शिवा०—एकटा तर काय हिला बरोबर घेऊन जाऊं?

जिजा०—हो तिलाच घेऊन जा. मी तुला आता तेंच सांगत होते. तुला योग्य सल्ला देणारी सहचारिणी नित्य तुझ्या संनिध असायलाच हवी. वत्सांनो, जा राजांची सुटका करा. यशस्वी व्हा.

शिवा०—आई, आशीर्वाद देतांना तुझा कंठ सद्गदित झाला! आतांपर्यंत दाबून ठेवलेल्या दुःखाचा या हुंदक्यानं स्फोट केला! तुझ्या पिळवटलेल्या हृदयाचं पाणी होऊन तें अश्रूंच्या रूपानं वाहूं लागलं! आई! शांत हो! हा शिवाजी तुझा पुत्र आहेना? माता पितरांचं दुःख दूर करणं हें पुत्राचं कर्तव्यच आहे.

पद-(चाल—ठाडे भये०)

सांडुनिया रिपुरुधिरा गे माते। न्हाणिन तव पदकमला।
आणिन गृहिं ताता ॥ धृ० ॥ विसर मना क्षण पडता।
त्यागिन तनु इहजगता। गहिंवर तव मायेचा।
स्फूर्ती जलधारा ॥ १ ॥

(पडदा पडतो.)

अंक पहिला समाप्त.

अंक दुसरा.

प्रवेश पहिला.

(तानाजी मुसलमानी वेषांत असलेल्या विश्वासरावास ओढीत आणतो.)

तानाजी०—धक्की मारून वर मगरूरी ? थांब, तुझी रग चांगलीच जिरवतों. तुझी तर ही घे माझी बुक्की !

विश्वास०—हं, हं, हात आटपा. मरेन कीं मी त्या बुक्की सरसा.

तानाजी०—मेलास तर मेलास. तूं मरून मला थोडंच सुतक यायचं आहे ! तुझ्यासारखे मुसलमान—

विश्वास०—तानाजीराव, नीट पहा, मी मुसलमान नाहीं, अहो-मी विश्वासराव !

तानाजी०—अं ! अरेच्या ! विश्वासरावच कीं ! मला वाटलें कीं कुणं अडदांड मुसलमानानं मला मुद्दाम धक्की मारली.

विश्वास०—वेड आहे. मुसलमान झाला, तरी तो मुद्दाम कशाला धक्की मारील ? बाकी तसं या विजापुरांत घडत नाहीं, असं मात्र नाहीं. कित्येक वेळां मुसलमानानं हिंदूला लाथेनं मारलं, तरी हिंदूला त्याच्या पाया पडूनच आपला बचाव करावा लागतो. माझा जर तुम्हांला पाय लागला असता—

तानाजी०—तर तोच पाय धरून ऐंड्यासारखं आपटलं असतं तुम्हांला मुसलमान समजून !

विश्वास—नाहीं-तें आतां कळलं ! पण, तानाजीराव, माझी पुरी फजिती झाली हो. मीं निरनिराळीं सोंगे घेऊन सारखा तपास करतों आहे, पण शहाजीराजांना कुठं ठेवलं आहे, कांहीं कळत नाहीं. महाराजांना तोंड कसं दाखवूं आतां !

तानाजी०—महाराज आल्याचं तुम्हांला केव्हां कळलं ?

विश्वास०—काय ? महाराज आले ?–इथं ?–अरे बापरे ! आतां भरलंच !

तानाजी०—अहो, भरलंच काय ? असे घाबरूं नका.

विश्वास०—घाबरूं नका काय ! शहाजीराजांच्या जीवावर प्रसंग येऊं नये म्हणून त्यांनीं मला मुद्दाम शहाजीराजांच्या सरंजामी लोकांबरोबर या विजापुरांत पाठवलं, आणि शहाजीराजांच्या तर–अरे बापरे ! महाराज सुळी देतील आतां मला.

तानाजी०—असे भिऊं नका. महाराजांनीं चौकशी केली प्रथम तुमचीच. रागावलेही होते; पण शेवटीं तेच म्हणाले–" त्याचेकडे कांहीं दोष नाहीं, त्यानं राजांना इषारा दिला होता. "

विश्वास०—आतां माझ्या जिवांत जीव आला. महाराज कुठं आहेत ?

तानाजी०—आल्याबरोबर बाहेर पडले. त्या असार महालाच्या शेजारच्या मिरझाखांच्या वाड्यांत आम्हीं उतरलों आहोंत. तुमचा तपास करावा म्हणून बाईसाहेबांना विचारून मीही लगेच बाहेर पडलों.

विश्वास०—सगळंच अजब आहे ! महाराज पातशहाला सहकुटुंब शरण जाणार आहेत कीं काय ?

तानाजी—महाराज, आणि शरण ! तें मग कळेल. तूर्त इथं गुप्तपणानं राह्यचं आम्हीं ठरवलं आहे.

विश्वास—हो, खरंच, तुम्हीं असे उघडपणानें हिंडता, याबरून हें कळतंच आहे. तानाजीराव, हें विजापूर आहे. गुप्तपणानं राह्यचं असेल तर वेष पालटून राहिलं पाहिजे. हुमरीतुमरीवर येऊन चालायचं नाहीं !

तानाजी—आपल्याला बुवा भान राहत नाहीं रागाच्या भरांत !

विश्वास—म्हणूनच म्हणतों, वेष पालटा प्रथम ! अहो, पांडव वेडे का होते अज्ञातवासाच्या वेळीं ? त्यांनीं पहा कसे शहाणपणानें वेष निवडले ? अर्जुनासारखा वीर, पण त्याला बृहन्नडा व्हावं लागलं होतं !

6862

तानाजी—तें कां ?

विश्वास—कां ? अहो, अर्जुन म्हणजे मूर्तिमंत पराक्रम ! तो प्रसंगीं उसळीसरसा बाहेर यायचाच; म्हणून पुरुषत्व नष्ट करून मुलांनां नाच गाणं शिकवायचं काम धर्मराजानं त्याला दिलं ! काय तर म्हणे, बृहन्नडा ! बृहन्नडा म्हणजे—

तानाजी—तें ठाऊक आहे. अर्जुनाला बिचाऱ्याला हात फळकावायाला लावून स्वतः धर्मराज बसले विराटराजाबरोबर द्यूत खेळत !

विश्वास—अहो, तो धर्मच ! तो कुठंही सारखाच ! तरी पण तेच धर्मराज राजपद सोडून कंकभट झाले ! राजाचे भिक्षुक झाले.

तानाजी—अगदीं उलटंपालटंच व्हावं लागलं म्हणायचं त्यांनां ! हो—द्रौपदीची सैरंध्री म्हणजे दासी झाली ! राजाचा भट-राणीची-दासी-आणि—

विश्वास—नकुल सहदेव सेनापति; म्हणून सेना संभाळीत होते. त्यांना गाई म्हशी वळवाव्या लागल्या !

तानाजी—खरंच कीं हो !

विश्वास—आणि भीम रागीट पडला, तेव्हां त्याला थंड करायला तिन्हीं त्रिकाल चुलीजवळ ठेवला !

तानाजी—हें कांहींतरी सांगतां झालं ! मी सुद्धां हल्लीं महाराजांचा स्वयंपाक करीत असतों, तो मी रागीट आहे म्हणूनच कीं काय ?

विश्वास—यांत काय संशय ! महाराजांनीं तुमची योग्य योजना केली. भीमाचं आणखी एक लचांड होतं ! बेट्याची भूक प्रचंड, त्रिभुवन खाल्लं तरी ढेंकर यायचा नाहीं ! त्याला यथेच्छ खायला मिळावं म्हणून मुदपाकखान्यांत बल्लव म्हणून दिला ठेवून !

तानाजी—हें बरोबर आहे कारण ! म्हणून त्याला आचारी केला !

विश्वास—एकूण काय ? वेष पालटा, प्रथम मुसलमानी वेष घ्या माझ्यासारखा ! फायदा नाहीं विचारलात् ?

तानाजी—काय बुवा, काय फायदा ?

विश्वास—फायदा विचारूं नका ? प्रथम कुठें मज्जाव नाहीं. तुमच्यासारख्या संतापी स्वभावाच्या माणसाला तर फारच सोइस्कर ! उमगायची भीति नाहीं ! शिवाय वाटेल तो गुन्हा केला तरी जिरतो.

ताना०—तो कसा काय बुवा ?

विश्वा०—कसा ? सांगू ? बाजी घोरपड्यानं जेव्हां शहाजीराजांना पकडलं, तेव्हां मी फकीराच्या वेषानें त्यांच्या जवळच होतो. मी एकदम 'दगा दगा' म्हणून ओरडलों, तों काय ? एकदम चार पांच जणांनीं मला पकडलं, पण काय ! काजीसाहेबासमोर नेलं मात्र ! त्यांनीं मला मुसलमान फकीर म्हणून सोडून दिलं ! तोच हिंदु गोसावी झालों असतों, तर फांसावरच चढवलं असतं मला !

ताना०—काय हा अन्याय !

विश्वा०—न्याय आणि अन्याय ! कांहीं बोलूं नका ! हे पहा, एक मानकरी येताहेत. जातीनें हिंदूच आहेत, पण लोकांनीं आपल्याला मुसलमान समजावं असं यांना वाटत असतं. पाहा मासला थोडासा. (देवराव येतो) आईए नवाबजादे बंदगी.

देव०—बंदगी, सरदारसाहेब ! आपकी भेट होया, ए अच्छा होया. पण मेरा तो–तो–तो–तो–

विश्वा०—तो क्या ?

देव०—तो–तो–तो–मेरा–या अल्ला !

विश्वा०—मराठी मे बात करो. मै मुसलमीन हूं. मगर मै मन्हेटीमे बम्मनकी तरह बात कर सक्ताहूं. तुम्हांला हिंदुस्थानी येत नाहीं बरोबर !

देव०—नहीं, नहीं. मला शुद्ध मुसलमानी येत नाहीं असें नाहीं, मी मुद्दाम बोलतों असा.

विश्वा०—भाषा येत नसली तरी आपल्या पोषाखावरून आपल्याला हिंदु म्हणायची कोणाची माय व्याली आहे ? जातीवंत मुसलमान दिसता हो !

देव०—हां, हां जी ! माझ्या मुली सुद्धां अगदीं मुसलमानाच्या मुली वाटतात ! घरांत सुद्धां बरोबर मुसलमानी पोषाख करतात ! त्यांना उर्दू वांचून भाषा येत नाहीं ! मराठी बिराठी त्यांना कांहीं समजत नाहीं ! आमच्या घरांत मी कुणाला मराठी बोलूंच देत नाहीं. माझा एकेक मुलगा आणि एकेक मुलगी बोलूं लागली, म्हणजे अस्सल मुसलमानाचं घर वाटतं कुणालाही !

ताना०—पण तुम्हीं स्वतः हिंदु असून—

देव०—ए कौन है ?

विश्वा०—एक हिंदु गृहस्थ है.

देव०—हिंदु—थुः थुः ! हिंदु !

ताना०—आपले वडील हिंदूच होते कां हो ?

विश्वा०—माफ करना मेरे भाई ! आपतो बहोतही गुस्सेल हो; नबाबजादे, यांचेकडे लक्ष देऊं नकां. ताराजी नाथ ! नबाबजाद्यांनीं आपली मुलगी मला द्यायचं कबूल केलं आहे, आमची लवकरच शादी होणार आहे !

देवराव०—मी निश्चयच केला आहे. सगळ्या मुली मुसलमानांना देईन म्हणून ! तुम्हीं तर अमीर आहां ! पण अमीर नाहीं मिळाला एखादीला, तर भडभुंजाला किंवा भटाऱ्याला देईन ! पण हिंदु राजालाही नाहीं देणार !

विश्वास०—शाबास ! बरं, चला, नबाबजादे—आपल्याला खोटी झाली, चला लवकर !

देवराव०—हो. मै तो सब भूल गया ! या अल्ला ! मला घोरपड्यांकडे जायचं आहे. सलाम् आलेकम्—(देवराव जातो.)

तानाजी०—हिंदु म्हणवून घ्यायला शरम वाटते, त्यापेक्षां मरत कां नाहीं हा हरामखोर ! आणि तुम्ही मुसलमान म्हणून त्याला फसवणार, आणि त्याच्या मुलीशीं लग्न करणार !

विश्वास०—त्याची पंचाईत तुम्हाला कशाला ?

तानाजी०—पण ते पहा—महाराज त्या वाड्यांत शिरले.

विश्वास०—महाराजांनींसुद्धां वेष पालटून फिरावं हें उत्तम ! काय नेम ! उगीच भलताच प्रसंग यायचा !

तानाजी०—कुणाचा वाडा हो हा ?

विश्वास०—शहाजी राजांचाच ! तुकाऊआईसाहेबांच्या भेटीला गेले असतील. आपण दोघे जरा पहारा करूं या वाड्यावर !

तानाजी०—तुम्हींच करा ! मला बाईसाहेबांच्याकडे गेलं पाहिजे लवकर. वेळ फार झाला, तुम्हीं ठेवा पाळत, मी जातो आतां !

विश्वास०—हो, बाईसाहेबांच्याजवळ कोणींच नसेल, नाहीं ? मग, या तर ! मी त्या कोंपऱ्यावर उभा राहातों, आणि करतो टेहळणी. (जातात.)

प्रवेश २ रा.

स्थळ—दिवाणखाना. (तुकाबाई व एक हुजऱ्या येतात.)

तुका०—काय म्हणतोस ? कुणी तरुण सरदार आले आहेत ? नांव विचारलं नाहीं म्हणतोस ?—कोण बरं असेल ?—बरं जा, त्यांना आंत पाठवून दे. (हुजऱ्या जातो) आम्ही विजापुरांत आलों आणि पहिल्या दिवशीं कितीतरी अमीर उमराव भेटीला आले असतील ! पण राजांना बंदींत ठेवयाल्यासून कुणी चिटपाखरूं तरी फिरकलं आहे का इकडे मायेचं ?—खऱ्या जिव्हाळ्यावांचून अशा वेळीं कुणाला कळवळा यायचा आहे ?—पातशहानं कोंडलं !—मित्रांनीं सोडलं !—पोटच्या पोरानं नाडलं ! देवा ! कायरे केलंस हे ! (शिवाजी येतो.)

पद्—(चाल—क्षण मधुना०)

प्रमदमया माया तव अविरत । अघ हरणा कां हरिसी ॥ सजत तनय प्रियनाशा । उपकृत नृप कारागृहिं ठेवित । सुहृदहि नुरवि सुखाशा ॥ १ ॥

शिवा०—माईसाहेब !—

तुका०—तुम्हीं का ! मला वाटलं, माझ्या मनाला धीर द्यायला कुणी जिव्हाळ्याचा मित्र आला असेल ! पण नाहीं,-तुम्ही आलांत ! वडिलांना अंधार कोठडींत पाठवून, लाजलज्जा गुंडाळून ठेऊन, आपलं काळं तोंड मला दाखवायला आलांत ! घे बाबा, आपल्या आईबद्दल वाटेल तसा सूड घे. ही चीजवस्त लुटून ने, जहागीर बळकावून बैस. तुला वाटेल तसं कर. आम्हांला जिवानिशीं मारून टाक तुला हवं तर.

शिवा०—शिवशिव ! कोण हा गहजब !-माईसाहेब ! जरा शांत व्हा. मी तुम्हांला लुटायला आलों नाहीं, तुमची जहागीर मी बळकावीत नाहीं, तुम्हांला बंदिवान करून तुमचा सूडहि मी घेत नाहीं. तुम्हांला असं कां वाटावं ? जसा व्यंकू तसा मी ही तुमचा मुलगा आहे. तुमच्या समाचाराला-याप्रसंगीं तुम्हांला धीर द्यायला मी आलों आहे.

तुका०—आमच्या समाचाराला यायला इतकी घाई कशाला केलीस बाबा ? राजांना भिंतींत चिणायला अजून चार दिवस अवधी आहे. जरा धीर धर.

शिवा०—माईसाहेब, मी तुमच्या पायां पडतो, पदर पसरतो, हा संताप आतां आवरा. तुमच्यावर एकटीवरच हा प्रसंग नाहीं माझ्या आई-वरही आहे. पण ती माउली किती शांत आहे यावेळीं !

पद—(चाल-तिरधको सब०)

निरखिता सुखविते भाविका तीर्थ तें । वासना जाळुनि शांतता अवतरे ॥ धृ० ॥ मुद्रा सदा शांत । प्रलय तरी मन शांत । करणी किती शांत । प्रखर तें भय सरें ॥ १ ॥

तुका०—आग लाव तिच्या शांतपणाला. नवऱ्याला संकटांत पाहून तिचा जीव शांत झाला असेल. राजानीं टाकून दिल्यापासून तिच्या अंगाची आग होत होती. अवदसेचे शिव्याशाप बाधले ग बाई. चांडाळणीनं कसलं चेटूक केलं—देवा, तूंच पाहून घे.

शिवा०—माईसाहेब, तुम्ही मला आणि आईला कितीही शिव्या दिल्यात, आमच्यावर असले गलिच्छ आरोप कितीही केलेत, तरी मला त्याचं आश्चर्य वाटत नाहीं. तुमच्या वृत्तीचीं माणसं दुःखांत सांपडलीं कीं, दुसऱ्यांना दिलेलीं दुःखं मूर्तिमंत त्यांच्यापुढं उभीं रहातात, आणि अत्यंत भेसूर रूपं दाखवून नेहमीं त्यांना भेवडवीत असतात.

तुका०—तुझे वडील तुझ्या सैतानी चाळ्यामुळं अपेष्टा भोगीत आहेत. तुझ्या पुत्राच्या पोरखेळांचीं दुःखं तुला भोगावीं लागतील तेव्हांच तुझ्या हातून घडलेल्या या पापांचं पिशाच तुझ्यापुढं उभं राहील.

शिवा०—या वेळीं तुम्हीं कांहीं बोललांत तरी तुमच्यावर उलट रागावून चालायचं नाहीं. कारण, आपणा सर्वांच्या दृष्टीनं माझ्यामुळं बाबा अंधार कोठडींत पडले आहेत. तुमचा राग योग्यच आहे. तुम्ही मला शिव्या द्या, पण आईला काय म्हणून ? तुम्ही तिला इतक्या शिव्या देतां असं जर तिला कळलं, तर तिला हसूंच येईल.

तुका०—आम्हांला दुःखांत पाहून हर्षवायू होऊन ओंवाळून कां जात नाहीं एकदाची.

शिवा०—तुम्हाला माझ्या येण्यानं विनाकारण संताप झाला. मी कांहीं हिताचं बोललों तरी त्याचा भलताच अर्थ करून तुम्हीं अधिकच चिडतां. तुम्हाला प्रथम भेटणं माझं कर्तव्य होतं तें मी केलं. मी येतों आतां.

तुका०—जा. तोंड काळं कर. (व्यंकोजी येतो.)

व्यंको०—आई, कुणाला जा म्हणतेस ? आबासाहेबांना ? आबासाहेब, बाबा तुमच्याकडे गेले आहेत ना ? घेऊन कां आलां नाहींत त्यांना बरोबर ?

शिवा०—बाळ,—

तुका०—बोल, बोल. आतां उत्तर दे. आतां तुझी वाचा कुठं गेली ?

व्यंको०—आई, कां उगीच त्यांना शिव्या देतेस ? बाबांना येऊं द्या म्हणजे सांगतों. आबासाहेब, बाबा कुठं हो आहेत ?

शिवा०—बाळ, बाबा पातशहाच्या कैदखान्यांत आहेत.

व्यंको०—पण पातशहानं त्यांना कां कैदेंत ठेवलं ? बाबांनीं त्याचा काय गुन्हा केला बुवा !

शिवा०—कैदेंत जायला पातशहाचा गुन्हाच करावा लागतो असं नाहीं.

व्यंको०—मग मला कां नाहीं पातशहा कैद करीत ?

शिवा०—तुला कैद करतांना पातशहाला आपली गर्दनच द्यावी लागेल.

व्यंको०—होय ! पण त्याची गर्दन कोण घेणार ?

शिवा०—मी ! तुझा भाऊ.

व्यंको०—मग बाबांना कैद करतांना पातशहाची गर्दन कां उड-विली नाहींत ?

शिवा०—कारण, पातशहाचा त्यांत कांहीं अपराध नाहीं म्हणून.

व्यंको०—मग कुणाचा अपराध ?

शिवा०—बाबांच्या वैऱ्याचा ! बाळ, आठ दिवसांच्या आंत त्या वैऱ्याची गर्दन उडते कीं नाहीं तें तूंच पहा !

तुका०—पण चांडाळा, राजांची गर्दन—राजांचा देह—या चारच दिवसांत दृष्टिआड होईल ना ? ते थोडेच परत येणार आहेत आठ दिवसांनीं ? मोठा पितृभक्त पुत्र पडलास कीं नाहीं तो स्वर्गांतून संजिवनी आणणार आहेस त्यांना जिवंत करायला !

शिवा०—माईसाहेब, माझ्या पितृभक्तीची आणि पुत्रधर्माची अशी हेटाळणी करूं नका. बाबांच्या संबंधाचं माझं कर्तव्य करून मी त्यांची मुक्तता करणारच आहे.

तुका०—केव्हां ? अजून मुहुर्त सांपडला नाहीं वाटतं !

शिवा०—मुहुर्त कशाला ? या चार दिवसांतच—पातशहानं जी मुदत दिली आहे, तिच्या आंतच मी बाबांची सुटका करीन.

तुका०—मग आतांच कां करीत नाहींस ? केलेले गुन्हे पातशहा कबूल करून त्याची क्षमा मागितल्यावांचून कांहीं त्यांची सुटका नाहीं. शरण जा, आणि माग क्षमा.

शिवा०—क्षमा काय म्हणून ? मी त्याचा काय गुन्हा केला म्हणून त्याला शरण जाऊं ? प्राण गेला तरी ही गोष्ट माझ्या होणार नाहीं.

तुका०—मग तुझ्या हातून राजांची सुटकाही होत नाहीं. पितृभक्ती पुत्रधर्माच्या, कर्तव्याच्या, बढाई मारणाऱ्या राक्षसा, तुझ्या ह बापाबद्दल दयेचा लवलेशही नाहीं. तुझ्या असल्या भुलथापांनीं फसायची नाहीं. मला एकच सांग. तूं आत्ताच्या आत्तां दर पातशहाला शरण जातोस कीं नाहीं ?

शिवा०—नाहीं—नाहीं—नाहीं.

तुका०—नाहीं ? मग माझं कर्तव्य मी करतें पहा ! माझा पत्नी मी पाळतें पहा ! जन्मदात्या पित्याला दुःखांत—हालअपेष्टेंत—टाकण अधम पुत्राला कैद करून, मी आपली पतिनिष्ठा दाखवितें पहा. शहाशीं द्रोह करून राज्यांत पुंडाई करणाऱ्या बंडखोराला गिरप करून मी आपली राजनिष्ठा दाखवतें पहा !—कोण आहेरे ? (आठ शिपाई येतात.) चला व्हा पुढं, आणि एकदम याला कैद करा. बघतां काय ? हा तुमच्यापुढं शिवाजी उभा आहे, पकडा त्या (शिपाई पकडायला धांवतात.)

शिवा०—हं, खबरदार ? (शिपाई दचकतात व मागें सरत शिवाजी जातो.)

तुका०—अरे, बावळ्यासारखे पहातां काय ? धावा, पकडा त्या (शिपाई एकमेकांना पकडतात

१ शिपाई—हा पहा शिवाजी ! कसा पकडला !

२ शिपाई— हा पहा, मी पकडला !

३ शिपाई—तूं नाहीं, मी पकडला. हा पहा !

व्यंको०--आई, हें काय ग ?

तुका०--पागलखाना ! बाळ, चल, चल अगोदर इथून. या पागलखान्यांतून पाय काढूं दे. (व्यंकोजी व तुकाबाई जातात.)

१ शिपाई—कसा पकडला शिवाजीला !

२ शिपाई–कसा सांपडला ! (एकमेकांस ओढीत नेतात.)

प्रवेश ३ रा.

स्थळ–विजापूर, एक दिवाणखाना.

सईबाई व तानाजी.

सई०—तानाजी, तुम्हीही एक मुसलमानी बायको पहा. हसतां काय असे ? मुसलमानी–म्हणजे मुसलमानी जातीची नव्हे. जिचा पेहराव मुसलमानी आहे अशी. विश्वासरावांनीं पाहिली म्हणतां आणि तुह्मांला नको ?

तानाजी०—पण त्यांत एवढं जास्त काय आहे ?

सई०—जास्त काय आहे, हें तुह्माला अद्याप कळलं नाहीं म्हणून. आणि कळणार तरी कसं ? त्यांच्या बायका नेहमीं गोषांत रहाणार. त्यांचं एक नखसुद्धा पडायचं नाही तुमच्या दृष्टीला नवीन पद्धतच पडली आहे बायकांनीं गोषांत राहायची.

ताना०—बायकांनीं रहायची कीं बायकांना गोषांत ठेवायची ?

सई०—बायकांनीं रहायची असंच मी म्हणतें. आमच्या सासूबाईनीं पहा ना, गोषा कसा उडवून दिला ! अहो या नव्या चाली आमच्या काय कामाच्या ? आह्मी क्षत्रियांच्या मुली. नवऱ्यांबरोबर आह्मी सदासर्वकाळ असलं पाहिजे. आमचं पडद्यांत रहाणं म्हणजे आस्ते आस्ते आमच्या मुलांबाळांना गुलामगिरीचं वळण लावण्यासारखंच आहे.

ताना०—म्हणूनच मी ह्मणतों या मुसलमानी–ह्मणजे गोषांतल्या बायका आह्मी मराठ्यांनी करूं नयेत. उगीच गुलामगिरीचं लचांड कशाला पाहिजे पाठीमागं पिढ्यांनपिढ्या ?

सई०—तसं मात्र मी ह्मणत नाहीं. त्यांना गोषांत ठेवूं नका, ह्मणजे झालं. टाळावं लागतं हेंच. तुह्मीच पहातां ना, या विजापुरांतले बहुतेक हिंदु मुसलमानी पेहराव करतात. जात कोण, धर्म कोण, कांहीं कळत नाहीं. गंधसुद्धां लावीत नाहींत हिंदु अलीकडे.—तो पहा सडकेनं तो कुणी अमीर चालला आहे. कोण असेल तो हो ?

ताना०—अहो, तोच हो तोच तो ! आमच्या विश्वासरावांचे भावी सासरे. नखशिखांत मुसलमान ! बघा डौल कसा आहे मुसलमानी ! पण मुसलमानी भाषेचं अवाक्षर येत असेल तर शपथ !

सई०—कुणी अस्सल मुसलमान भेटला ह्मणजे या नबाबजाद्यांची तिरपिट उडत असेल नाहीं !

ताना०—तें काय विचारतां ? मघाशीं तीच गंमत झाली. हः हः हः हः ! माझं पोट दुखतं हसतां हसतां.

सई०—हसतां काय तानाजीराव ! एखाद्याला वाटेल तुह्माला वेडच लागलं आहे.

ताना०—वेड नाहीं तर काय ? मी त्या सोंगाला नाहीं आतां हांसत. मघाशीं मी इतका रागावलों कीं, त्याबद्दलच माझं मलाच आतां हसूं येतं.

सई०—आणि एखादे वेळीं इतके हसतां, कीं त्या हसण्याबद्दल तुमचा तुह्मालाच राग येतो. असंच कीं नाहीं ?

ताना०—हो, असं आहे खरं बुवा. नबाबजाद्यांचा तो हिंदूबद्दल तिरस्कार पाहून मला प्रथम राग आला खरा, पण हसूं येऊन आतां तर त्याच्याबद्दल कींव वाटूं लागली आहे.

सई०—पण संभाळा बरं ! असली कींव वाटण्यासारखी माणसंच भयंकर विषारी असतात. तुम्ही भोळे लोक आहां. विजापुरांत असले

विषारी सर्प फार आहेत. जपून वागा. स्वारी नेहमीं बेधडक बाहेर पडते. त्यांच्या आसपास चांगली नजर राखीत जा. त्यांच्या जिवाची काळजी घ्या. मी तुम्हांला जबाबदार धरीन, कांहीं भलतं सलतं झालं तर. समजलां ?

ताना०—अलबत धरा. जीव गेला तरी बेहत्तर; पण महाराजांना धक्का लागूं देणार नाहीं.

सई०—शाबास ! पण अगोदर सांगा, शहाजीराजांना कुठं ठेवलं आहे त्याचा पत्ता लागला का ?

ताना०—आपल्याजवळ कुणी असतं तर मी जरा बाहेर फिरून कांहीं सुगावा लागतो कां पाहिलं असतं.

सई०—अवश्य पहा तर. माझ्या जवळ कुणी नसलं तरी चालेल. मी कांहीं गोषांतली लाजाळू पुतळी नाहीं. तुम्ही जा वाटेल तिकडे. कुणी आलं तरी मी घेईन त्याचा समाचार.

ताना०—मग हरकत नाहीं. तरी पण महाराज—

सई०—तें मी पाहून घेईन सगळं ! जा तुम्ही. काम महत्वाचं आहे. सोंग फार आणि रात्र थोडी, अशी झाली आहे स्थिति ! जा तुम्ही आतां. (तानाजी जातो.) (स्वगत.) महाराज आपल्या उद्योगाला लागले, तानाजीराव कामगिरींवर गेले आणि मी काय करतें आहें ?–रिकामी बसण्याकरितां का मी आलें आहें ?-नाहीं ! मग मी या विजापुरांत आलें कशाला ? स्वारींच्या गळ्यांत लोढणं होऊन अडकायला ?

पद–(चाल–शाम मोहे बुलाये०)

नाथ माझा भुलाया । झुलाया । साधिन कार्या पतियश गाया ॥ धृ ॥ उदासीन नाहीं जाया । झटते केंवि साह्या । पतिच्या जया ॥ १ ॥

छेः ! मी महाराजांची अर्धांगी ! अर्ध्या कामाचा बोजा मलाच उचलला पाहिजे.–पण तें अर्धं काम, तें तरी काय करायचं कुणाला ठाऊक !

हुकूम करणारा देव तर जाग्यावर नाहीं !—पण नाहीं कसा ? या हृदयांत आहे. या अंतःकरणाच्या अंधारकोठडींत मी त्याला कोंडून ठेवलं आहे. तिथं जाऊन मी त्यांना विचारूं का ? अंतःकरणाच्या अंधारकोठडींत अंधार असेल, पण प्रकाशांतले पदार्थ उघड्या डोळ्यांनीं पहातां येतात, तसें अंधारातले अणुरेणुसुद्धां डोळे मिटूनच दिसत असतील. हे मी नेत्र मिटले !—हा काय चमत्कार ? मी नेत्र मिटतांच माझं अंतःकरण एकदम प्रकाशित झालं ! हा माझा देव माझ्या समोर आला ! (शिवाजी येतो) हो—खास आला !

शिवा०—काय हुकूम ?

सई०—हुकूम हाच कीं, मी सांगेन तितका वेळ माझ्यासमोर असंच उभं रहावं.

शिवा०—जी हुकूम !

सई०—असंच आणखी थोडं हंसावं.

शिवा०—(वेडावून) आतां आपणही जरा डोळे उघडावे.

सई०—(डोळे उघडून) महाराज आपण ?

शिवा०—तुला मी दिसत होतों कां डोळे मिटून ?

सई०—हो. मी आपणाला अंतःकरणांत पहात होतें.

शिवा०—मग आतां कुठं दिसतों आहें मी ?

सई०—आतां मला प्रत्यक्ष दिसतां अहां इथं, आणि कुठं काय ?

शिवा०—नाहीं. तुझ्या अंतःकरणांतच मी तुला प्रत्यक्ष दिसत होतों. हें हल्लीं तुला दिसणारं माझं प्रतिबिंब आहे.

सई०—मग मीही प्रतिबिंबच असेन.

शिवा०—अर्थात् ! तूं आणि मी आपलीं प्रतिबिंबच आहोंत. हा आरसा धर. तें प्रतिबिंब पहा. हा दुसरा आरसा मी धरतों. हीं आणखीं प्रतिबिंबं पहा. सृष्टीच्या आरशांत परमेश्वरी कृपेनं एकाच मनुष्याचीं

अनेक प्रतिबिंबं दाखवतां येतात. आत्तांच एक 'मासला दिसला माई साहेबांकडे ! पण तानाजी कुठं आहे ?

सई०—राजांच्या ठिकाणाचा शोध काढायाला ते गेले आहेत.

शिवा०—त्याला विनाकारण हिसका पडणार. त्याला नाहीं कळायचा त्यांचा पत्ता.

सई०—मग कुणाला कळणार ? आपल्याला कळला आहे का ?

शिवा०—नाहीं, पण आत्तां कळेल. मी अगदीं खात्रीचा मनुष्य बोलावला आहे बिनचुक पत्ता घेऊन ! आत्तां येईल बघ.

सई०—विजापुरांत आपल्या ओळखीची बरीच मंडळी असतील.

शिवा०—हो कितीतरी ! सगळीच !

सई०—मग आपण आल्याची वर्दी नाहीं ना कुणी देणार पातशाहाला ?

शिवा०—त्याची भीति नको. मी सगळ्यांना ओळखतों, पण मला कुणीच ओळखीत नाहीं.

सई०— खरंच. परमेश्वर सगळ्यांना पहातो पण त्याला कुणीच पहात नाहीं. आणि पहाणार तरी कसे ? तो दिसला पाहिजे ना ?

शिवा०— न दिसायला काय झालं ? मी मघाशीं तुला दिसत होतों ना? पण थांब, माझा दूत आला वाटतं पत्ता घेऊन. (एक हुजऱ्या येतो.)

हुज०—बाजी घोरपडे आले आहेत. बरोबर शिपाई आहेत. आपला तपास करताहेत. काय करायचं ?

शिवा०—करायचं काय ? आंत येऊं द्यायचं त्यांना. जा.

सई०—आतां काय करायचं बाई ? लपून तरी बसावं जरा.

शिवा०—तूं ही अशीच का ? मग कशाला आलीस इथं ? मला काय तो करणार आहे ? तूं बोल त्याच्याशीं.

सई०—आपण जरा आड व्हा ना ?

शिवा०—आड कशाला ? तूं उगीच भितेस.

सई०—कशाला काय ? या पडद्याआड व्हायचं गडे.—मी नाहीं ऐकायची. अशी रेटीत नेईन तिथं. (शिवाजीला रेटीत नेते.) उभं रहायचं आड हं ! बाहेर यायचं नाहीं. शपथ आहे माझी.

शिवा०—जी हुकूम ! (बाजी घोरपडे येतो.)

बाजी०—इथं कोण राहतं ?

सई०—आपल्याला कोण पाहिजे ?

बाजी०—आम्हांला इथं कोण राहतं तें पाहिजे.

सई०—आम्ही इथं राहतों. मी पाहिजे आपल्याला ?

बाजी०—तुमच्याशिवाय इथं कुणी रहात नाहीं ?

सई०—कुणी नाहीं. आम्ही आणि आमचे चाकरनोकरच इथं असतों.

बाजी०—बाई तुमच्या नवऱ्याचं नांव काय ?

सई०—तुम्ही हिंदु आहां का मुसलमान ?

बाजी०—हिंदु !

सई०—मग एखाद्या हिंदु बायकोला नवऱ्याचं नावसं विचारतां ? हिंदूचे रिवाज विसरून फक्त नांवाचे हिंदु राहिला आहांत झालं ! हिंदूंच्या बायका नवऱ्याचं नांव घेत नाहींत, विसरलां वाटतं ?

बाजी०—तुम्ही रागाऊं नका. आम्ही शिवाजीचा तपास करतों आहोंत. तेव्हां—

सई०—मग करा. पण अशी बेअदबी काय करतां बायकांची ? तुमच्यासारख्या मुसलमानी रियासतींत वापरलेल्या सरदारानं तर स्त्रियांच्या समोर जाऊंही नये. त्या असतील त्या जागेंत पाऊलही ठेवूं नये. त्यांच्याशीं असं समोरासमोर बोलतांही कामां नये. ज्यानं त्यानं आपल्या प्रांताच्या पद्धतीप्रमाणं वागलं पाहिजे.

बाजी०—मला माफ करा. माझी चुकी झाली.

सई०--चुकी झाली असं ह्मणतां, पण अजून इथून जात नाहीं. आह्मी बायका परकी पुरुषाशीं भाषणही करूं इच्छित नाहीं.

बाजी०--(स्वगत) शब्दसुद्धां बोलूं देत नाहीं. (उघड) बाईसाहेब, आपण जरा शांत व्हा. प्रख्यात बंडखोर शिवाजी या विजापुरांत आला आहे.

सई०--विजापुरांत ? या विजापुरांत ?

बाजी०--हो. या विजापुरांत.

सई०--कोण आला आहे ह्मणालांत ?

बाजी०--शिवाजी ! तो बंडखोर ! दरवडेखोर !

सई०--दरवडेखोर ? मग आह्माला जरा बंदोबस्तानंच राहावं लागेल इथं ? आह्मी परमुलखचे ! थोडं जडजोखीम बरोबर. आणि इथं तर दरवडेखोर !

बाजी०--भिण्याचं कारण नाहीं आपल्याला इतकं.

सई०--काय नांव ह्मणालांत त्या दरोडेखोराचं ?

बाजी०--अहो शिवाजी ! तुह्मी ऐकलेलं नाहीं वाटतं तें नांव ?

सई०--नांव ऐकलं आहे तर काय झालं. आमच्या देवाचं नांव शिवच आहे--आणि दरोडेखोर ना ? मला अगोदर माझ्या देवाची मूर्ति संभाळली पाहिजे.

बाजी०--भिऊं नका. मूर्ती सोन्याचांदीची असली तरी तो चोर कांहीं ती चोरीत बसत नाहीं.

सई०--मग ठीक. कारण माझ्या देवाची मूर्ति मला दुनयेंतल्या दौलतीहूनही जास्त मोलाची आहे.

बाजी०--तो कांहीं इथं दरोडा घालायला किंवा विजापुर लुटायला आला नाहीं. त्याचा बाप शहाजी, त्याला सोडवायला आला आहे तो. आह्माला आतांच बातमी लागली तो आल्याची. म्हणून चालविला आहे तपास.

सई०—तुह्मांला कुणी सांगितलं तो आला ह्मणून ?

बाजी०—त्याच्याच सावत्र आईनं ! तुकाबाई भोसल्यानं.

सई०—सावत्र आईनं आपलं कर्तव्यच केलं ह्मणायचं.

बाजी०—तो तिच्याकडे भेटायला गेला होता. तिनं त्याला पकडा-यला शिपाई बोलावले. आणि तो सैतानासारखा तिथल्या तिथं नाहींसा झाला.

सई०—अगबाई, फारच आश्चर्य ! मग आपल्याला तो कसचा सांप-डतो ? एकदम गुप्त व्हायचा.

बाजी०—अहो, त्या एका बायको मनुष्याला तसं वाटलं झालं. असं का कुठं गुप्त होतां येतं ! तो पौराणिक काळ गेला आतां. पुराणांतल्या सुद्धां त्या गप्पाच. मारुतीनं म्हणे समुद्रावरून उड्डाण केलं, आणि द्रोणा-गिरी उचलून आणला !

सई०—तरी पण हा बंडखोर–काय म्हणालांत नांव त्याचं ?

बाजी०— शिवाजी ! तुमच्या देवाचंच नांव तें. आत्तांच म्हणालांत.

सई०—हो. पण माझ्या तें तोंडींच येत नाहीं. देवाचं नांव असं घोकल्यावांचून मूर्खांच्या मुखीं थोडंच बसायचं आहे ? पण काहो, त्या बंडखोरापासून मला नाहीं ना भीति ? मी बायकोमाणुस. काय नेम ? एक-दम मला घेऊन जायचा.

बाजी०—मी सांगितलं ना, तो फक्त आपल्या बापाकरितां आला आहे; आणि त्याचा बाप, त्याच्या बापाचा बाप आला, तरी त्याच्या हातीं लागत नाहीं.

सई०—असं ! इतका बंदोबस्तांत ठेविला आहे नाहीं त्याला ?

बाजी०—अगदीं पुऱ्या बंदोबस्तांत ! इथली काळी कोठी आप-ल्याला माहीत नसेल ? म्हणजे सभोंवती बरा खंदक आहे. त्याच्या आंत एक तट. नंतर पाहऱ्याची चौकी. त्या चौकीच्या शेजारच्या कोठडींत

त्याला ठेवला आहे. भिंतीला बघा एकच भोंक आहे हवा जाण्यापुरतं. त्या भोकांतून जायला तो काय उंदीर आहे थोडाच ! बाकी आम्ही मुसलमान—

सई०—काय तुम्ही मुसलमान ?

बाजी०—नाही नाहीं. आम्ही मुसलमानी सरदार त्याला डोंगरांतला उंदीरच म्हणतों. (घटकाचे तास वाजतात)

सई०—अगबाई, दिवे लागायची वेळ झाली ! तुळशीजवळ मला दिवा लावला पाहिजे. माफ करा सरदारसाहेब, आपल्याला विनाकारण तसदी पडली.

बाजी०—मलाच आपली माफी मागितली पाहिजे. आपलं जर कांहीं दरबारशीं काम असलं, तर माझ्याकडून होईल ती मदत मी करीन.

सई०—होय, आमचं दरबारशींच काम आहे. पण आपण पुनः एकादे वेळीं या.

बाजी०—मी येतों तर. (बाजी जातो.)

सई०—जिन्यांत संभाळा बरं ! (शिवाजी येतो) आपण बराच धीर धरलात. मला वाटलं केव्हांच बाहेर याल.

शिवा०—तूं शपथच घातलीस, म्हणून सारखा उभा राहिलों होतों. बसायचं आलं होतं एकदां मनांत; पण म्हटलं शपथ मोडायची तसं केलं तर !

सई०—इतक्या कडकपणानं शपथ पाळली तर !

शिवा०—हो तर. कडकपणानं जर मी शपथ पाळली नाहीं, तर मग शपथेचं महत्त्व तें काय ? नाहींतर शपथा घेतल्या आणि त्या मोडल्या. मी ज्या वेळीं लहान होतों, तेव्हां "तुमच्याकरतां प्राण देऊं" म्हणून कितीतरी मित्रांनीं शपथा घेतल्या होत्या. "साहाय्य करूं" म्हणून वचनं दिलीं होतीं; पण वेळ आली आणि मी जेव्हां तोंण्यावर

स्वारीचा घाट घातला, तेव्हां बहुतेकांनीं आपल्या शपथा मोडल्या ! कित्येकांनीं आपलीं वचनं मागें घेतलीं ! आणि खरोखर ज्यांच्याबद्दल मला मुळींच आशा नव्हती, जे भेकड भित्रे आहेत अशीच माझी समजूत होती, तेच माझ्या जरीपटक्याभोंवतीं धांवत आले. त्यांनींच माझ्यापुढं उडी घेतली, तेच माझ्याकरितां शत्रूच्या समशेरीला बळी पडले. शपथ क्षुल्लक बाबींत घेतलेली का असेना, ती जो पाळतो तोच खरा मर्द !

सई०—शहाजीराजांची मुक्तता झाल्यावांचून पुण्यांत पाऊल ठेवणार नाहीं, अशी मीही शपथ घेतली आहे. राजांची त्या अंधारकोठडींत काय स्थिति झाली असेल ?

शिवा०—त्याचा विचार करण्याची ही वेळ नाहीं. आज तूं खरोखर चांगलीच कामगिरी केलीस. सर्वच बायका जर आपल्या पतींना असं सहाय्य करतील, तर या मृत्युलोकाचा स्वर्गच होईल. बरं मी जरा जाऊन येतों.

सई०—कुठं जाऊन येतों ?

शिवा०—काळ्या कोठींत. बाजी घोरपड्यानं सांगितलेला बाबांचा पत्ता बरोबर आहे का नाहीं, हें पाहून येतों.

सई०—मग त्याला आपण कशाला जायला हवं ? आपण कुणी दूत पाठवला आहे ना बातमी आणायला ?

शिवा०—मग तो आला होता ना आतां ? हा बाजी घोरपडेच पत्ता सांगायला आला होता. सई ! देवतांची कृपा असली म्हणजे जें पाहिजे तें नेहमीं घरीं चालून येत असतं. बघ, आपल्या शत्रूनंच बाबांचा पत्ता आपल्याला सांगितला ना ?

सई०—खरंच !-पण जरा थांबावं गडे. मी तुळशीला नमस्कार करतें आणि आपणाला पंचारती ओवाळून मग निरोप देतें.

शिवा०—लाडके ! तुझं मन हेंच तुळशीवन ! तुझं वदन हेंच वृंदावन ! तुझे लोचन हींच निरांजनं ! चुंबनाचा तिलक तुझ्या मुखानं

माझ्या मुखाला चटकन् लाव आणि आलिंगनाची प्रदक्षणा घालून मला जायला तूं परवानगी दे.

पद--(चाल-देव तेथें विलसे०)

देवता कामुकतारहिता । कां न होय कार्यवरद ॥ ध्रु० ॥
जी रुसते प्रेमरता । शांतकाळ पाहतां । कालगुणें काठिन वने। धांवे निजबाळिं परिहरि भया। निरामया करित ॥ १ ॥

(पडदा.)

प्रवेश ४ था.

स्थळ-तुरुंगांची चौकी.

(पहारेकरी पहारा करीत असून तानाजी व विश्वासराव गारुड्याच्या वेषांत ढोलकें व पुंगी वाजवीत येतात.)

विश्वा०—तान्या, ठ्येय खालीं पोतडी. ह्ये बग इतं दादासाव-रावसाव, खांसाव–मियासाब बसलं हैती. कर इतच तमाशा ! (ढोलकें वाजवितो)

ताना०—हां हां ! कर सुरू–कर सुरू–कर सुरूं–!

विश्वा०—बिर्मदेवानं गरुडाला आवतन दिलं अन् गरुडाला जसा सर्पाचा तमाशा धरनीवर दावलान् तसा दाव समद्यान्नी !

ताना०-दावतो बग ! काढ पुंगी आणि लाग वाजवाया. ह्ये समद लोक नागासारखं डोलूं दे तुझ्या पुंगीनं !

विश्वा० —अन् मग ही गाजराची पुंगी तूं न मी खाऊनश्यान् टाकूं म्हंगतोस ? अन मंग ल्येका प्वाट कसं भरूं ?

ताना० —लोकांच खिस कातरून ! गळ कापून ! अन्—

विश्वा०—जोड खाऊन न्हाई का ? इतं जमलेलं हे रावसाब–दादासाब-या खांसाब–मियासाहेबाचं जोडं खातील कारे ?

ताना०—हां हां !

विश्वा०—हां हां काय ल्येका ! (देवराव येतो) ह्ये बग अमीरसाब आल. हो म्हार ! अमीरसाब—नबाबसाब–पठाणसाब ! वाईच तमाशा बगा, अन् इनाम द्या. नाईकसाब ! नबाबसाबाना वाईच बसूनशान् द्या.

पहा०—नबाबजादे ! बैठिये ए धक्केपर !

देव०—हां हां, मै तो–पाहू सकते. हां हां !

ताना०—हां हां ! ह्ये बग अदुगर हातचलाखी दाव जरा नबाबसाबांस्नी. म्यां सर्पाचं खेळ दावतो. (एक अजगर काढून ठेवतो.)

देव०--ए गारुडी, उसको जरा दूर रखना हां ! मै सूना है के वो जनावर आपके पेटमें आखा आदमी गट्ट करते है. संभालो.

विश्वा०—भ्येवू नका नबाबसाब. ही बगा कांडी. ह्यो बगा पैसा. ह्ये बगा घालवतों. छू मंतर, कोल्हाकंतर, चले जाव. हा ग्येला बगा–आतां दोन आनतो. ह्ये बगा–ह्ये चार बगा–ह्ये आठ बगा–ह्ये समदं गेलं बगा. ह्या बव्या शिपायबुवानं भरलं हैती खिशामंदी.–ह्ये बगा काढतो नाईकसाब ! जरा खिसा करा इकडं (खिसा झाडून) ह्ये बगा.

देव०—ओहो ! क्या बात है. नाईक ! तुमने यह गरीब गारुडीका पैसा चोर डाला था नहीं ? मत करना ऐसा फिर. कोतवाल साबकू मैं सांगू गा हां !

ताना०—ह्यो सरप बगा ! जंगली है. मिन्या डोंगरातनं आणला बगा. बगा कसा टिचकी मारताच फुसकारतो (पुंगी वाजवतो.)

विश्वा०—कसा डुलतोय सरप बगा !

देव०—बजाव बजाव वैसीही बजाव ! मै भी ए विषारी सर्पकेसरसे झुल रहते है.

विश्वा०—(स्वगत) तूं सापच पडलास !

तानाजी—हा दुसरा साप बगा ! अरं माझा दुसरा सरप कुठं ग्येला ? अर बगा–बगा–बगा–नबाबजाद ! माझा सरप कुठं ग्येला हो.

देव०—किधर गया ? संबाल. इधर किसकोभी वो चावते तो आदमी मर जाते संभाल.

तानाजी—नबाबसाब ! आपुन तर दवडला न्हाईना माझा सरप ?

देवराव—मी ? अरे नहीं. मै कैसा दवडीन रे ? मी तर सापाला इतका भितों कीं कांहीं बोलूं नका. इतके सगळे लोक आहेत इथं ह्मणून मी आतांपर्यंत बसलों तरी इथं. नाहींतर सर्पाच्या खेळाला-अरे बापरे !

तानाजी—नबाबसाब ! आपुन पागुट्यामंदी दडवूनशान ठेवला हाय बगा माझा सरप.

देव०—मी दडवून ठेवला आहे ? ही काय रे भलतीच थट्टा ?

विश्वा०—नबाबसाब, ह्यो तान्या खरं बोलतो हाय बगा. मंगा त्या शिपायबुवानं जसं माझं पैसं खिशामंदी ठेवलं व्हतं, तसाच बगा आपुन या तान्याचा सरप ठेवला हाय मुंडाशामंदी ! देवाच्यान, तुमच्या मुंडाशांत सरप हाय.

देव०—आं ! अरे बाप रे ! खरंच आहे का रे ?

तानाजी—काढूं मुंडासं ? दाऊं सरप ?

देव०—काढूं नकोस. पण-नको-काढ-नको-अरे देवा ! या अल्ला-खुदा दत्तराजा-पैगंबरा-मारुतीराया-रसूल अल्ला ! काढरे काढ !

तानाजी—(देवरावाचें पागोटें उचलतो. सर्प खालीं पडतो) ह्यो बगा निघाला, नबाबसाब !

देवराव—आणखी नाहीं ना एखादा ? मी पागोटंच घालीत नाहीं.

ताना०—आमी गारुडी बगा वाटल तितून सरप काढतों. आपल्या पोटातनं बी काढूं बगा.

देव०—नकोरे बाबा तेवढं करूंस. मी जातों आतां.

ताना०—आतां वाईच एक उंदराचा खेळ दावतों. उंदीर हाय पन मानसावानी बोलतो बगा.

देव०—माणसासारखा बोलतो ? ओहो क्या बात है. ओ हमारे मूसे तो नहीं निकलते तुम ?

ताना०—न्हाई बगा ! या माझ्या पोतडीतनं काढतों बगा. त्याला बोला. उंदीरमामा ! तुम्ही तयार हाय काय ?—हाय ! म्हंगत्यात. जरा वाइच भाइर येताका ?-हो. हो येतो म्हंगत्यात.-मंग या की ?-कोन कोन हैती म्हंगता ?—ह्ये बगा रावसाब-दादासाब-खानसाब-नबाबसाब आलं हैती ना.

देव०—मी आलों आहे का म्हणून विचारतो आहे ना ?—वा: काय पण-उंदिर मामा मै आया हूं इधर. जरा सामने आव. बात करो मेरे साथ.

ताना०—समद्यास्नी येख्यान देयन म्हंगत्यात. ह्यो धक्का हाय बगा तुमास्नी उबं रहायला. (उंदीर काढून धक्क्यावर ठेवतो. सर्प त्याच्यावर उडी मारतो. उंदिर भोकांत शिरतो; व सर्पही त्याच्या मागोमाग जातो.) अर उंदिर ग्येला भोकांत !

विश्वा०—अर हा सरपय ग्येला बग. पकड पकड त्याला. ओढ भाईर.

ताना०—ग्येला आमंदी. आता कसचा गवासतो. आमंदी जाऊन-ध्यान धरतो बग. (आंत जाऊं लागतो.)

पहा०—आं ! मत् जाव. अंदर नहीं जाना. हटो पीछे.

विश्वा०—पन नागुबा तर धरूं द्या अमास्नी. आमचा पोटाचा धंदा. ह्यो उंदीर मारला असल बगा त्यानं.

ताना०— ग्येला ! माजा उंदीर ग्येला अन् सापबी ग्येला. बुडालों मी ठार. नाईकसाब ! जाऊंद्या आमंदी.

पहा०—नहीं जाना, चले जाव यहांसे. भीतर तो बडे बडे कैदी है. वह कोठडी, जिसमें उंदिर गये है उसमे शहाजी राजे है.

विश्वा०—(स्वगत)—आम्ही वे अकल आहोंव वाटवं रिकामा तमाशा दाखवायला.

तान्हा०—शहाजीराज !—मंग त्यो सरप त्यासनी डसलकी, चावलकी.

विश्वा०—(स्वगत) दांत पाडलेलाच आहे.

पहा०—चावे तो हमको क्या ! वह राजेसाहेब मरजाएंगे. चलो.

देव०—मेरे घरको एक दिन चलो, और उधर थोडा तमाशा दाखवो. मै तो बहोतही खुष हुवा है. ए ले जाव इनाम. फिर जादा मिलेगा. मेरा नाम नवाबजादा है.

तान्हा०—आमी कंदीतरी येऊं की. (जातात.)

प्रवेश ५ वा.

स्थळ—अंधारकोठडी. (हातापायांत बेड्या असलेला शहाजी.)

शहा०—(स्वगत) सज्जनाला राजदरबार ह्मणजे अंधारच ! त्या अंधारांत त्याला सरड्याच्या रंगाप्रमाणें घटकोघटकी पालटणारे राजाचे रंग दिसत नाहींत. दुर्जनाला—काळोख्या रात्रीं वावरणाऱ्या त्या चोराला ते रंग स्पष्ट दिसतात, आणि त्या रंगाप्रमाणें तो स्वतःचे रंग बदलीत असतो.—पातशहा ! तुझं खरं रूप मात्र या अंधारकोठडींतल्या अंधारानं मला स्पष्ट दाखवलं. या लोखंडी सांखळीमुळं तुझ्या सेवेच्या सोनेरी बेडीची किंमत कळली; आणि तुझ्या हुकमानं चांडाळ मला भिंतींत चिणून माझे प्राण घेऊं लागतील, त्या वेळीं तूं गादीवर बसतांना दिलेल्या वचनांचा फोलपणा मला कळून येईल.—मीच चुकलों. मला स्वतःला विजापुरचा पातशहा होतां आलं असतं. पण हें इमान—ही राजनिष्ठा—ही जन्मोजन्मीं हाडींमासीं खिळलेली स्वामिभक्ती आड आली !—छेः नको. या क्षुद्र विचारांचा वारा सुद्धां नको. उरलेले क्षण असल्या विचारांत घालवून, नरकाचं साधन कां करून ठेवायचं ! परमेश्वरा ! तुझंच नांव आतां मरेपर्यंत मुखीं येऊं दे.

(भजन करीत बसतो. भजनाच्या शेवटीं प्रकाश होऊन एक उंदीर हातावर उडी घेतो.)

हें काय ?—प्रत्यक्ष परब्रह्म उंदराच्या रूपानं माझ्या हातांत आलं तर नाहीं ?-काय हें तेज ! अंधार कोठडींत किती तरी प्रकाश पडला एकदम !—हें काय ?—सर्प ! विषारी सर्प !— खबरदार-या सर्पाच्या भयानं—बा उंदरा !—तूं माझ्या अंगावर उडी घेतलीस ?-कांहीं हरकत नाहीं. भिऊं नकोस. तूं योग्य मनुष्य गाठलास. माझ्या हातांत जरी बेड्या आहेत, तरी ते तुझं रक्षण करायला समर्थ आहेत. मी तुझ्याकरतां प्राण देईन ! कारण तूं उंदीर आहेस; आणि माझ्या शिवबालाही डोंगरांतलाउंदीर म्हणतात ! सर्पा ! तूं जर खरा जातिवंत नाग असशील, माझ्या उदार मनाची जर तुला परीक्षा असेल, शौर्याबद्दल जर तुला आदर वाटत असेल, तर इथून एकदम चालता हो. तुला शंभुमहादेवाची शपथ आहे. (सर्प जातो.) एवढा विषारी सर्प, पण त्याला सुद्धा माझ्या शब्दाची किंमत वाटली. पण पातशहाला वाटत नाहीं !—बा उंदरा ! आता तूं बिनघोर आपला रस्ता धर.—पण या उंदराभोंवती हा प्रकाश कसला ?—याच्या कमरेला प्रकाशित दोरीनं चिठी कसली बांधली आहे ?—सोडून पाहूं या अगोदर ! (वाचण्याकरितां उघडून) काय दिव्य हीं अक्षरं ! प्रकाशाच्या शाईनं कुणी महात्म्यानं हीं लिहिलीं आहेत. ' भिऊं नका. योग्य वेळीं तुमची मुक्तता होईल. '- अहाहा ! हा दिव्यसंदेश मी निरंतर असा या हृदयावर बाळगीन.-बा उंदरा ! मी तुला वंदन करतों. हा निरोप नव्हे, हा आशेचा किरण तूं मला दाखवलास. या अंधारकोठडींत तूं माझा सोबती हो. पण तूं इथं खाशील काय ? इथं अन्न नाहीं. पण नसलं तरी चिंता नाहीं, या माझ्या शरीराचं मांस काढून तें मी तुला खायला देईन.

(पहारेकरी व जेवणाचे ताट घेतलेला एक मनुष्य येतो.)

पहा०—राजेसाहेब, हें ताट आणलं आहे वाढून.

शहा०—पातशहाचा हुकूम काय आहे ? मला अन्नपाणी द्यावं का देऊं नये ?

पहा०—' देऊं नये ' असाच सुलतानांचा हुकूम आहे.

शहा०—मग तुम्ही हें ताट काय म्हणून आणलंत ? माझी दया वाटली म्हणून ? पातशहाचा हुकूम मोडून तुम्ही बेइमान झालांत; पण मी बेईमान झालों नाहीं. पातशहाच्या हुकमावाचून मी अन्नपाणी घेणार नाही. न्या, माझ्या दृष्टीसमोरून तें ताट !

पहा०—राजेसाहेब ! आज पांच दिवस झाले, आपल्या पोटांत घांसभर अन्न नाहीं, कीं घशांत घोंटभर पाणी नाहीं. म्हणून मुद्दाम माझ्या घरीं मी हिंदूकडून हें जेवण तयार करवून आणलं आहे.

शहा०—हिंदूकडून ? तुम्ही कोण मुसलमान आहांत ?

पहा०—होय राजेसाहेब.

शहा०—मुसलमानाला हिंदूची दया काय म्हणून ?

पहा०—भाई म्हणून. हिंदू आणि मुसलमान ही एकाच अल्लाची लेकरं आहेत. शिवाय हा भूतदयेचा प्रश्न आहे, खऱ्या धर्मांचा प्रश्न आहे.

शहा०—दयेचं-धर्माचं अन्न शहाजीला चालत नाही.

पहा०—मग मी आतां काय करूं या अन्नाचं ?

शहा०—तें एखाद्या गाईला घाला. माझा शिवबा गाईला आई समजतो. पुण्य लागेल तुम्हांला गाईला घालाल तर. पातशहानं राज्यकारभाराच्या घाण्याला धरलेला मी बैल आहें. मला या अन्नाचा उपयोग नाहीं. मी तें खाणार नाहीं आणि तुम्हांलाही पुण्य लाभणार नाहीं. घेऊन जा तें ताट.

पहा०—जी हुकूम. (पहारेकरी व मनुष्य ताट घेऊन जातो.)

शहा०—(स्वगत) भूतदयेचीं रोपं दगडी कैदखान्यांत पाषाणाच्या फरसबंदीवर रुजतात का ? निरपराधी माणसांच्या रक्ताचं पाणी मिळून

तीं जोरानं फोफावतात का ? त्यांच्या सडलेल्या हाडामासाचं खत मिळून त्यांना फळं येतात का ?

देव०—(आंतून) शहाजी राजे ! अहो राजेसाहेब !

शहा०—आला हरामखोर मला टोंचायला !

देव०—(आंतून) राजेसाहेब ! ओ द्या की ! कशी काय आहे आपली हालहवाल ? प्रकृतीविकृती ठीक ?

शहा०—किती काळजी वाहतो आहे माझ्या प्रकृतीची !

देव०—(आंतून) राजेसाहेब ! अहो बोला ! झोप लागली काय हो ? काळोख खाऊन पिऊन ढेंकर देत बसला आहां कीं काय ?

शहा०—खाण्यापिण्याची चौकशी करतो आहे मांग !

देव०—(आंतून) अहो माझं बोलणं ऐकूं येतं आहे कीं नाहीं तुम्हांला ? कीं सापबिप चावून मेलांत ?

शहा०—तो जातिवंत साप चावता तर पत्करता, पण हरामखोरा, तुझे हे विषारी फूत्कार नाहीं सोसत.

देव०—(आंतून) मुजरा घ्या म्हटलं या नबाबजाद्याचा. काय ? कसं काय वाटतं आतां ?

शहा०—"सांपळ्यामध्यें व्याघ्र सांपडे, बायका मुलें मारिती खडे !"—जरा आंत ये हरामखोरा !

देव०—(आंतून) नको, इथूनच निरोप घेतों. गवंड्याला सांगून ठेवतों परवां ये म्हणून.

शहा०—चांडाळा ! कर वाचा बंद. परमेश्वरा ! (छातीवर हात ठेवतो)-हें काय ?—हाच तो दिव्य संदेश ! "भिऊं नका, योग्य वेळीं तुमची मुक्तता होईल."

(पडदा पडतो.)

अंक दुसरा समाप्त.

अंक तिसरा.

प्रवेश १ ला.

स्थळ--बाजी घोरपड्याचा वाडा.

बाजी--(स्वगत) शिष्टाचार! म्हणे शहाजीला मेजवानीला बोलावून दगलबाजीनं पकडलं!—मग पकडलंच! नाही म्हणतो कोण? —यांत दगलबाजी कसली?—पातशहाच्या हुकमाची अम्मलबजावणी बरोबर केली, ही स्वामिभक्ती का दगलबाजी?—लोक मला खुशाल दगलबाज म्हणोत! कपटी काळसर्प म्हणोत! शिष्टाचार पाळला नाहीं म्हणोत! लोकांच्या आक्षेपांची जर पर्वा करीत बसलों, तर या शिवाजीला तरी कसा पकडायचा?—हरामखोर काल तिथून कसा पळाला कुणाला ठाऊक!—का तो तिथं असून त्या बाईनं त्याची दाद लागूं दिली नाहीं? खास तेंच!- काय जहांबाज बायको!—पण म्हणावं, आज मी तुझ्या लपंडावाला फसायचा नाहीं.—शिवाजी जर माझ्या हातीं लागला नाहीं तर? सुलतानाला शरण जाणार नाहीं, असं तो आज म्हणतो आहे खरा; पण उद्यां त्याचा बेत फिरला, आणि रणदुल्लाखानासारख्या खुलसट सरदारामार्फत सुलतानाला गपचिप शरण गेला तर?—तर काय! आमचा दुधखुळा सुलतान शहाजीला खास सोडून देईल. आणि तसं झालं तर माझी—आमची सर्वांची पाळंमुळं खणल्यावांचून तो कसा राहील?—छे: हें नाहींच उपयोगी! त्याचींच पाळंमुळं खणून काढीन!— तो—त्याचा मुलगा—त्याची सून यांचा एकदम निकाल लावीन तरच मी नावाचा बाजी!—(डंका वाजतो) हा पहा पहाटेचा पहिला डंका झाला! दुसरा डंका व्हायच्या आंत जे कांहीं करायचं तें उरकून घेतलं पाहिजे.

(जातो)

प्रवेश दुसरा.

स्थळ–दिवाणखाना.

(दोन पलंग—एक पलंगावर सईबाई झोंपली आहे. दुसरा रिकामा. शिवाजी भिजलेला येतो. डंका वाजतो.)

शिवाजी—मी महालांत पाऊल ठेवतांच हा डंका झाला पहा! अंधःकाराच्या जबड्यांतून धरणीमातेची सुटका झाली, म्हणून हा आनंदाचा डंका होतो आहे. गुलामगिरीच्या अंधःकारांत जगबुड व्हायची वेळ आली होती, पण भगवान सूर्यनारायणानं उडी टाकून तो प्रसंग टाळला; म्हणून हा डंका आनंदानं गर्जू लागला आहे. सई, ऊठ–ऊठ. ही पहाट झाली पहा.

पद. (चाल—तोम तननन).

हा गगनपति तमारि दिनकर । अरुणधामिं उघळित किरणराशि ॥ धृ० ॥ जागी हो बघ उषा विराजत । निज रमणा अरिंदमना नियोजि । धावत नभिं धमकावित सत्ता मिरवित । क्षांत कांत शांताया ॥ १ ॥

सई—महाराज, आपण केव्हां उठलांत ?

शिवाजी—आज मी मुळीं झोंपलोंच नाहीं.

सई—कां बरं ? उद्यां सकाळीं शहाजीराजांना भिंतींत चिणणार, या विचारानं का आपल्याला सारी रात्र चैन पडेना ? राजेसाहेबांच्या मुदतीचा शेवटचा दिवस, म्हणून फिकिर वाटून का आपल्याला झोंप लागली नाहीं?

शिवाजी—ती फिकीर मी करून काय करणार ? ती फिकीर त्या परमेश्वराला! आपण नुसता प्रयत्न करणार. यश देणं न देणं त्याच्या हातांत! पण अगोदर मला हे कपडे काढूं दे. ते अगदीं ओले चिंब झाले आहेत.

सई—मग आंगावर कशाला घातले ?

शिवाजी—आंगांत घातल्यावरच ओले झाले.

सई—म्हणजे?

शिवाजी—म्हणजे काय? मी आज झोपलों नाहीं म्हणून सांगितलं ना तुला मघाशीं!

सई—मग कुठं बाहेर गेलां होतां कीं काय?

शिवाजी—हो, तुला झोप लागल्यावर कांही वेळानं मला बाहेर जाणं भाग पडलं.

सई—तें कां?

शिवाजी—कामगिरी आली म्हणून. एक अनाथ बाई आणि तिचं तान्हं लेकरूं दोघं नदींत बुडत होतीं. त्यांना काढायला गेलों होतों. तानाजी होता मागोमाग. त्याच्याबरोबर त्या बाईला तिच्या घरीं पाठवून दिली, आणि मी इकडे आलों. मी दुसरे कपडे करून येतों अं! (जातो)

सई—(स्वगत) हा पुरूष अवतारी नाहीं, असं कोण म्हणेल? असला अद्भुत पराक्रम, असली अफाट बुद्धिमत्ता, असलं लोकोत्तर धैर्य, असलं दैवी सामर्थ्य, अवतारी पुरूषावांचून कुणाच्या तरी वाट्याला येणार आहे का? पूर्वजन्मींची पुण्याईच, म्हणून या जन्मीं यांची अर्धांगी व्हायचा मान मला मिळाला.

पद. (चाल—मिळजानावें.)

जन्मा यावें। गुणवंता वरावें। प्रेमें एकरूप व्हावें॥
॥ धृ० ॥ तोचि मला तारिता। तोचि मला सावरीता।
थोर पदां सेविता। पुण्यकाळ ये॥ १॥

(शिवाजी येतो)

शिवाजी—हें पहा—मला जरा थकवा आला आहे. घटकाभर स्वस्थ पडूं दे. कससंच होतं आहे. जरा ग्लानी आल्यासारखं वाटतं आहे. (पलंगावर पडतो)

सई—होय का ? मग आपण जरा असंच पडावं. मी जरा खालून दूध आणतें. तानाजी अजून आले नसतील. जरा असंच स्वस्थ पडायचं मी येईपर्यंत. (जाते)

शिवाजी—मला असं काय होतं आहे हें ? माझी दृष्टि जडजड कां होत चालली ? माझे कान असे बधिर कां होत चालले ? मस्तकांत सण् सण् असा ध्वनी कां निघतो आहे ? मला खालीं खालीं कोण दडपतं आहे ? पुन: वर कोण ओढतं आहे ? अरे ! हें आहे काय ? अं—अं—अं—अरे ! हळुहळु हे कोण येत आहेत ? अरे—माझ्या हाताला कां मिठाळतां ? थांबा—या एका हातानं तुम्हांला दाखवतों. अरे—बांधलं मला ! चोर मला घेऊन कुठं चालले ? हा बघा सुटलों ! तुम्ही मला कोण समजतां ? अरे,—अरे—अरे ! हें काय ? अरे, बाबांना भिंतींत चिणताहेत हे हरामखोर ! आण—माझी तरवार आण. छाटून टाकतों या हरामखोरांना ! अरे, गळ्यापर्यंत त्यांना चिणलंरे ! काय करूं ? कुठं आहे माझी तरवार ? (उडी टाकून) तरवार ! माझी तरवार ! (सई येते)

सई—धावा—धावा. वाड्याला वेढा पडला. घरणं आलं. चला—चला अगोदर इथून.

शिवाजी—चला ? हा पहा चाललों ! माझी तरवार ! (पलंगावर पडतो.)

सई—देवा ! काय रे हें संकट ? उठा—उठा महाराज, उठा. (त्याला बसवते तो पुन: पडतो) अगबाई ! यांना कसलीच शुद्ध नाहीं ! देहांत अवसानही राहिलं नाहीं ! महाराज, माझ्याकडे जरा पहा. छे: ! दृष्टीला दिसतही नाहीं ! महाराज ! महाराज ! छे: ! कानांनीं ऐकूंही येत नाहीं. ही पहा, बाहेर शत्रूंची गडबड सुरू झाली ! देवा, आतां करूं तरी काय ? तूंच आतां यांचं रक्षण कर—पण नुसती देवाची विनवणी करून काय उपयोग ?—पण संकटांत हातपाय गाळणाराचं गाऱ्हाणं देव ऐकेल का ? छे: ! प्रयत्न हा केलाच पाहिजे. प्रयत्न केला

तरच परमेश्वर पाठिराखा असतो. मी मराठ्याची मुलगी आहे–मी मराठा वीराची पत्नी आहे—ही पहा मी तरवार घेतली. तरवार हातांत घेतांच माझ्या अंगांत हा कसला संचार झाला ! खास–खास मी महाराजांचे प्राण वांचवीन. त्यांच्या प्राणाकरतां मी माझे प्राण देईन.

शिवाजी—(सावध होऊन उठून) आण–माझी तरवार आण. माझा पोषाखही आण.

सई—महाराज, आपल्या अंगांत शक्ति नाहीं. आपण जरा पडूनच रहा.

शिवाजी—पडून कसा राहूं ! ते हरामखोर आज रात्रींच बाबांना भिंतींत चिणून टाकणार आहेत. जलदी करून मला बाबांचे प्राण वाचवूं दे.

सई—महाराज, आपल्याही प्राणावर गदा आली आहे. शत्रूंचं घरणं आलं आहे. सगळीकडून वाडा शत्रूंनी वेढला आहे.

शिवाजी—तें मला ठाऊक आहे. मला अगोदर पोषाख चढव.— लाडके, तुझ्या हातांत तरवार !

सई०—महाराज, मी खालीं दूध आणायला गेलें, तो बाहेर चाहूल ऐकली. म्हणून जरा खिडकीकडे कान दिला, तों चमत्कारिकच शब्द माझ्या कानीं आले. मी फटींतून पाहिलं, तर तो बाजी घोरपडे आपल्या लोकांकडून वाड्याला वेढा देतो आहे. आपल्याला सांगायला मी तशीच वर आलें, तों आपल्यालाच शुद्धी नाहीं. महाराज, मी काय करणार ! देवीचा धांवा केला आणि आपले प्राण वाचवतां वाचवतां मरण यावं, म्हणून हातांत तरवार घेतली.

शिवा०—शाबास ! आतां तूं भिऊं नकोस. माझा पोषाख चढव अगोदर.

सई०—हा पहा, मी पोषाख चढवतें. पण आपण बाहेर कसे जाणार ? आपण इथंही राहून सोय नाहीं ! काल त्यानं वाडा शोधला नाहीं; पण आज तो कोनन्‌कोपरा शोधल्याशिवाय राहणार नाहीं.

शिवा०—आणि जरी त्यानं कोपरान्कोपरा शोधला, या वाड्याच्या भिंती पाडून पाहिल्या, लाकडं फोडून पाहिलीं, जमीन खणून काढली, तरी मी त्याला इथं असूनही दिसायचा नाहीं. वाः! किती लवकर माझ्या अंगावर हा पोषाख घातलास? या तुझ्या हातच्या पोषाखामुळेंच या वेळ्यांतून शत्रूच्या अगदीं जवळून जातांनासुद्धां मी त्यांना दिसणार नाहीं.

सई०—काहींतरी बोलायचं! प्रसंग कोण आणि ही थट्टा कसली? महाराज, ऐका. दरवाजावर घाव बसताहेत. कुऱ्हाडींनं दरवाजा फोडताहेत वाटतं?

शिवा०—बिचाऱ्या घरवाल्याचं नुकसान उद्यां भरून द्यायला हवं!

सई०—स्वतःच्या प्राणाच्या नुकसानीचा विचार राहिला! पण घरवाल्याच्या दरवाजाच्या नुकसानीची काळजी पडली आहे.

शिवा०—तुला माझ्या प्राणांची मुळींच काळजी नको.

सई०—काळजी नको म्हणून कुणी ऐकेल का? महाराज, आपण अंगांत चिलखत घालावं. खरच चिलखत घालावं. काय नेम? इतक्या लोकांपैकीं आपल्याला कुणीच कसं पाहणार नाहीं? त्या मेल्याशीं चकमक झडली तर वार नाहीं का होणार एखादा? गोळी नाहीं का येणार एखादी तरी?

शिवा०—वार कसचा आणि गोळी कसची? बाबांच्या सुटकेच्या विचारांत मी गर्क झालों असतांना, तरवारी बंदुका माझें काय करणार आहेत? त्यांच्या कृपेचं चिलखत-त्यांच्या आशीर्वादाचं शिरस्त्राण-माझ्या अंगावर असल्यावर तरवारींच्या वारांची आणि बंदुकीच्या गोळ्यांची मला कसली भीती?

सई०—आपण किती सांगितलं, तरी माझं मन कसं ऐकणार? ऐका, दरवाजा फोडला वाटतं? महाराज, माझ्या उरांत तर धडकी भरली!

शिवाजी—माझं हृदय—बघ किती शांत आहे. ऐक—या हृदयावर कान ठेव आणि ऐक. एक तरी भीतीचा ठोका तिथं पडतो आहे का ? तुझ्या हृदयाला अस्सा त्याचा स्पर्श होऊं दे म्हणजे तेंहीं शांत होईल. (आलिंगन देतो) कां ? झालं शांत ?

सई०—झालं—अगदीं शांत झालं. त्याच्यांत धैर्य आलं —नवीन सामर्थ्य आलं.

शिवाजी—त्या सामर्थ्याचाच विश्वास धर. आत्मविश्वास हेंच खरं सामर्थ्य ! तूं माझ्याबरोबर खालीं येऊं नकोस—इथंच रहा. या खिडकींतून पहा. मी जातांना शत्रूंपैकीं कुणीही मला ओळखित नाहीं, असंच तुला दिसेल. भिऊं नकोस. येईल त्या प्रसंगाला तोंड दे—(शिवाजी जातो)

सई०—(स्वगत) अगबाई ! कितीतरी ही फौज वाड्याभोंवती ! जसा समुद्रच पसरला आहे ! ती पहा स्वारी-घोड्यावर स्वार होऊन वाड्याच्या दरवाजांतून बाहेर पडली.—हे लोक त्यांना पहात कसे नाहींत ? सावकाश-हंसत हंसत घोडा चालवला आहे. जणूं काय आपल्याच फौजेची पाहणी करताहेत !-ही पहा फौज दुभंग झाली ! गेले-वेढ्याच्या पार गेले ! तो पहा-चौखुरी घोडा उडवला ! अंबिके ! अशीच आमच्यावर कृपादृष्टी असूं दे.

पद—(चाल-कान्हा हटज मैतो०)

ज्या अभयवरदानि माता । क्षण जरि हसवल । करवि कराणि । अतुल कदनिं । जनमोचनरत तया । तारि सदा ॥ धृ० ॥ हरिवदन बघुनि तें चढत यमुनाजल वरिवरि । जलिं निजचरण मारि । भंगुनि पथ करि ॥ १ ॥

—स्वारी गेली. स्वारीचं काम स्वारी करीलच. मला आतां कशाला त्याचा विचार ! माझं काम मला करूं दे. अगोदर या पलंगावर पडूं या. घोरपडे आला तर काहूं पुनः त्याची खरड—पण नको. महाराज इथं राहतात याचा त्याला पुरा पत्ता लागला आहे.—पण मीच महाराज

झालें तर !--डोकीपासून पायापर्यंत पांघरूण घ्यावं. पाहूं काय होतं तें ! पण मला तो महाराज समजला तर मी कुठं आहे म्हणून पुनः त्याला शंका येईलच. काय बरं करावं ?—या दुसऱ्या पलंगावर उशा गिर्द्या अशा रचाव्या. वर ही एक दुलई. वा: ! किती हुबेहुब ! जसें कांहीं महाराजच झोंपले आहेत तोंडावरून दुलई पांघरून ! मीही हाच नमुना करतें. पाहिलन् तोंड तर खरडपट्टी ! आणि–पण हे आलेच. (बाजी घोरपडे व कांहीं लोक दबत दबत येतात.)

बाजी०—हळू—अगदीं हळू ! झोंपला आहे पलंगावर. त्या दुसऱ्या पलंगावरची ती बाई असेल. पण शिवाजी कुठला ? या पलंगावरचा–कीं त्या ? विचार करून उपयोग नाहीं. जागा झाला तर सगळंच फसायचं—अरे, या पलंगावर शिवाजी आहे कीं त्या–कांहीं कळत नाहीं.

एक शिपाई—पांघरूण काढून पाहूं ?

बाजी०—छे:, तो जागा झाला तर भलतंच होईल. हे दोन्ही पलंग दोरखंडांनीं गुरफाटा—जखडून बांधा. (बांधू लागतात) हालूं देऊं नका. हुशिआर ! बांधा–बांधा. आतां कसचा पळतो ! अरे हरामखोरा, कसा सांपडलास ? हा बाजी घोरपडे तुला कमी वाटला ? नाहीं ? पळ आतां कसा पळतोस तो ! बापाला सोडवायला पाहिजे नाहीं ? आतां तुलाच कोण येतो सोडवायला तें पाहातों. चला रे—उचला दोन्ही पलंग आणि चला घेऊन. (जातात)

प्रवेश ३ रा.

स्थळ—रणदुल्लाखानाचा महाल.

(तुकाबाई व व्यंकोजी येतात)

तुका०—बाळ, थांब जरा.

व्यंकोजी—कितीवेळ थांबायचं ग इथं ? म्हणे खानसाहेब अद्याप उठले नाहींत झोंपून. चल घरीं.

तुका०—असं काय बाळ करावं ! अरे, आपले जीव काळजींत, म्हणून आपण लवकर उठतों. वेळ अवेळ कांहीं पाहात नाहीं. राजे घरीं असतांना आपणसुद्धां हा वेळपर्यंत बिछान्यांतून उठत होतों का ?

व्यंकोजी—तूं झोंपत होतीस-पण बाबा आणखी मी अगदीं पहाटे उठत होतों. हे खानसाहेब ऐदीच दिसताहेत मला ! सगळं कांहीं सावकाश चाललं आहे. अजून उठले नाहींत ! उठल्यावर दोन घटका पलंगावरून खालीं यायला; पुन: दोन घटका हुक्का प्यायाला; पुनः दोन घटका—

तुका०—बाळ, असं बोलूं नये. इतर खानांचं असो-पण हे रणदुल्लाखान फार चांगले आहेत. स्वभावानं दिलदार आहेत, फार ममताळू आहेत. हिंदूंबद्दल त्यांना फार आदर वाटतो. बोलायला किती गोड !—

व्यंकोजी—-पण ह्यातून कांहींच होत नाहीं.

पद. (चाल—नलिनायताक्षिगे.)

वचनीं सुधा माते । कृतिला जुळेना तें ॥ धृ० ॥ आराधितां तया । वैराग्य ये जिवा ! रडवित दिन दिन धाय धाय हाय मागुतें ॥ १ ॥

तुकाबाई—वेडा आहेस तूं ! आतांच पाहाशील. ते पहा, रणदुल्लाखानच आले. कर मुजरा त्यांना. अगदीं लवून हं—(रणदुल्लाखान येतो. व्यंकोजी मुजरा करतो.)

रणदुल्ला—या छोकऱ्याकडे पाहून माझा दिल् तुटूं लागतो. राणीसाहेब, आपण स्वत: येण्याची तसदी कशाला घेतलीत ? राजेसाहेबांना सोडवायचा आम्हीं प्रयत्न करीत नाहीं, असं कां आपल्याला वाटतं ?

तुका०—खानसाहेब, आपण प्रयत्न करीत असाल. पण राजेसाहेबांची या जगांतल्या आयुष्याची मुदत आज रात्रीं संपते, तोंपर्यंत मी कशी स्वस्थ

स्वस्थ बसूं ? आपल्यासारख्या वजनदार अमीरउमरावांच्या दाराशीं हाक मारूं नको तर काय करूं ? आपल्या पायावर असं लोटांगण घेऊं नको, तर कुणाच्या पायावर घेऊं ?

रणदुल्ला—त्या परवरदिगार परमेश्वराच्या. राणीसाहेब, माझ्या हातीं काय आहे ? मी दररोज पादशहापाशीं शहाजीराजांबद्दल तरफदारी करीत असतों, पण त्याच्या डोक्यांत तुमच्याच पैकीं कांहीं पाजी लोकांनीं जें कांहीं वेडंवाकडं भरवून दिलं आहे, तें कांहीं केल्या निघत नाहीं. मला तर शहाजीराजांच्या स्वामिनिष्ठपणाबद्दल अभिमानच आहे. त्यांच्यासारख्या एका पुढारी मराठा सरदाराला चौकशीवांचून अन्यायानं अंधार कोठडींत ठेवणं, आणखी निष्ठुरपणानं ठार मारण्याची धमकी देणं, म्हणजे निवळ जुलूम आहे.

तुकाबाई—पादशहा जी गोष्ट करताहेत, ती लोकांच्या दृष्टीनं किती कां जुलमाची असेना—एखाद्या कर्तृत्ववान् माणसाच्या प्राणाची का बाब असेना, माझ्यासारख्या घरंदाज स्त्रीच्या सौभाग्यावर घाला पडून तिला सारा जन्म अनाथपणांत—वैधव्यांत काढण्याचा का प्रसंग असेना; या लहान अर्भकावर जन्मभर पोरका होण्याचा का पाळी येईना—त्याला जुलूम कोण म्हणेल ?

रणदुल्ला—मी म्हणतों.—हा रणदुल्लाखान याला जुलूम म्हणतो. चांगल्या माणसांच्या चांगुलपणाची जिथं किंमत राहिली नाहीं, अब्रू बेअब्रूची जिथं चाड राहिली नाहीं, दयेमायेचा जिथं मागमूसही राहिला नाहीं—तिथं सैतानी जुलूम वावरत नाहीं असं कोण म्हणेल ?

तुकाबाई—मग त्यांना वांचवण्याची मुळींच आशा नाहीं का ? माझ्या दृष्टीला ते आतां दिसणारही नाहींत का ? त्यांच्याजवळ जिव्हाळ्याचे दोन शब्द बोलण्याचीही संधी मला मिळणार नाहीं का ? देवा, काय रे ही निराशा !

पद्-(चाल-पियाके मिलन०)

वैरी कसा करि घात । नभिं जाता तळपत विहगा परि । तुटला पंख वेगें ॥ धृ० ॥ हर हर बाळा । जिव व्याकुळ झाला । कंठुं कशी काळरात । नभिं जाता० ॥ १ ॥

रणदुल्ला—राणीसाहेब, अशा निराश होऊं नका. कदाचित् आज तरी शिवाजी आल्यावांचून राहाणार नाहीं. त्याला थोडं तरी अंतःकरण असेल, वेळ प्रसंग कळत असेल, बापाच्या जिवाकरितां पादशहाजवळ तो खास भिक्षा मागेल.

तुकाबाई—भिक्षा ? आणि शिवाजी ? खानसाहेब आपल्याला कल्पना नाहीं. त्याचं अंतःकरण निवळ पाषाणाचं बनवलेलं आहे. तो या विजापुरांत आला नाहीं, असा का आपला समज आहे ! तो इथं आला, मला भेटला, सारं कांहीं झालं. त्याला कसली बापाची दया ! पादशहाला शरण जाणं म्हणजे मरण आहे, असं तो स्पष्ट म्हणाला. माझ्या आशेचा बंद तुटून गेला. राजांवर सगळी दुनया उलटी फिरली. बायको फिरली, मुलगा फिरला, मित्र फिरले आणि ज्याच्यामागं दडायचं तो पादशहाही फिरला.

रणदुल्ला—अलम दुनया फिरली, तरी अल्लानं पाठ फिरवली नाहीं ना? त्यानं तर डोळे झांकले नाहींत ना ? सारं कांहीं तो पाहातोच आहे. राणीसाहेब, आपण त्याच्यावर विश्वास ठेवून स्वस्थ असा. मुरारपंत, मी आणि दुसरे कांहीं थोर थोर अमीरउमराव आज आपल्याकडून शिकस्त करून पाहाणार आहों भिऊं नका. पादशहाला दया येईल. आणखी अल्लाही आम्हांला यश देईल. राणीसाहेब, आपण या मुलाला घेऊन आतां घरीं जा. आपले हे चेहरे पाहून मला भडभडून येऊं लागलं आहे.

तुका०—बरं. बाळ, चल.

व्यंकोजी—कुठं ? बाबांकडे का ? आई, बाबा मला भेटतील का ?

रणदुल्ला—बाळ, ते तुला भेटतील बरं. राणीसाहेब, मी दोन घट-कांनीं मनुष्य पाठवीन. त्याच्याबरोबर याला पाठवून द्या. मी त्याला शहाजीराजांकडे घेऊन जाईन.

तुका०—देव तुमचं कल्याण करो—(तुकाबाई व व्यंकोजी जातात.)

रणदुल्ला—(स्वगत) माझी छाती तर फाटून जात नाहीं ना ? इनषाल्ला ! पादशाहाला अक्कल दे. नाहीं तर पतिव्रतांचे आणि पोरक्या पोरांचे शाप या दौलतीला खास बाधतील ! त्यांच्या आंतड्यांना पडणारे पीळ या पातशाहीतीला पिळवटून काढतील. त्यांच्या जळणाऱ्या अंतःकरणाच्या ज्वाळा या रियासतीची राखरांगोळी करतील. त्यांचीं निराश मनें हा सगळा मुलुख ओसाड पाडतील. बस्स ! हाच विचार. आजचा अर्ज मंजूर झाला तर आनंदच आहे, पण जर नामंजूर झाला तर सरदारकीवर-या पादशाही आश्रयावर—लाथ मारून फकिरी घेईन. आणि दारोदार दोहरे म्हणून लोकांनीं घातलेल्या मूठभर अन्नावर संतो-षानं पोट भरीन. (शिवाजी येतो) तूं कोण ? विचारांच्या अस्मानांत चक्कर घेत असतांना एकदम माझ्यापुढं उभा राहणारा तूं कोण ?

शिवा०—मी–शिवाजी.

रणदुल्ला—शिवाजी ? तूं ? तूं शिवाजी ?

शिवा०—हो-मी शिवाजी. शहाजीराजांचा मुलगा—तुमच्या जुलमी पातशहाचा शत्रु ! मी शिवाजीच.

रणदुल्ला—पादशहाचा शत्रु तो माझा शत्रु. शत्रूच्या घरांत-शत्रूच्या समोर अचानक यायला तुला भीति वाटली नाहीं ?

शिवा०—अस्सल मुसलमानासमोर यायला अस्सल मराठा कधींच भीत नाहीं. सिंहाच्या गुहेंत शिरायला सिंह कधींच डरत नाहीं.

रणदुल्ला—तुझी छाती खरोखरच सिंहासारखी आहे. मी जर दगा केला—

शिवा०—खरा इमानाचा मुसलमान दगा करील अशी हलकट कल्पना या शिवाजीला कधींच शिवणार नाहीं. खानसाहेब, मी तुमचा खून करायला आलों नाहीं किंवा तसलंच एखादं नीच कृत्य करायलाही आलों नाहीं. मी तुमच्याकडे शहाजीराजांबद्दल न्याय मागायला आलों आहे.

रणदुल्ला—या विजापुरच्या हवेंत आजकाल न्यायच राहिला नाहीं.

शिवा०—पण आपल्या हृदयांत तर आहेना? तिथं न्याय आहे, दया आहे, उदारपणा आहे. शूरपणाला साजणारे एकूणएक गूण तिथं आहेत.

रणदुल्ला—असले तरी त्यांचा उपयोग काय? त्या गुणांना पातशहा थोडीच भीक घालतो आहे!

शिवा०—पण देव घालतो आहे ना? न्यायाला न्याय दिसतो, उदाराला औदार्य दिसतं, शूराला शौर्यही दिसतं. देव सगळ्या दैवी गुणांना मान देत असतो.

रणदुल्ला—पण सैतान त्यांना लाथेनं तुडवतो.

शिवा०—त्यांना तुडवीत असतांना सैतानाचे पाय गळून त्याच्या अंगाची राख झाल्यावांचून राहत नाहीं. खानसाहेब, अन्यायाचा—जुलमाचा जय जगांत कधीं होत नाहीं.

रणदुल्ला—पण अन्याय गर्जत असतांना शहाण्या माणसांनीं काळ-वेळ पाहून वागणं इष्ट आहे ना? दगडाखालीं दडपलेला हात मुत्सद्दी-पणानं काढून घेतला पाहिजे ना?

शिवा०—कबूल. मुत्सद्दीपणाचा डाव करूनच दडपशाहीचा दगड उलथून टाकला पाहिजे आणखी आपला हात काढून घेतला पाहिजे.

रणदुल्ला—पण हा पातशाहतीचा डोंगर आजच्या दिवसांत उलथून टाकणं कुणाच्याही मुत्सद्दीगिरीला शक्य नाहीं. शहाजीराजांचे प्राण उद्यां सकाळीं हा लोक सोडून जाणार. शिवाजी, सध्याचा प्रसंग ओळखून

पातशहाला शरण जा आणि आपल्या जन्मदात्या पित्याच्या प्राणाची भिक्षा माग.

शिवा०—वाटेल तो प्रसंग आला तरी मी पातशहाला शरण जाणार नाहीं. आणखी त्याच्याजवळ भिक्षाही मागणार नाहीं.

रणदुल्ला—तुझा निश्चय कधींही ढळणार नाहीं ?

शिवाजी—प्रत्यक्ष परमेश्वर कोपला, दुनयेला वणवा लागला, किंवा प्रलयकाल समीप आला, तरीही तरी निश्चय ढळणार नाहीं. एक रतिभरसुद्धां हा शिवाजी आपला क्षात्रधर्म सोडणार नाहीं.

पद–(चाल—दिर दिर दिर दिर०)

न चुकत नरा तें मरण । नरमणि मच तो जो धाकें
नमवि वदन ॥ध्रु०॥ मान्य नच सुजनां । पतित जलनिपात ।
धरणींत धांवे । उडत न नभांत ॥ १ ॥

रणदुल्ला—क्षत्रिय राजे भिक्षुकांना भिक्षा घालित असतात. तूं क्षत्रिय आहेस ना ?

शिवा०—अलबत्.

रणदुल्ला—तर मग मला एक भिक्षा घाल. शहाजीराजांच्या प्राणांची तूं मला भिक्षा घाल. तुझ्या वडिलांच्या प्राणांची भिक्षा–या भिक्षुकाला –या फकिराला–या रणदुल्लाखानाला–तूं घाल. याचकाला इच्छादान देऊन तृप्त केलं नाहीं, तर क्षत्रियाचं क्षात्रतेज लुप्त होतं.

शिवा०—खानसाहेब, बाबांच्या प्राणांची भिक्षा मी तुम्हांला देऊं ? ते माझ्या स्वाधीन आहेत ?—खास आहेत.

रणदुल्ला—पादशाहाला शरण गेलास तरच ते तुझ्या स्वाधीन आहेत. क्षमेच्या याचनेवाचून ते तुझ्या हातीं येणं बिलकुल दुरापास्त आहे.

शिवा—जोंपर्यंत ते देवाच्या हातांत आहेत, तोंपर्यंत ते माझ्याच हातांत आहेत. उद्यां सकाळच्या आंत शहाजीराजांची मुक्तता करून मी त्यांची व आपली भेट करवीन. तुमची भिक्षा मी तुम्हांला देईनच देईन.

रणदुल्ला—शाबास ! पण तूं दगा करून का त्यांची सुटका करणार आहेस ? कायदा झुगारून का त्यांना कैदेतून सोडवणार आहेस ?

शिवा०—मुत्सद्दीपणाचा मामला शास्त्राला आणि देवालाही मान्य असतो.

रणदुल्ला—मलाही तो मान्यच आहे. (जासूद येतो) काय आहे ?

जासूद—सरदार बाजी घोरपड्यांचा आपल्याला निरोप आहे. शहाजीराजांचा बंडखोर मुलगा शिवाजी—याला आम्हीं पकडला आहे—

रणदुल्ला—कुणाला पकडला आहे ?

जासूद—शिवाजीला. त्या लुटारूला. तो आमच्या हातांत सांपडला आहे.

रणदुल्ला—मग तो हल्लीं कुठं आहे ?

जासूद—घोरपड्यांच्या वाड्यांत. पलंगाला बांधून त्याला तळघरांत कोंडून ठेवला आहे.

रणदुल्ला—पण तो तिथून सुटला तर नाहीं ना ?

जासूद—छे:, त्याला दोरखंडांनीं ठाम जखडून बांधला आहे. तो कसचा सुटतो आतां ! त्याला आजच्याआज पातशहासमोर नेऊन पातशहाच्या हुकमानं त्याचं डोकं उडवायचं आहे.

रणदुल्ला—तूं कसली निशा केली आहेस का रे ?

जासूद—कसलीही नाहीं खानसाहेब. मी बरळत नाहीं. आज उजाडतांच शिवाजी राहात होता त्या मकानाला वेढा घालून, त्याला आम्हीं त्याच्या बायकोला झोपेंत पकडलं आणि तिथल्या तिथं एकदम पलंगावरच बांधून पलंगाच्या पलंग उचलून आणलं.

रणदुल्ला—खास तूं कैफांत बरळतो आहेस. मी खास सांगतों, शिवाजी मुळींच तुमच्या हातीं सांपडला नाहीं.

जासूद—खानसाहेब, आम्हीं खरोखरच त्याला पकडलं आहे. या हातांनीं मी स्वतः त्याच्या अंगाभोंवती दोरखंडाचे वेढे दिले. स्वतः सरदारसाहेब हजर होते पकडतांना.

रणदुल्ला—घोरपडे आणि तूं—दोघांनाही वेड लागलं आहे. जा परत आणि शिवाजीला खरोखरच तुम्हीं पकडलं नाहीं, हें प्रत्यक्ष पहा. नीट पाहून मग मला सांगायला ये. जा, शराब उतरल्यावर ये.

जासूद—जी हुजुर. (स्वगत) खानसाहेबच प्यायले आहेत शराब ! (जातो.)

रणदुल्ला—शिवाजी तूं कुठं आहेस !

शिवाजी—आपल्या समोर मी आहें.

रणदुल्ला—मग पकडलं कुणाला ?

शिवाजी—मला पकडलं नाहीं; हें आपण पाहातच आहां. माझ्या बायकोला पकडलं आहे हें मला कळालं; म्हणून बाजी घोरपड्याकडून देवीनं हा निरोप पाठविला.

रणदुल्ला—तुला जर पातशहाला शरण जायचं नव्हतं तर या विजापुरांत आलास कशाला ? आपल्या कुटुंबासुद्धां आपले जीव धोक्यांत घालायला ? तुझा बाप अटकेंत—तुझी बायकोही अटकेंत ! आतां तूं सोडवणार तरी कुणाला ?

शिवाजी—दोघांनाही. दोघांनाही सोडवायची या डोक्यावर सारखीच जबाबदारी आहे.

रणदुल्ला—दोघांनाही सोडवतांना तूं आपलं स्वतःचं डोकं मात्र गमावून बसशील. तो जासूद आतांच तसं म्हणालाही. शिवाजी, या वेळीं अभिमानाला कां बळी पडतोस ? पातशहाला शरण जा आणखी बापाचे, बायकोचे आणि तुझे स्वतःचेही प्राण वांचीव.

शिवाजी—खानसाहेब, मी जें व्रत अंगिकारलं आहे, तें पवित्रपणानं पार पाडणं माझं कर्तव्य आहे; आणि म्हणूनच पातशहाला शरण जाणं

बाबांच्या मरणापेक्षांही मला अधिक दुःखदायक वाटतं. खानसाहेब, या पातशाहतींत हिंदूंचा छळ होतो का ?

रणदुल्ला——होतो-फार होतो. विनाकारण होतो.

शिवाजी——हिंदूंना न्याय मिळतो का ? धर्माला स्मरून सांगा.

रणदुल्ला——नाहीं-बिलकुल मिळत नाहीं.

शिवाजी——देव तिथून सारा एकच, धर्म तिथून सारे सारखेच, असं कुराण सांगतं ना ?

रणदुल्ला——अलबत्. इलाही आणि ईश, राम आणि रहिम, महेश आणि महमुद-हीं एकाच अल्लाचीं निरनिराळीं रूपं आहेत.

शिवाजी——मग हिंदूंच्या देवाच्या मूर्ती कां फोडल्या जातात ? त्यांचीं देवस्थानं कां भ्रष्ट होतात ? हजारो हिंदूंना बळजबरीनं बाटवून मुसलमानी-दीक्षा का देण्यांत येते ? हिंदुमुसलमानांच्या मुलाबाळांना एकाच आचळानीं दूध देणाऱ्या गोमातेचा वध कां होत असतो ? असल्या अनाचारापासून लोकांचं रक्षण करीन; असल्या राक्षसी जुलूमांतून महाराष्ट्र मातेला सोडवीन, गाईब्राह्मणांचा छळ दूर करून नीतीचं धर्माचं राज्य स्थापन करीन, अशी मी शपथ घेतली आहे. परमेश्वराच्या आज्ञेनं मी याग आरंभला आहे. मला मुसलमानी धर्माचा अनादर करायचा नाहीं, किंवा तो जगांतून नष्टही करायाचा नाहीं. गीता व कुराण, दोन्ही ग्रंथ मस्तकावर घेउन मी पापाचा लय आणि पुण्याचा जय व्हावा, ह्मणून हा यज्ञ आरंभला आहे. आपण सांगा, कीं या पुण्यव्रताचा त्याग करून मी गुलामगिरीचा अंगिकार करूं ? साऱ्या दुनयेभर जुलमाचं साम्राज्य व्हावं म्हणून सुलतानाला हातभार लावूं ; आपणच सांगा, मी क्षमा मागूं ?

रण०——छेः छेः, तूं क्षमा मागू नकोस, आणि पादशहाला शरणही जाऊं नकोस. पण माझी भिक्षा ?

शिवाजी——ती दिल्यावाचून मी राहणार नाहीं. आपला आशिर्वाद घेऊन मी वडिलांच्या मुक्ततेकरितां हा निराळो पहा. हें पत्र, मी

आपल्या पायावर मस्तक ठेवतों. मला आशिर्वाद द्या (रणदुल्लाखानाच्या पायावर डोकें ठेवितो.)

रण०—तूं मुसलमान पादशहांना कुर्निसाद करीत नाहींस, आणि मी तर मुसलमान—

शिवा०—जातीचा मुसलमान का असेना, सज्जनाला नमस्कार करण्याला धर्माचा कधींच प्रतिबंध नाहीं. हा मी चाललों.

रण०—थांब तूंही सज्जन आहेस. मलाही तुझ्या पायांवर डोकें ठेवूं दे. (शिवाजीच्या पायांवर डोकें ठेवितो. तो एकदम निघून जातो. रणदुलाखान उठून आश्चर्यानें) या अल्ला ! ए क्या हुवा ! किधर गया वह शिवाजी ! (जातो.)

प्रवेश ४ था.

(स्थळ—अंधारकोठडी.)

शहा०(स्वगत) कितितरी निरपराधी लोक गुन्हेगार ठरून माझ्या-प्रमाणं अंधारकोठडीचीं दुःखं भोगीत असतील ! गुन्ह्यांबद्दल राजा शिक्षा देतो, ती कैद्यानं पुनः गुन्हा करूं नये म्हणून. ज्याच्या हातून खरोखरच अपराध घडला असेल, तो कदाचित् असली शिक्षा भोगल्यानंतर आपलं वर्तन सुधारीत असेल. पण जो निरपराधी आहे, तो मात्र या दूषित हवेनं बहकून जाऊन आयुष्यभर अपराधच करीत राहील. त्याची दया-शील वृत्ति मावळून तो क्रूर राक्षस बनेल. त्याचं पापभीरु मन पिशाच्या-पेक्षांही पापी होईल. त्याची धर्मनिष्ठा नष्ट होऊन तो सैतानासारखे खेळ करील. त्याची ईश्वरभक्ति करपून जाऊन तो भयंकर नास्तिक बनेल. मनुष्याला सुधारण्याकरितां स्थापन केलेलीं हीं स्थानं—हे कैदखाने —या अंधारकोठड्या त्याला अधोगतीला पोचवणारे राजमार्गच आहेत. अंदाधुंदीच्या काळांत कितीतरी निरपराधी लोक या अधोगतीच्या

कारखान्यांत जबरदस्तीनं कोंडले जात असतील. या पापाचा पर्वत राजकर्त्यांच्या उरावर त्यांचेच आपमतलबी अंमलदार बेधडक रचीत असतात. तपश्चर्या करून ज्याप्रमाणं गंगेचा ओघ भूतलावर आणला; आणि शंकरानं तो मस्तकावर झेलून धरून सगरराजांचा उद्धार केला, त्याप्रमाणं जर हे अंमलदार परोपकारी सद्गुणी असले, तर राजाच्या जिवावर लोककल्याणाचीं अनेक कृत्यें करून प्रजेला सुखी करतात; पण राजाच्या भोंवतीं सद्गुणाचा अभावच. दुसऱ्यांना पादाक्रांत करण्याची, त्यांना गुलाम करण्याची, त्यांना नामशेष करण्याची राक्षसी वासना खुद्द राजाच्याच मनांत पेटत असल्यावर तिथं सद्गुणाचीं मंदिरं कशी बांधलीं जाणार ? या जगांतलीं राजांचीं सिंहासनं जेव्हां ढासळून पडतील, त्यांचे मिजासखोर मुकूट जेव्हां चिरकुंडून जातील, त्यांच्या मस्तकावरच्या छत्राच्या जेव्हां चिंधड्या होतील, त्यांच्या हातांतील राजदंड मोडून जेव्हां त्याचे तीन तुकडे होतील, त्याच वेळीं या पृथ्वीच्या जुलमाचं निसंतान होईल. त्याच वेळीं सद्गुणाचीं रोपं रुजून, त्याचीं मधुर फळं लोकांना चाखायाला सांपडतील. राजाच्या या जुलमा विरुद्ध गाऱ्हाण्यांचा अर्ज जर परमेश्वराकडे कुणी करीत असेल, तर हा शहाजी त्याच्यावर पहिली सही करील.

(बाजी घोरपडे व देवराव येतात.)

बाजी०—हां राजेसाहेब, चला या कागदावर सही करा प्रथम.

शहा०—सही करूं ? या कागदावर सही करूं ? पातशाहाविरुद्ध परमेश्वराकडं कागाळ्या करण्याकरितां का हा अर्ज तयार केला आहे ?

बाजी०—हो पातशहाच्या विरुद्ध कागाळ्याच या पत्रांत आहेत. तुमच्या शिवबाला लोक परमेश्वरच समजतात ना ? त्या शिवाजीला आम्ही पकडला आहे. या मजकुरावर सही केलीत, तरच त्याची सुटका.

शहा०—देवा, हे काय बोलताहेस ? माझा शिवबा खरोखरच का या मांगांच्या हातांत सांपडला असेल ?

देव०—हो, हो. खरोखरच सांपडला आहे. देव काय माझ्यापेक्षा जास्त सांगणार ? तो देव मी देवराव. देवको क्या पूछते ? मुझको पूछो.

शहा०—हरामखोरा. बस कर तुझी चर्पटपंजरी. तुझ्यासारख्या हलकटाची मी एक कवडीही किंमत समजत नाहीं.

देव०—माझी किंमत समजत नाहीस ? मग कुणाची समजतोस

बाजी०—नवाबजादे, आपल्या किंमतीचा भाव मागाहून करूं. शहाजी, बोल या कागदावर सही करतोस का नाहीं ? एरव्ही तुझी सुटका नाहीं; आणि शिवाजीचीही नाहीं.

शहा०—मी या कागदावर सही केली तर तुम्ही शिवबाला सोडून द्याल?

बाजी०—खास देऊं.

शहा०—मग आणा तो कागद. पाहूं काय त्याच्यांत लिहिलं आहे तें.

बाजी०—त्याच्याशीं काय करायचं आहे तुला. तूं नुसती सही कर.

शहा०—त्यांत काय लिहिलं आहे, तें पाहिल्यावाचून मी नाहीं सही करणार.

बाजी०—ठीक. पहा तर. वाच, हा घे कागद (कागद देतो.)

शहा०—(वाचतो) " चिरंजीव शिवबा यास-अनेक आशिर्वाद वि०—तुझा बेत मला पसंत आहे. ठरल्याप्रमाणं अमावास्येच्या रात्रीं तूं विजापूरवर चाल करून ये. मी येथील सर्व जमीन पोखरून ठेविली आहे. पातशहा आणि इतर अमीर उमराव यांचीं कत्तल उडवणं अगदीं सोपं आहे. कळावें हे आशिर्वाद." अरे हरामखोरा !

बाजी०—सही कर अगोदर.

शहा०—या कागदावर सही करून मी काय मिळवणार ?

बाजी०—स्वतःची सुटका करून घेणार.

शहा०—या जन्मांतून माझी सुटका होईल या पत्रानं. बाजी, मी या कागदावर सही केली तर पातशहा माझी गर्दनच उडवील.

बाजी०—नाहीं केलीस तर भिंतींत चिणून ठार मारील.

शहा०—माझ्या गुन्ह्यांबद्दल मी निरपराधी ठरण्याऐवजीं यानें मी गुन्हेगार मात्र ठरेन. माझे प्राण जाणारच.

बाजी०—पण तुझ्या मुलाचे प्राण वाचतील. अरे, मुलाबद्दल थोडी-तरी दया असूं दे. तो बिचारा तुला सोडवण्याकरितां या विजापुरांत धावत आला, याची कांहीं तरी चाड धर. तूं सही केलीस तर आम्हीं देऊं त्याला सोडून. बिचारा पडेल पाया पातशहाच्या आणि तुलाही सोडवील.

शहा०—तुमचा सगळा कावा माझ्या लक्षांत येऊन चुकला आहे. माझ्या मुलाचं बंड हें नुसतं थोतांड आहे. तुमच्या मनांतून माझा स्वतःचा बळी घ्यायचा आहे. हरामखोरानो, माझ्या मुलानं माझी सुटका केली, तर मी निरपराधी ठरून तुमच्या उरावर थयथयाट नाचेन; आणि तुमच्या घरादारावर नांगर फिरवून तुमचा सूड घेईन, अशी तुम्हांला धास्ती वाटत आहे नाहीं ? या कागदावर ही पहा मी अशी सही करतों, (कागद फाडतो.)

बाजी०—दुसऱ्या कागदावर अत्ताच्या आत्तां या प्रमाणंच मजकुर लिहून दे. नाहींतर या कागदाप्रमाणंच तुझ्या मुलाच्या, त्या शिवाजीच्या अंगाच्या चिंधड्या उडवतों.

शहा०—उडव–खुशाल उडव. माझ्या स्वामिनिष्ठेला कमीपणा येईल, असा मजकुर मी कधींही लिहून देणार नाहीं.

बाजी०—मी जें बोल्लों तें केल्यावाचून मीही राहाणार नाहीं. मी पुनः सांगतों, आम्ही शिवाजीला पकडला आहे, आणि संध्याकाळच्या आंत पातशहाच्या हुकमानं त्याचं डोकं धडापासून वेगळं होणार आहे. (रणदुल्लाखान येतो.)

रण०—नाहीं नाहीं. तुम्ही शिवाजीला पकडला नाहीं, आणि त्याचं डोकंही धडापासून वेगळं होत नाहीं.

बाजी०—असं कोण ह्मणतं ? खानसाहेब आपण ?

रण०—हो. मी—

बाजी०—मला वाटलं, आकाशवाणी झाली कीं काय ? पण हें कलियुग आहे.

रण०—कलियुगांत सच्चा मनुष्याच्या वाणीची किंमत आकाशवाणी इतकीच आहे. तुमच्या पुराणांत रावणानं मायावी रामलक्ष्मण निर्माण करून सीतेसमक्ष त्यांचा वध केला, त्या वेळीं आकाशवाणी होऊन रावणाचं कपट कळून सीतेचा भ्रम दूर झाला; आणि आपल्या कपटानं सीता फसली जाईल, असा जो रावणाला भ्रम होता त्याचाही निकाल लागला, बाजी, शिवाजी सांपडला आहे, असा तुह्मांला भ्रम झाला आहे.

बाजी०—मुळींच नाहीं. इकडे येताना मी तुमच्याकडे जासूदसुद्धा पाठविला. मी स्वतः त्याच्या महालांत त्याला पकडला आहे. प्रत्यक्ष माझ्या डोळ्यादेखतची गोष्ट.

रण०—तुमच्या डोळ्यांनीं तुह्माला फसवलं. तुमचा जासुद ज्या वेळीं, तुमचा निरोप घेऊन माझ्याकडे आला, त्या वेळीं प्रत्यक्ष शिवाजीच माझ्याजवळ बोलत होता.

बाजी०—खानसाहेब, आपण शराब तर—

रण०—खबरदार. खरा मुसलमान शराबला स्पर्शही करीत नाहीं. कुराणाची त्याला मना आहे. तुमच्यासारखे धर्मभ्रष्ट हिंदूच खासं पिऊन धुंद व्हायचे. घोरपडे, घरीं जा; आणि पलंगावर बांधलेला शिवाजीच आहे कीं काय, तें नीट पहा.

बाजी०—असं कसं होईल.

रण०—कसं होईल, याचा विचार [illegible] पेक्षां कसं झालं, तें समक्ष जाऊन पहा.

बाजी०—नबाबसाहेब, चला, वर वाड्यांत जाऊन पाहूं.

(बाजी घोरपडे, देवराव व शिपाई जातात.)

शहा०—खानसाहेब, आपण देवाप्रमाणं आलांत; आणि या मांगांच्या त्रासांतून मला मुक्त केलंत. हरामखोरांनीं माझ्यावर गहजब उडवला होता. खानसाहेब, मला अन्यायानं कैद केलं, याबद्दल पातशाहाला कांहीं पश्चात्ताप—

रण०—पातशहा आणि पश्चात्ताप ! राजेसाहेब, आपलं सगळं आयुष्य राजकारणांत जाऊन आपण इतके भोळे रहाल, असं मला वाटलं नाहीं. राजे लोकांना जन्म देऊन त्यांच्या हातीं एवढी सत्ता ठेविली, त्याबद्दल परमेश्वराला मात्र पश्चाताप होत असेल !

शहा०—अशातऱ्हेचे उद्गार फक्त आपल्यासारख्या उदार मनाच्या मुसलमानाच्या तोंडूनच निघतात. खानसाहेब, मला जन्मभर अंधार कोठडींत राहावं लागलं, तरी चालेल; पण माझ्यावर जो राजद्रोहाचा आळ आला आहे, तो मरण्यापूर्वी धुवून निघावा, एवढीच माझी इच्छा आहे.

रण०—लौकिकदृष्ट्या तो धुवून निघून काय करायचं आहे ? राजेसाहेब ! तुमच्या स्वतःच्या मनानें तुम्ही स्वामिद्रोह केला नाहीं ना ! आमच्यासारख्या खऱ्या स्नेह्यांना तुम्ही राजघातकी दिसत नाहीं ! परमेश्वराच्या दृष्टीनें तुम्ही अपराधी नाहीं !

शहा०—खास नाहीं !

रण०—मग तुम्ही मुळींच भिऊं नका. शिवाजीनं बंड केलं म्हणून तुम्हांला शिक्षा ! हा पातशहाच्या दरबारांतला न्याय असेल; पण जगांतल्या पातशहाच्या त्या परवरदिगार अल्लाच्या दरबारांत याला न्याय म्हणत नाहीं ! राजेसाहेब ! तुमच्या राणीसाहेबांनीं पातशहाकडे अर्ज केला ! मुलाला पातशहाच्या पायावर घातला ! पण कांहीं उपयोग नाहीं. शिवाजी शरण जाणार नाहीं; आणि मी शरण जाणार नाहीं—

शहा०—असं तो म्हणाला !

रण०—होय असं तो स्पष्ट म्हणाला !

शहा०—हें ऐकून मला आनंद झाला.

रण०—तो कां ?

शहा०—इतक्याच करता ! मी या पातशहाच्या शब्दाला, त्यांनीं दिलेल्या वचनांना, त्या डामडौलाला भुलून आपलं खरं कर्तव्य विसरलों, तसा तो विसरला नाहीं.

रण०—तो आपलें कर्तव्य कधींही विसरणार नाहीं. राजेसाहेब ! आपल्या सुटकेची आम्ही खटपट करीत आहोंत. अल्लाच्या मनांत असेल तसं होईल ! आपला थोरला मुलगा आपल्या करता काय करील, तें मी सांगत बसत नाहीं, पण आपला धाकटा मुलगा व्यंकू—

शहा०—कोण व्यंकू ? काय काय ?

रण०—आपल्याला भेटायला आला आहे. तो पहा. (व्यंकोजी येतो.)

व्यंको०—बाबा ! बाबा !

शहा०—बाळ ! (एकदम कवटाळतो.)

रण०—हा हृदयद्रावक प्रसंग कुणाच्यानंही पाहवणार नाहीं; पण तो पाहाण्याचा प्रसंग माझ्यावर आला आहे. कांहीं वेळानं या पिता-पुत्राची ताटातूट करण्याचं भयंकर पाप माझ्या माथ्यावर पडणार आहे.

प्रवेश पांचवा.

(घोरपड्याच्या वाड्यांतील दालन. बाजी घोरपडे व देवराव.)

बाजी०—आतां पाहूं खानसाहेब चुकले कां आम्ही फसलों तें ! आणारे ते पलंग एक एक, इकडे मला पाहूं द्या सोडून.

देव०—घोरपडे ! हे रणदुल्लाखान बडे काफर आहेत. हिंदुलोकामध्यें आपली चाह व्हावी म्हणून भाषा मराठी बोलतात मराठ्याजवळ ! पुराणांतले दाखले देतात, मोठे मोठे संस्कृत शब्द घालतात. पण शहाण्यांना हें समजत नाहीं कीं आम्ही यांना नूर्खांत काढतो.

बाजी०—नवाबजादे ! तुम्हीही असेच आहां ! तुम्हांलाही काळवेळ समजत नाहीं. मरेना का तो रणदुल्ला ! हा पहा एक पलंग आला ! (लोक एक पलंग आणतात.) सोडारे तो. (लोक सोडूं लागतात.)

देव०—संवालो, उसमें शिवाजी है. छुट जायेंगा हूं तो ! फकीर ! (बाजीच्या मागे उभा रहातो.)

बाजी०—नवाबजादे ! भिऊं नका. हं बहुतेक मोकळा झाला, अरे तरवारी सरसावून उभे राहा हं नीट ! (लोक तरवारी रोखतात व पांघरूण काढतात. (सईबाई उठून बसते.) हें काय ?

देव०—ए क्या ? यह कोन औरत ? ए कायकु इधर आया ?

सई०—कोण घोरपडे ? तुम्हांला—

बाजी०—बाईसाहेब, जरा गप्प रहा. मी मग बोलतो आपल्या-जवळ. घेऊन जा रे हा पलंग. दुसरा आणा पुढें ?

सई०—मग काय बोलणार ? मला इथं कां आणली अगोदर सांगा.

बाजी—त्या दुसऱ्या पलंगावर शिवाजी निघाला, म्हणजे सांगतो काय ते. (दुसरा पलंग लोक आणतात; व सोडूं लागतात.)

सई०—तुम्ही काय सांगणार ते दिसतेंच आहे मग. मी महालांत निजले असतांना मला बांधून उचलून कां आणलंत ? मी तुम्हाला तो तुमचा शत्रु—

बाजी—हो हो शिवाजी वाटलीस म्हणूनच आणलं. हं नीट संभाळ ? कोणच्या तरी एकावर बायको निघणार हे ठाऊकच होतं मला ! ही बायको निघाली एक. याच्यावर खास शिवाजीच निघणार. तरवारींचीं टोकं अगदीं जवळ धरा. बिलकूल हालूं देऊं नका ! त्यानें गडबड केली तर एकदम वार करा. (पांघरूण काढूं लागतात.) अरे हालतो आहे, करा वार एकदम. (लोक दहापांच वार करतात.)

सई०—उशा गिर्द्यासुद्धां फाटायच्या नाहींत या तुमच्या तरवारींनीं !

बाजी—काढा ती दुलई अगोदर. तरवारी रोखून धरा. (लोक दुलई काढतात, वर उशा गिर्द्या दिसतात. अरे, हें काय ? शिवाजी कुठं आहे ?

देव०—घोरपडे, आप सूना नही वो जंगलका सैतान है. दिया तुरी हरामखोरानें आपके हात पर.

बाजी०—काय करावं बुवा आतां ! पुरी फजीती झाली.

सई०—काय सरदारसाहेब ! आतां आपण बोलतां ना ? वो कोण दरोडेखोर तर आपल्याला सांपडला नाहीं, मला मात्र इथं दरोडेखोर सांपडले !

बाजी०—कोण ?

सई०—तुम्ही ! तुम्ही दरोडेखोर ! तुम्ही माझ्या वाड्यावर दरोडा घालून मला बांधून आणलंत ? जाऊं द्या मला आत्तांच्या आत्तां. पादशहाकडे मला दाद मागूं द्या.

बाजी०—बाई, आपली दाद पातशहाकडे लागायची नाहीं. आमची इच्छा असेल त्याचीच दाद पातशहाकडे लागत असते.

देव०—हमारे हुकूमविगर कीसीकोभी पातशहा न भेट सकते.

सई०—न भेटूं द्या. मला घरीं तर जाऊं द्याल कीं नाहीं ? तुमची शंका तर आतां फिटली ना ?

बाजी०—अद्याप माझी शंका फिटली नाहीं. मला अगोदर हें झालं कसं, याची चौकशी केली पाहिजे. तुमच्या वाड्यांत पुन्हा एकदां झाडा घेतला पाहिजे. तुम्ही इथं तोंपर्यंत रहा. कोणरे शिपाई ! इकडे ये. (एका शिपायाच्या कानांत हळूच) हे बघ, या बाईला वाड्यांत वाटेलतिकडे हिंडूं द्या, पण देवडीच्या बाहेर मात्र जाऊं देऊं नका. मी संध्याकाळीं येईन, नाहींतर येणारही नाहीं; पण मी येईपर्यंत हिला सोडूं नका. चला देवराव ! बाईसाहेब आम्ही येतो. (सईबाईवाचून सर्व जातात.)

सई०—चांगली मेल्याची फजीती उडाली. आतां माझ्यावर या बंदिखान्यांत रहाण्याचा हा अकल्पित प्रसंग आला आहे खरा; पण मला त्याचं कांहींच वाटत नाहीं. रावणाच्या बंदिखान्यात पडलेल्या सीतेची

रामानं वानराच्या साहाय्यानं समुद्र ओलांडून सुटका केली. माझे, महाराज वानराप्रमाणंच जंगलांत वावरणाऱ्या मावळ्यांच्या मदतीनं माझी सुटका करणार नाहींत का ? ज्यानं भूमातेची सुटका करण्याचं व्रत घेतलं आहे, त्याला माझी सुटका करणं किती तरी सुलभ आहे.

पद (चाल–मरिया आदगा०)

विजिता या जगा आधार । धुरिणा धन जें जनतामन ।
मानिति कामिनि । प्रेमें वाली माला । हा मज ॥ धृ० ॥
धीरता वीरता राजकाज ही ज्ञाता । जानकि ताराचया ।
राम जणुं ये । वानरसम नर करितिल लंका । कांहो घाना
शिवराया । साधन परिचय ॥ १ ॥ (जाते.)

प्रवेश ६ वा.

(स्थळ—घोरपड्याच्या वाड्याच्या देवडीसमोर)

(भोरप्याच्या वेषांत विश्वासराव व तानाजी खेळ करीत आहेत. लोकांची गर्दी.

शिवा०—आतां बगा एक पेटाऱ्याचा खेळ करून श्यान दावतो. ह्यो पेटारा बगा, अगदीं रिकामा हाये. कुटनी फाटका तुटका न्हाई. यामंदीं या नाथ्याला मी घालतों. नाथ्या शिर आमंदी.

ताना०—म्या आमंदी शिरल्यावर तूं मला झाकण लावून श्यानं कोंडून ठेवलस तर ?

विश्वा०–झाकण तर लावून घ्येनारच पन तुला कोंडून ठेवनार न्हाई. तूं मंग दब थत जा.

ताना०—अर जा कसा ? हवा होऊन श्यानी जाऊं की काय ?

विश्वा०—मी तुला हवा करून श्यान भाईर सोडणार हायेऱ्या समद्या लोका समक्ष. हं शिर आमंदी.

ताना०—नगर बाबा ! मासी म्ये वाटत बग.

बिश्वा०—मारती जवा रामलक्षुमनांना आनाया पाताळांत गेला तवा मगरीच्या जबड्यांत बसून श्यान गेला. तो न्हाई भ्याला. ह्यो तर पेटारा हाये.

ताना०—मी बि भीनार न्हाई. हा आमंदी गेलों बग (पेटाऱ्यांत बसतो.)

बिश्वा०—दोन मानसं न्हातील एवडा मोटा पेटारा हाय बग. हो झाकन लावलं बग. आतां या ढोलाच्या आवाजांत मिसळून श्यान पड भायेर. अर गेलास ?

ताना०—न्हाई.

बिश्वा०—उघडून पाहं ! अर हाये. सगळ दादासाब रावसाब पहा आतां माझी करामत (ढोलकै वाजवून) हा पेटाऱ्यातनं पळून श्यान जाईल. मोठा चोर आहे बगा. या चौकी पहाऱ्यांत ठेऊया हा पेटारा. दादासाब जरा हात लावा (पेटारा आंत ठेवतात) ह्याला आतां बंदोबस्तांत ठेवला हाये. वर बड्याबड्या सरदारांचा पाहारावी हाय. त्या लोकांच्यांतनं कसा जाईल, त्ये हत दावतो बगा. ह्यो ह्या एक कापडाचा तुकडा. बगा कसा पातळ आहे, या कुनी तरी चौगजण या हकडं (देवडीवरचे चारी शिपाई येतात.) दरा ह्या कापडाचे चारी टोकं मी याच्यावरनं चाढून श्यान दावतो. या ढोलाच्या बोलासारसा जातो बगा. (ढोलके वाजवून कानडावरून जातो. वरच्या सज्जांत सईबाई व तानाजी दिसतात.) उनः एकदां दावतो बगा. ह्या बगा गेलो. आतां माझा प्येटारा आता हकडं. (पेटारा आणतात) नाथ्या ! न्हाई आवाज देत ! पळाला. तुमच्या समद्या शिपायांच्या हातावर तुरी देऊन श्यान गेला बगा पळून. (पेटारा उघडून दाखवितो.) ह्यो बग अगदी मोकळा हाये. नाथ्या, मी तुला पुनरपी आमंदी आनतो बग. पकडून ठेवा नेऊन श्यान पेटारा जथं व्हता थतं.

सई०—तानाजीराव चला कवकर खाली. तो पहा पेटारा परत आला. आपण दोघंही त्यांत बसूं चला. तुम्ही मला भावासारखे आहां.

ताना०—बाईसाहेब, नव्हे आई! हे तुझं तान्हं लेकरूं आहे. याला आपल्या पोटाशीं घे.

सई०—चला, चला कवकर. (खालीं जातात.)

विश्वा०—ह्यो नवा खेळ बगा. हकडं या चौगंबी पुना. माज चौगानीबी हात घरा. मी समधासनी झुकांडी देऊन ह्यान जातो. अन् नाथ्याला धरून ह्यान आनतो बगा. (चौघे विश्वासरावाचे हात धरतात.) ह्यो मारतो झोकांडी बगा. गेलो!—ग्योलो—ग्योलो. अव्हं न्हाई! पुना बगतो, आझा मंतुर का लागूं पडत न्हाई?—ग्येलो बगा—ग्येलो—ग्येलो—ग्येलो. न्हायरे बाबा तुमामंदी कुनीतरी भाईरख्याली करनारा असला पाहिजे. कुनीतरी असलाच पाहिजे. म्हणून ह्यान मला जातां येयना—मला बिघत झाली त्याची म्हून ह्यान मी हवंत मिसळना—त्यो पेटारा आना पुना (पेटारा आणतात.) मला जरी नाथ्या, तुला सोडायला जातां आलं न्हाई तरी तुला पकडून ह्यान आनला बग. (पेटारा उघडून तानाजीस बाहेर काढतो. झांकणातून सईबाईचा चेहरा प्रेक्षकाना दाखवून झांकण लावतो.) ह्यो निगाला बगा. पळून ह्यान गेला व्हतास न्हाई. या गुन्याबद्दल तुला सकत मजुरीची शिक्षा येतो बग. उचल हा पेटारा अन् हो पुढं. घे हे सामान तेव्यावर. माज सामान वाहायचा उट हो. लाग चालू (तानाजी पेटारा घेऊन पळतो.) घनीसाप द्या पैसं. खेळ झाला बगा. धनीसाप—रावसाप—बाबासाप—खानसाप—जमेदारसाप—नाईकसाप द्या पेसे (पैसे मागतो.)

अंक तिसरा समाप्त.

अंक ४ था

प्रवेश १ ला.

स्थळ—विजापूर येथील शहाजीचा वाडा.

(व्यंकोजी व देवराव येतात.)

व्यंको०—हं गडबड करूं नका. तुम्हांला कोण पाहिजे ?

देव०—तुमारी मा किधर है ? बुलाव उस्को.

व्यंको०—माझी आई अशी यायची नाही तुमच्या समोर. तुम्ही कोण माझ्या आईला बोलवणार ?

देव०—मी कोण मी महार असेन.

व्यंको० - काय महार ?

देव०—तूं महार ! तुझा बाप महार ! तुझा आजा महार ! तुझा पणजा महार !

व्यंको०—खबरदार बाप काढलास तर ! माझा बाप काढणारे तुम्ही कोण?

देव०—पोशाखावरून दिसत नाही का मी कोण तो ?

व्यंको०—पोषाखावरून काय कळणार बुवा !

देव०-हा मुसलमानी पोषाख तुला दिसत नाहीं ?

व्यंको०—पोषाखावर काय आहे. सगळेच लोक मुसलमानी पोषाख घालतात. महार, धेड सुद्धां तोच पेहराव करतात. ही तुमची भाषा पहा अर्धी मराठी अर्धी मुसलमानी ! वाटगे बिटगे असाल !

देव०—मै बाटगा नही. मै मराठा हूं. मेरेको बहोत शरम वाटते, मराठा म्हणो इस बाबत. मी कोणालाच सांगत नाही मेरी जात. मी चहूंकडे मुसलमान म्हणूनच खपला जातों.—जाव बुलाव तुमारी माकू.

व्यंको०—आई यायची नाही तुमच्या समोर.

देव०-मग मै जाता हूं तेरी मा समोर.

व्यंको०-मी नाही जाऊं देणार.

देव०-तुला पोराला कोण विचारतं. हा चाललों बग. (जाऊं लागतो.)

व्यंको०-(धंकाडी मारून) ही धकांडी मारली बग.

देव०—धक्की मारतोस काय ! शेफारू नकोस असा. तुमको मै अच्छी समजा देता हूं.

व्यंको०—क्या समजा देताहूं ? दाब पाडून टाकीन जास्त गडबड करशील तर !

देव०—तेरी क्या शामत है. तेरी बापकी मी—(तुकाबाई येते.)

तुका०—देवराव ! बाप कुणाचा काढता हो ?

देव०—नही नही ए गुलाम—

तुका०—गुलाम कुणाला म्हणता ? तुमचा गुलाम व्हायला कांहीं तो जन्माला आला नाहीं !

देव०—तैसा नही. ए लडकेने -

तुका०—नीट बोला. मला नाहीं कळत ही तुमची भेसगुजरी मुसलमानी भाषा.

देव०—अफ्सोस ! मेरा बाप—

तुका०—तुमचे वडील कांहीं मुसलमान नव्हते.

देव०—पर मैं—

तुका०—तुम्हीही मुसलमान नाहीं.

देव०—मेरी मा—

तुका०—तुमची आईही मुसलमानीण नव्हती.

देव०—बरं बरं. फाजील किती बोलता ! माझे आईबाप महार असतील ! अजोबा धेड असतील ! आणि पणजोबा चांभार असेल ! पण मी कोण आहे तें आतां दाखवतो. हा वाडा खाली करा आताच्या आता.

तुका०-तुम्हीं कोण वाडा खाली करायाला सांगणारे ?

देव०-आम्ही कोण ? आम्ही पातशहाचे-

व्यंको०-हजाम ?

देव०-क्या ?-चलो अबी वाडा खाली करो. हें मकाण पातशहानं जप्त केलं आहे.

तुका०—तें का ?

देव०-कां ?--राजद्रोही गुन्हेगारांची जहागीर, सरदारी, मालमिळकत, सरकारजमा करण्याची वहिवाटच आहे म्हणून.

व्यंको०-पण राजद्रोह कुणी केला ? मी केला ?

देव०-तूं केला नसशील पण तुझ्या बापानं तर केला आहेना ? चला, वाड्यांतून असेच्या असे बाहेर पडा. कपडेसुद्धां न्यायचे नाहींत बरोबर. बरतन बिस्तन कुच नहीं. इथली सब चीजवस्त जप्त है. तुमचे नोकरचाकरही कैद केले आहेत.

तुका०-देवा ! कायरे हा अन्याय !

पद (चाल—वरु गरुवा लियो०)

तरु पडला । कुणि नच सांवरिला । द्विजसंघ पळे ।
मग त्यागी त्या पतितवळा गेहाला ॥ धृ० ॥ सांडि काय
त्या लतिका जाया । पाशिं धरीं जरि चुरली अभया ।
तृणां हतबलां मुळां निकट करि बाला ॥ १ ॥

देव०-हं. पुरे झालं हें रडगाणं. याचा कांहीं एक उपयोग नाहीं. मुकाट्यानं बाहेर पडता, का हातधरून खेंचून काढू ?

व्यंको०-कसा खेंचून काडतोस पाहू ? खेंचून काढतांना तुझ्या नरडीचा जर घोंट घेतला नाहीं, तर--

देव०-तर क्या ?-सैतान !

तुका०-देवराव ! त्या मुलाकडे काय लक्ष्य देतां ! आम्हांला असल्या निराश्रित स्थितींत तुम्हांला पाहावचतं ना ? पातशहानं हुकूम

दिला असला तरी त्याची बजावणी करतांना तुम्ही कांहीं तरी दया दाखवा. तुम्ही हिंदु आहां ! मराठे आहां ! मराठ्याला मराठ्याच्या दु:खाबद्दल सहानुभूती वाटायला नको का ? आजच्या दिवस सवड द्या. नशिबानं उद्या त्यांची सुटका झाली तर आपल्या मागं आपल्या बायको-पोरावर देवरावांनीं थोडे तरी उपकार केले; म्हणून ते आपले उतराई होतील.

देव०—कोण—शहाजीना ? चांगला उतराई होईल ! माझा जीव घेईल ! माझी पाळं मुळं खणून काढील ! तुम्ही मुकाट्यानं बाहेर पडा आधीं.

तुका०—देवराव ! नका नका, इतका निष्ठुरपणा दाखवूं नका. मी तुमची क्षमा मागते, तुम्हांला रागानं टाकून बोलले याबद्दल तुमचे पाय धरते. (पायां पडते)

देव०—ही घे लाथ. (लाथ मारतो.)

व्यंको०—हरामखोरा ! तुझा खून करतो. (देवरावाला मारतो, देवराव पळून जातो.)

तुका०—(त्याला धरून) बाळ ! राग आवर. प्रसंग कठीन आला. आपल्याला या जगांत आतां कुणीही नाहीं.

व्यंको०—आई ! असं कां म्हणतेस ! आबासाहेब आहेत ना ! या विजापुरांत काय आहे ? आगलागो त्या दौलतीला आणि अभिमानाला. आबासाहेबाकडे आपण जाऊं चल.

तुका०—आबासाहेबाकडे जाऊं ?—शिवबाकडे जाऊं ?—पण कोणच्या तोंडानं जाऊं ? तो म्हणतच होता राजांना, तुम्ही विजापुरांत जाऊं नका म्हणून. घात होईल, दगा होईल म्हणून त्यानं इशारा दिलाही होता. पण व्हायचं तें टळत नाहीं. मी चांडाळणीनं त्याला शिव्या दिल्या, त्याला कैद करायला धांवले, तो आल्याची दरबारांत वर्दी दिली ! घोरपड्यांनीं त्याला पकडलं म्हणतात. देवा ! तो सुटला असेल का

आता पुढे [illegible] ? काळ ! आपण त्याच्याकडे कसे जाणार ? आप-त्याला [illegible] कोण देणार ?

(विश्वासराव येतो.)

विश्वा०—बाईसाहेब ! चला चला. मी आपल्यांला न्यायला आलों आहे.

तुका०—कुठें ? कुणाकडे ?

विश्वा०—कुणाकडे तें मला सांगता येत नाहीं. आपल्याला आणि छोट्या [illegible] ना एखाद्या सुरक्षित ठिकाणीं घेऊन चला; म्हणून मला रणदुल्ला [illegible] सांगितलें आहे. हा वाडा जप्त झाला असून सगळ्या चाकर [illegible] न कैद करून नेलें आहे; आणि तुम्हां मायलेकरांनाही पकडण्या [illegible] हुकूम आतांच झाला आहे. तर माझ्याबरोबर असेल्या असे [illegible]

तुका०—[illegible] निसटून जाणार कसे ?

विश्वा०—त्याची आपल्याला काळजी नको. वाड्याच्या पिछाडीला मेणा तयार आहे, त्यांत आपण आणि छोटे राजेसाहेब यांनीं बसावें म्हणजे [illegible]

व्यंक०—मी नाहीं बसणार मेण्यांत. मी काय बायको आहे, तो दडून बाईन मेण्यांतून ?

तुका०—[illegible] असा हट्ट करूं नये. वेळ पडेल तसं वागलं पाहिजे [illegible] वाचले तर सगळं.

व्यं० [illegible] घोड्यावर स्वार होतो; आणि मग पाहतो आपले प्राण घ्यायला [illegible]

विश्वा० [illegible] कार ! आम्ही कशाला आहोंत ? त्याच कामा-करतां [illegible] त असला; म्हणजे राणीसाहेबांना तेवढी काळजी वाट [illegible]

तुका० [illegible] सं ऐकच. तूं मेण्यांत माझ्या जवळ बसलास तर [illegible] नाहींतर नाहीं.

व्यंको०—बरं, मी बसतों तुझ्या जवळ; पण लढाईची वेळ आली तर उडी टाकीन.

तुका०—शाबास ! (विश्वासरावास) तुमचं नांव काय !

विश्वा०—मला विश्वास म्हणतात. खुशाल माझ्यावर विश्वास ठेवा. देवाचं नांव घ्या; आणि बाहेर पडा एकदम. (जातात)

प्रवेश २ रा.

स्थळ—अंधारकोठडी.

शहा०—(स्वगत) माझं आयुष्य अमर्याद तर नाहींना ? मी जिवंत आहे का हें माझं प्रेत आहे ? —माझा केव्हा बरं अंत झाला ? —आज,-काल,—कां माझा शिवबा म्हणतो त्या प्रमाणं मी पातशहाची वजीरी पत्करली तेव्हां ? पातशहाच्या सेवेंत प्रेत बनून अनंतकाळ जिवंत राहाण्यापेक्षा परमेश्वरचिंतनांत देह आळवून मरणांतच अमर राहिलेलं काय वाईट !—उद्यां मला भिंतींत चिणणार ! मी मरणाचं व्रत घेणारा या घाणेरड्या जीवितांतून मी मुक्त होणार ! माझ्या प्रेताच्या हातापायांत या लोखंडी शृंखला अशाच राहतील, माझ्या शवाला दगडाविटांची समाधी मिळेल, पण माझा आत्मा या आयुष्याचे बंद तोडून, ही हाडा-मासाची समाधी फोडून मोकळा होईल ! स्वतंत्रतेच्या प्रभावानं या अखंड अंधारांतून तो दिव्य प्रकाशांत उड्डाण करील ! आणि मग, माझ्या प्रेता-भोंवती जमणारी मानवी भूतं काळोखांत धडपडतील, संतापानं चिडतील; आणि आपल्याच अंगाचे लचके तोडून खातील. या भूतांना गती तरी कशी मिळणार ! शिवबाचा स्वातंत्र्यमंत्र त्यांना मुक्ति देईल का ! स्वराज्य रवीचा प्रकाश त्यांचे डोळे उघडील का ! हा पहा अंधारकोठडीचा डोळा उघडला. हीं भूतं आहेत का हे यमदूत आहेत !—(मशाल

येऊन कांहीं मारेकरी भूतासारख्या वेषांत येतात, व शहाजीच्या भोंवतीं होऊन त्याला पकडूं लागतात.) छेः हीं भूतं नाहींत,–यमदूतही नाहींत, हीं माणसंच आहेत. माणसाला मी जन्मांत भ्यायलों नाहीं, मग आतांच का भिईन ?–अरे मला धरता कां ?–ओढीत कुठं नेतां ?–या दगडी खांबाला बांधता ?–अरे दगड रचूं लागलां ? मला भिंतीत चिणणार कीं काय ?–माझी मुदत भरली ? –दिवस उगवला ? मघाशींच पहारेकरी म्हणाला मध्यरात्र झाली म्हणून ' अरे देवा ! तुम्ही ऐकत नाहीं ! गळ्या-पर्यंत मला रचित आणलं ! आतां धडपडून काय उपयोग ! शिवबा म्हणाला ' दगा होईल,' तेंच खरं झालं.–आतां एकच–शेवटचा धोंडा. जय भवानी ! जय शंभो ! (वेषांतर केलेला शिवाजी व सईबाई येतात, व मारेकऱ्यावर घसरतात; सईबाई लढते व शिवाजी दगड उडवून शहा-जीस मोकळा करू लागतो.)

१ मारे०—चालवा समशेर. हा म्हसोबा आणि ही हडळ आपल्याला कितीशी पुरणार. उडवा मुंडया.

सई०—या तुमच्याच मुंडया उडवते बघ. (लढते)

शिवा०—तूं कशाला श्रम घेतेस ? मी आहेना त्या कामाला. तूं कर राजेसाहेबांना मोकळं. (शिवाजी लढतो. सर्व मारेकरी ठार मरतात.) सगळे मेले ? कुणी शिल्लक नाहीं ? राजेसाहेब ! दंडवत. (शिवाजी व सईबाई शहाजीच्या पाया पडतात.)

शहा०—(दगडाविंटांतून पुढें येऊन) माझ्या पाया पडूं नका. मलाच तुमच्या चरणावर डोकं ठेऊं द्या.

शिवाजी—छेः छेः आपल्याला आम्हीं मुलांसारखे.

शहा०—आणि प्रत्यक्ष मुलं असला तरी मी या प्रसंगीं तुमच्या पाया पडल्यावाचून राहणार नाहीं. श्रीकृष्णानं कंसाचा वध करून ज्यावेळीं वसुदेवाची–मुक्तता केली त्या वेळीं वसुदेवाला क्षणभर पित्याच्या नात्याचं विस्मरण होऊन त्यानंसुद्धा भगवंताच्या चरणावर मस्तक ठेवलं.

तुम्ही देवाप्रमाणं धांवून येऊन माझं रक्षण केलं. मग तुमच्यापुढं असं लोटांगण घालायला मला काय हरकत आहे ! (पायां पडतो.)

शिवाजी— हें काय राजेसाहेब ! (त्याला उठवितो.)

सई—राजेसाहेबांच्या हातापायांतल्या या हातकड्या बेड्या नाहींका काढायच्या अगोदर ?

शिवाजी—प्रत्यक्ष शक्तीच्या हुकुमानं या निर्जीव शृंखलेचे सांधे हे उखळले बघ. (दोन हातांनीं शहाजीचे हात धरून बेड्या तोडतो.) जय भवानी !

शहा०— हें काय मी पहातो आहे ? खंडोबावांचून हा कोखंडी लंगर कोण तोडणार ! जय मल्लारीमार्तंड ! जय भवानी !

सई—राजेसाहेब ! आपण चला आतां आमच्याबरोबर.

शहा०—म्हणजे ?

सई—म्हणजे काय ! आपण असे गोंधळता कां ! आपल्याला काय झालं आहे ?

शहा०—खरोखर, मला काय झाल आहे मला कळत नाहीं. सान्या आयुष्यांत मला असं कधीं झालं नव्हतं. असा प्रसंगच माझ्यावर कधीं आला नव्हता. असा सामर्थ्याचा देखावा तर स्वप्नांतही मी कधीं पाहिला नव्हता. आपण देवच ना ?

शिवा०—आम्ही देव नाहीं, देवदूत आहोंत. यमलोकाला आपल्याला पाठविण्याची पातशहाची इच्छा देवांना पसंत नव्हती; म्हणून आपल्याला देवलोकाला घेऊन जाण्याकरतां देवांच्या इच्छेनं आम्ही आलों आहोंत. राजेसाहेब ! पातशहाच्या दरबारांत बाजी घोरपड्यासारखे सैतानी वृत्तीचे राक्षस आहेत, त्याच प्रमाणं रणदुल्लाखानासारखे सात्विक वृत्तीचे देवही आहते.

शहा०—आहेत—खास आहेत.

शिवा०—आपल्याला पातशहानं दिलेल्या मुदतीचा आजचा शेवटचा दिवस ना ?

शहा०—होय. मग इतक्यांत दिवस उजाडला का ? सूर्योदय झाला का ?

शिवाजी—पहाटेच्या रामपाऱ्यांत,-दिवस उगवायच्या वेळीं, असुरी कृत्यं कधींच यशस्वी होत नाहींत. मशाण मध्यरात्रींच अघोर वासना दुर्जनांच्या अंत:करणांत थैमान घालून, त्यांच्या बाहूंना बेसुमार चलन देते.

शहा०—मग आतां मध्यरात्र आहे तर. सूर्योदयापासून दिवस सुरू होतो, आणि हे चांडाळ मध्य रात्रींच माझा खून करीत होते ! मध्यरात्रींपासूनच ते दुसरा दिवस धरतात कीं काय ?

शिवा०—सैतानाच्या राज्याचा अम्मल भर मध्यरात्रींच होत असल्यामुळं त्यांच्या रियासतींत, दिवसाची सुरुवात ही मध्यरात्रींच होत असते. राजेसाहेब ! आतां इथून आमच्याबरोबर एकदम लौकर चला.

शहा०—चला ! कुठं चला ?

शिवा०— आपल्या एका स्नेह्याच्या घरं.

शहा०—तुम्ही पादशहाच्या हुकुमानं मला नेण्याकरतां आलां आहांत का ?

शिवा०—नाहीं.

शहा०—पादशहाच्या हुकुमावांचून मी इथून हालणार नाहीं.

शिवा०—राजेसाहेब ! जिवावरचं संकट अद्याप संपलं नाहीं. आपल्याला भिंतींत चिणलं आहे अशीच सध्यां पादशहाची समजूत आहे. सकाळच्या प्रहरीं आपली समाधी पाहायला तो इथं आला; आणि आपण जिवंत त्यांच्या दृष्टीस पडलां तर तो खात्रीनं चिडून, आपल्याला पुन्हा दगडांत गाडल्यावांचून तो राहणार नाहीं.

शहा०—पण गाडून टाकलं म्हणून काय झालं? मी एखाद्या आगुआईसारखा इथून पळून जाऊं? अशा रीतीनं शहानशहा पातशहाशीं बेइमान होऊं?

शिवा०—यांत आपण बेइनाम होत नाहीं; आणि आपल्या शिपायी-बाण्याला कमीपणा येण्यासारखं ही आपण कांहीं करीत नाहीं. आपण अशेच मरण पावलांत, तर आपल्या वरचे आरोप खोटे आहेत; म्हणून कोण पुरावा करणार? पातशहाच्या दृष्टीनं आपण निरपराधी ठरावं, असं आपल्याला वाटतं ना?

शाह०—ती तर माझी मोठी इच्छा आहे. मला सगळ्या जगाची पर्वा नाहीं, पण ज्याच्याशीं मी आजपर्यंत इमानानं वागलों, त्या पातश-हाला मी स्वामीद्रोही वाटणं, मला असह्य वाटतं. त्याचं मन मला साफ केलंच पाहिजे.

शिवा०—तें करायचं जर खरोखरच मनांत असेल, तर तुर्त आप-ल्याला इथून दूर गेलंच पाहिजे. नजेआहेब! आपण कुलही आहां. आइमुठे शिपाई नाहीं. आपण इथून जाणं राजनीतीला धरून आहे कीं नाहीं हें आपण चांगलंच जाणता. मी आपली आणि रणदुल्लाखानांची भेट करून देतों. ते आपल्याला पातशहासमोर घेऊन जातील. समोर गेल्यावर आपल्या स्वामिभक्तीबद्दल आपण खात्री करा शहानशहाची! पातशहा आपला शब्द खरा मानील.

शहा०—खास मानील. या अंधार कोठडींत आल्यापासून कित्येक वेळा जरी पातशहाला शिव्या दिल्या असल्या तरी त्याच्या चांगुलपणा-बद्दल मला खात्री वाटते.

सई०—तर मग आता वेळ घालवूं नका. एकदम इथून चला.

शहा०—तुझ्या तोंडचा शब्द म्हणजे देवीनं दिलेला कौलच मी समजतों. मी तुमच्याबरोबर यायला तयार आहे; पण जायचं कुठून?

शिवाजी–या चोरवाटेनं ! या कोठडीला चोरवाट नव्हती; पण गेल्या दोन दिवसांत ही मुद्दाम तयार केली. नाहीं तर काय उंदीर जाण्यापुरतं एक छिद्र मात्र इथं आहे.

शहा०–त्याच छिद्रांतून एका उंदरानं 'भिऊं नका' असा संदेश आणून माझ्या मनाला धीर दिला. तुम्हीच तो संदेश धाडला ना ?

शिवा०–हो. प्रथम खऱ्या उंदराएवढा उंदीर शिरला आणि आज इथी जाण्या इतकं भगदाड त्या उंदरानं पाडलं ! चला पुढं. या वनस्पतीचा प्रकाश आपल्याला भुयारांतून वाट दाखवील. (शहाजी आंत शिरतो; व शिवाजी मागाहून जातो. इतक्यांत अंधार कोठडीचा दरवाजा उघडून रणदुल्लाखान, बाजी घोरपडे, देवराव व हातांत रुमालांनीं झांकलेले नजराणे व पोषाखाचीं तबकें घेतलेले कांहीं लोक येतात. चोरदार बंद होतें. सईबाई एकटी राहते.)

सई०–ठीक झालं. आतां काळजी नाहीं.

रण०–राजेसाहेब ! (सईबाईस पाहून) ए क्या एक औरत ?

बाजी०–हें काय ?

देव०–ए क्या है घोरपडे ?

रण०–बाजी ! आपण कोठडी तर चुकलों नाहीं ना ? ही कुणी बाई दिसते. डोळे तारवटून सैतानाप्रमाणं त्या बाईकडे पहात काय राहिलांत ? चला, चला राजेसाहेबांच्या कोठडींत.

बाजी०–खानसाहेब ! मी कांहीं चुकलो गेलों आहे. कोठडी तर हीच. इथं कांहीं तरी भुताटकी आहे. ही बाई आज सकाळपासून आमच्या वाड्यांत पक्क्या बंदोबस्तांत होती. हिलाच आम्हीं शिवाजी म्हणून पकडलं. एवढ्या बंदोबस्तांतून ही इथं आली कशी ? शहाजी राजे जाऊन त्यांच्या जागीं ही कशी आली ? शिवाजी जाऊन त्याच्या जागीं हीच होती !

देव०-या अल्ला! यह तो चेटकीण है. यह वोही औरत मैंने दिखाया घोरपडे साहेबका वाडे में. तोबा ! तोबा ! क्या भुताटकी !

रण०-भुताटकी ? भुताटकी कसली घेऊन बसलां ? बाई ! तुम्ही इथं कशा आलांत ?

सई०—मला सांगता येत नाहीं. मी घरीं झोपले होते. या घोरपड्यांनीं मला पलंगाला बांधून आपल्या वाड्यांत नेलं. आता तिथून इथं आणून कुणी टाकलं. हें काय होतं आहे, मला समजत नाहीं.

रण०—स्वतःच्या बुद्धीनं तुम्ही इथं आला नाहीं म्हणता ?

सई०—हो. माझ्या मनावर कुणाचा तरी अम्मल चालतो असं मला सदोदित वाटतं. कुणाचा तें मात्र सांगता येत नाहीं. मला सगळं दिसतं पण बोलतां येत नाहीं.

रण०—शहाजीराजे कुठं गेले तुम्हांला दिसले का ?

सई०—तेंही सांगता येत नाहीं. या दगडांत, या भिंताडांत ते गेले असतील !

रण०-या अल्ला ! बाजी ! बांधकाम नवीन दिसतं. शहाजी राजांना यांत गाडलं तर नाहीं ?-असे घाबरतां कां ? बोला. दिल्लीच्या शहाजहान पातशहाकडून आलेला खलिता शहाजीराजांना पोचण्यापूर्वीच त्यांना या भिंतींत चिणलंत कीं काय ? राजेसाहेबांना शहाजहाननीं दस हजारी बहाल करून, वर पोषाख आणि नजराणा पाठवून त्यांचा गौरव केला; आणि आमच्या दयाळु सुलतानांनीं पण मेहेरबान होऊन, खुद्द नजर करण्याकरतां त्यांना आताच्या आता आमच्या समोर घेऊन; या म्हणून मला हुकूम दिला; पण राजेसाहेबांना पत्ता काय ?-कोसळा ही भिंत. विजापुरच्या दरबारच्या राजेसाहेबांचा उत्कर्ष तुम्हांला सहन होत नव्हता, मग हा दिल्लीच्या पातशहानीं केलेला त्यांचा गौरव तुम्हांला कसा पाहवणार ? खलिता पाहिल्यावरच घाई करून त्यांना या भिंतींत तुम्ही चिणलं

अमेव.—काम आंत कांहीं नाहीं ! घोरपडे ! तुम्ही असें गांगरून कां गेलां? तुम्हीच कांहीं तरी दगा केला असला पाहिजे.

बाजी०—खानसाहेब ! या भिंताडांत शहाजीराजे सांपडतील असें मलाही वाटत होतें, पण—

रणदुल्ला—पण काय ?–तुम्हांला असं कां वाटत होतं ? भिंतींत चिणावं असा असल्या पातशाही हुकूम झाला होता कीं काय ?

बाजी०—हां. वसा सुलतानानीं स्वत: हुकूम केलेला मला माहित आहे.

रण०—तुम्हांला माहित आहे ? तुम्हांला स्वत:लाच हुकूम झाला असला पाहिजे. तुमच्या वांचून दुसऱ्या कुणाला हुकूम होणार ? तुम्ही घरभेदे हिंदूच निमकहराम ? घरीं मेजवानीला बोलावून दगा करणारे पाजी तुम्हीच त्यांना कमीपणा आणण्याकरतां पातशहाजवळ चुगली करणारे चुगलखोर तुम्हीच. बोल, शहाजीराजांचं काय झालं ? हरामखोर तोंड उघड !

बाजी०—खानसाहेब ! तोंड संभाळून बोला. पातशहाच्या हुकमाबाहेर मी वागलों नाहीं. आम्ही चुगली केली असली तरी तिची जबाबदारी पातशहावरच आहे ! जुलूम केला असला तरी तो पातशहाच्या हुकुमानं ! खून केले असले तरी ते पातशाही दौलती करता ! आमचं तन, मन, धन पातशहाला वाहिलेलं आहे. तुमच्यासारखे निमकहराम मुसलमान—

रणदुल्ला०—चूप बेशरम ! तुम्ही मराठेच पातशहाच्या नांवावर हवीतशी हलकट कृत्यं करता, आपल्याच हिंदु जातभाईवर वाटेल तसा जुलूम करतां, पातशहाच्या नुसत्या चाळ्यांना 'हीं हीं' करून मान तुकावता, तुम्हांला हिंदू म्हणवून घ्यायला लाज वाटली पाहिजे. ऐक. आजपासून तीन दिवसांच्या आंत जर शहाजीराजांचा पत्ता लावून दिला नाहीस तर सुलतानाच्याच हुकुमानं याच भयाण रात्रीच्या अमलांत,—याच अंधारकोठडींत,—याच दगडांच्या कबरींत तुला जिवंत गाडल्या-

वाचून मी राहणार नाहीं. जाव पत्ता. चले जाव यहांसे. (बाजी घोरपडे जातो.)

देव०—चले जाव. हरामजादा गये कबरस्थानमें. खानसाहेब ! आप जो किया वोही बराबर है. यह घोरपडे बहोत दगेखोर और हांजी हांजीखोर आदमी है.

रणदुल्ला०—तुमभी वैसेही हो. पाजी ! हलकट ! जंगली ! बेशरम ! चले जाव. सिपाई, इस नवाबजादेको फोरन हकालो यहांसे.

देव०—तसदी मत् घेना खानसाहेब ! (पळत पळत जातो.)

रणदुल्ला०—हा नजराणा जाऊं द्या आमच्या वाड्यांत.—बाई ! तुम्हांला खरंच कांहीं माहीत नाहीं ? शहाजीराजांच्या जिवाबद्दल मला भीती वाटूं लागली आहे, म्हणून विचारतो, शहाजीराजे कुठं गेले तुम्हांला ठाऊक आहे कां ?

सई०—मला कांहीं सांगतां येत नाही.

रणदुला०—बरं.—पहारेकऱ्याजवळ तपास करूं.—पहारेकरी ! (दरवाज्याकडे जातो; व पहारेकऱ्याशीं कांहीं बोलत राहतो.)

सई०—(स्वगत) दिल्लीचं कारस्थान यशस्वी झालं, हें ऐकून मला आनंद तर झालाच पण त्या कारस्थानावर भिस्त न ठेवतां महाराजांनीं स्वतःच्या हिमतीवर राजेसाहेबांची सुटका केली, हें पाहून तर मला वेड लागण्याची पाळी आली आहे. (रणदुल्लाची पाठ वळते तोंच) खानसाहेब ! येतें बरं. (एकदम चोरवाटेनें आंत जाते व दरवाजा बंद होतो.)

रण०—(परत येतांना) बाई !- (नाहीं असें पाहून) या अल्ला ! किधर गया वह औरत ? वह औरत नहीं, वह तो मूर्तिमंत माया है ! अजब !—अजब !—परवरदिगारकी करामत अजब है !

(पडदा)

प्रवेश २ रा.

स्थळ-जंगल. (शिवाजी येतो.)

शिवा०-(स्वगत) हा रणदुल्लाखान एक विलक्षण पुरुष आहे ! त्याचं नांव उच्चारलं कीं या विजापुरांतले खंदक भरून येतात ! तटांना भगदाडं पडतात ! वेशींचीं कड्याकुलपं गळून जातात, आणि चव-ताळलेल्या चांडाळांची दांतखिळी बसते. ही पातशाही या एका पुरुषाच्या पुन्याईवर सावरली आहे. नाहीं तर केव्हांच नामशेष झाली असती. साहेबांना आणि व्यंकूला घेऊन विश्वासराव ठिकाणावर पोहोंचलाच आहे. बाबांचीही रवानगी तानाजीबरोबर झालीच आहे. रणदुल्लाखा-नाकडेही जासूद गेलाच आहे. आतां राहिली सई—

(सईबाई येते.)

सई०—कां, कसला विचार चालला आहे ?

शिवा०—तुझ्याबद्दल विचार येतांच तूं नेमकी हजर ! खरोखर शंभर वर्षे आयुष्य आहे तुला.

सई०—शंभर वर्षं ! तें काय करायचं ? एवढं लांबलचक आयुष्य आपल्याला नाहीं बाई धरायचं ! आयुष्य कसं असावं बिजलीसारखं ! चटकन् चमकून एकदम गडप. काम झालं कीं एक क्षणभर नको या जगांत रहायला. या लोकांच्या स्मरणांत सुद्धां राहायला नको कीं, शिवाजीराजांची अशी अशी कुणी राणी झाली. आपल्याला काय महाराष्ट्राकरितां मराठ्यांची गादी स्थापायची ! इतकंच ना ? मग फार झालं तर तेवढं आयुष्य असलं म्हणजे झालं !

शिवा०—ज्याच्या त्याच्या कामापुरता जो तो या जगांत राहतो. काम संपल्यावर क्षणभर सुद्धां इथं थांबत नाहीं. जो थांबतो तो म्हातारपणीं आपलं हसं करून घेतो.

सई०—जगाच्या रंगभूमीवरची ही सगळी सोंगं आहेत. बरं आता, आपलं हें सोंग केव्हां उतरणार ?

शिवा०—काम संपलं म्हणजे.

सई०—म्हणजे, अजून कांहीं काम शिल्लक आहे वाटतं ?—पण खरंच विचारते, आपण विजापुरांत असतांना नेहमीच्या रूपांत बेधडक फिरत होता, कधीं कोणी ओळखील म्हणून कपड्यांत सुद्धा एवढासा देखील फरक केला नाहीं; आणि याच प्रसंगीं तेवढं वेषांतर कां केलं ?

शिवा०—या प्रसंगीं म्हणजे कोणत्या ?

सई०—राजेसाहेबांना कोठडींत भेटतांना !

शिवाजी—बाबांना भेटायचं होतं म्हणूनच मला वेष पालटावा लागला. सई ! मी खरा कोण हें बाबांना कळतं तर बाबा आपल्या-बरोबर येतेना. निरनिराळ्या माणसांना निरनिराळा दिसावं एवढं सामर्थ्य देवाच्या कृपेनं मला लाभलं आहे. देह तुझ्या जवळ ठेऊन मी पुष्कळ वेळा त्या अंधार कोठडींत बाबांना पहायला गेलो. त्या स्थितींत मला तिथं जायला कृत्रिम भुयाराची जरूर लागली नाहीं; पण शरीरासुद्धां बाबांना तिथून आणायला चोरवाट करणं भाग पडलं. बाबांशीं प्रत्यक्ष बोलताना माझं मन माझ्या ताब्यांत राहणार नाहीं ! अशी मला भीती वाटली; आणि म्हणून मी वेषांतर केलं. या आयुष्यांत जर मी भ्यायलों असेन तर याच वेळीं.

सई०—याला कांहीं भिणं म्हणत नाहींत. मनःसामर्थ्यानं धारण केलेला वेष मनोवृत्तीच्या खळबळाटांत फुटून जाईल असं आपल्याला वाटलं!

शिवा०—एवढ्या करताच मला ही खबरदारी घ्यावी लागली. मी आणखी एका गोष्टीला भीत होतो. शहाजहानचा खलिता आला, हें मला कळलं मात्र मला धीर निघेना. शहाजहानच्या शहानं शहाजीराजे प्रथम सुटणार; आणि स्वतंत्रपणानं त्यांना मुक्त करीन; म्हणून मी केलेली प्रतिज्ञा फुकट जाणार, म्हणून मला चैन पडेना. माझा जीव धागधुग करीत होता.

सई–पण माझी मसलत तर फुकट गेली नाहींना ?

शिवा० ती जाणारही नव्हती. ती फुकट जाणं अशक्य होतं. सई! तुझी मसलत लागू पडली म्हणून मला अत्यंत आनंद झाला. पण तिची बजावणी होण्यापूर्वीच बाबांना सोडविण्याची जबाबदारी माझ्यावर येऊन पडली. तुझ्या माझ्या या राजकारणाच्या शर्यतींत तुझा जय झाला; पण माझा पराजय झाला असता तर मला तोंड वर करायला जागा राहती ना. पण तुझ्याबरोबर मलाही देवानं यश दिलं; आणि स्त्रीपुरुषाचा समान हक्क सर्व बाबतींत सारखाच आहे, हें सिद्ध झालं. आईला हें कळल्यावर केवढा आनंद होईल !–तूं एक कर. आईला गाठून तिच्याबरोबरच ठरलेल्या ठिकाणीं ये. मी मागोमाग आलोंच म्हणून समज. त्या दोन स्वारांना घेऊन तूं एकदम दौड कर.

सई०–आणि आपण एकटेच राहणार ?

शिवा०–एकटा राहिलों तर राहिलों. मनुष्य एकटा जन्माला येतो; आणि एकटाच परलोकीं जातोना ?–ती पहा तुझी घोडी आली. हो स्वार!

सई०—आज्ञा. (सईबाई जाते.)

शिवाजी—बाबांची सुटका होऊन त्यांचे प्राण वाचले ! जन्मदात्याच्या ऋणापैकीं मूळ मुद्दल तर परत झालं. आतां बाजीच्या डोक्याचं व्याज देऊन, सव्याज फेड झाली, कीं भरपाईची पावती मागायला काय हरकत आहे ! वडिलांचं मन प्रसन्न होऊन त्यांच्या मुखांतून निघालेली आबासकी हीच आमची पावती !

पद–(चाल–झांझरिया झमके०)

शांतिघना मानसा पथ हाचि पाहे । शंका न राहे ॥धृ०॥
जगतीं सुखाचा । हा मोक्ष साचा । अविरत मिळवि जयाशा ॥ १ ॥

(कानोसा घेऊन) घोडयाच्या टापा ऐकूं येत आहेत.—

अरे हा बाजी घोरपडे ! बरोबर स्वार घेऊन दौडत चालला आहे.— बाबांचा पाठलाग तर करीत नसेल ?—का माझा माग काढतो आहे ?— आठ-सोळा—चोवीस-पंचवीस ! पंचवीस स्वार आहेत बरोबर. सई म्हणते, मी एकटा. एकटा कशानं ? हा बाजी आणि हे पंचवीस स्वार एवढी सोबत काय थोडी झाली ? इतके जिवश्च कंठश्च स्नेही मिळाल्यावर मग काय ! माझी घोडी पहा थयथय नाचूं लागली. खात्रीनं जय !— जय जय भवानी ! हर-हर महादेव !

(जातो.)

प्रवेश ४ था.

स्थळ—पंढरपुर. शहाजीचा वाडा.

[तुकाबाई व व्यंकोजी.]

व्यंकोजी—आई, तूं रडूं नकोस.

तुका०—(रडत) बाळ, रडूं नको तर काय करूं ? रडण्यापाचून या जगांत मला काय आहे ? जितकी मी जास्त रडेन तितका माझा जीव हलका होईल. बाळ, कायरे करूं ? मी आतां या जगांत दिवस कसे कंठूं ? कुणाच्या जिवावर माझ्या चिमुकल्याचे लाड पुरवूं ?

व्यंकोजी—आई, बाबा येतील ग.

तुका०—कसले ते आतां येतात. ते केव्हांच हा लोक सोडून गेले असतील, पातशहा केव्हांच त्याना भिंतींत चिणून शांत झाला असेल. घर लुबाडलं, जहागीर जप्त केली, चीजवस्त लूटून नेली; आणि या जगांतला माझा जीव, माझा सौभाग्याचा दीप तोही मालवून टाकला. त्या चांदाला ग्रहण लावलं, त्याला पार निस्तेज केलं. अमावास्येच्या काळोखांत राहूकेतूंनीं त्याचा खून केला. (विश्वासराव येतो.)

विश्वा०—छोटे सरकार, आपण जरा इकडे या. बाहेर आपल्याला कुणी बोलवताहे.

तुका०— नका त्याला नेऊं बाहेर. चांडाळ नानातऱ्हेचीं ढोंगं करून त्याची माझी ताटातूट करतील.

विश्वा०— माईसाहेब, आपण काळजी करूं नका. हें विजापूर नाहीं, आपला स्वत:चा मुलूख आहे. मी आहे छोट्या सरकारांबरोबर. चला छोटे सरकार.

व्यंको०—हा आलों मी. (व्यंकोजी व विश्वास जातात.)

तुका०—(स्वगत) माझं म्हणणं आतां कोण मानतो ? शब्दांतलं सामर्थ्य गेल्यावर मांत्रिकांचा मंत्र निर्माल्यवत् होतो.

पद–(चाल–नहि दुमना०)

महिवरिं दीनां नाहि वाली । सुकता लता ना दे धरा जला ॥ धृ० ॥ विधि विरचनाधारि वनवासिं झुरता । कांचन प्रभुवरा तुज दया ॥ १ ॥

मी अनाथ झाल्यावर—पण मी सनाथ आहे कीं अनाथ आहे ? भीतीच्या गांगरण्यानं हें कल्पनेचं वैधव्य माझ्या भोंवतीं पसरलं आहे, कां राजांचा अंत होऊन मी खऱ्याखुऱ्या वैधव्यांत बुडालें आहें ? ही वैधव्याची लहानशी डुलकी आहे, कीं त्याचीं घोर निद्रा आहे ? निद्रेमध्यें पडणारं हें वैधव्याचं स्वप्न आहे, कां जन्मभर अनुभवाला येणारं त्याची जागती ज्योत आहे. ही वैधव्याची चिता आहे, कीं ज्वालामुखीचा स्फोट आहे ? चिता ! चिता ! चिता ! मी सती जाणार ! चितेमध्यें उडी घेऊन मी राजाबरोबर सहगमन करणार. पण राजांचा अंत झाला असेल कां ?—ही अनिश्चित स्थिति अत्यंत यातनामय आहे. सती जायला राजाच्या शवाचा जर मला लाभ झाला, पण होणार कसा ? त्यांच्या नशीबीं वीराप्रमाणं धारातीर्थी मरण नाहीं. मारेकऱ्याच्या हातून त्यांच्या शरीराचे तुकडे तुकडे होत नाहींत, परशत्रूप्रमाणं त्यांचा शिरच्छेद करण्याची त्यांना शिक्षा झाली नाहीं, अमानुषपणं त्यांचा वध होणार आहे. त्यांना भिंतींत चिणणार. त्यांना जिवंत समाधि देणार. दगडाविटांत

त्यांच्या पवित्र देहाला मुक्ति मिळणार. त्यांची ती गंभीर मुद्रा मला पुनः कशी दिसणार ? तें भव्य शरीर आतां मला कुठून पहायला मिळणार ? त्यांचा स्वर्गीय आत्मा— (शहाजी येतो.)

अगबाई, माझी इच्छा तृप्त करण्याकरितां आपण छायारूपानं मला भेटायला आलां कीं काय ? अंत होत असतांना माझी स्मृति झाल्यामुळं आपल्याला पिशाच्च योनींत पडावं लागलं कीं काय ? आपली या लोकची कांहीं इच्छा मी पुरी करावी; म्हणून मला दर्शन द्यायला आलां कीं काय ?

शहा०—तुकाऊ,-तुकाऊ-!

तुका०—बोला, बोला. सती जायला माझ्याकडून उशीर झाला; म्हणून मला आठवण द्यायला आलां कीं काय ?

शहा०—तुकाऊ, पिशाच्च दृष्टीला पडावं, तशी तूं बायचळूं लागली आहेस. मी मेलों नाहीं, माझा खून झाला नाहीं; आणि पिशाच्चरूपानं तुझ्या भेटीलाही मी आलों नाहीं. नीट माझ्याकडे पहा. हा तुझा शहाजीच तुझ्या पुढं उभा आहे.

तुका०—तर मग आपण जिवंत असायचं. पातशहानं आपल्याला सोडून दिलं कीं काय ?

शहा०—नाहीं. पातशहानं मला सोडून दिलं नाहीं. माझी शिक्षाही रद्द झाली नाहीं. माझा निरपराधीपणा सिद्ध करण्याची मला संधि मिळावी; म्हणून रणदुल्लाखानांनीं गुप्तपणानं मला इथं आणवलं आहे.

तुका०—तर मग आपला जीव अद्याप धोक्यांतच आहे. तरवारीच्या धारेवरच आपली मान अद्याप टेकली आहे. खानसाहेबांच्या प्रयत्नाला, देव यश देवो, आणखी परत मिघालेला हा माझा जीव मला अखंड लाभो.

पद—(चाल-अंबा हिमाचल)

किती रमावर अदय हा । न कधि उसंत शरणजनां दे ॥
विलासनिपुणा ॥ उदास रडवित । निराश जिवासि सदा

दे मान्य ॥ धृ० ॥ नरा विभवपरा ये विपदा । शमविन विजयमदा । सुखाविहृता विरति वितरि कैसी । शांति कांताधि ॥ १ ॥

शहा०—परवां रणदुल्लाखानांनीं अल्पकाळ कां होईना पण व्यंकूची आणि माझी भेट करवली; आणि आज तुझीही भेट त्यांच्याच कृपेनं मला लाभली. देवा, आम्हांला आतां खरोखरच एकमेकांपासून दूर करूं नकोस. (तुकाबाईस आलिंगन देतो, इतक्यांत व्यंकोजी येतो.)

व्यंको०—बाबा, खानसाहेब आले.

शहा०—कुठं ?

व्यंको०—हे पहा आलेच. (रणदुल्लाखान येतो.)

रण०—सलाम राजेसाहेब, सलाम-(भेटतात.) आपण इथं आहांत, असं कळतांच एकदम निघालों. आपल्यावरचं संकट दूर झालं. दिल्लीपत पातशहा शहाजहान यांनीं आपल्याला दसहजारी आणि हा पोशाख बहाल केला आहे.

शहा०—पण मी कैदी आहे. आमच्या सुलतानानी भिंतींत चिण-ण्याची मला शिक्षा फर्मावली आहे. माझ्या कबरीवर हा पोषाख घातला पाहिजे, आणखी हें दहा हजार सैन्य तिच्या रक्षणालाच ठेवलं पाहिजे.

रण०—राजेसाहेब, असं अमंगळ बोलूं नका. आपल्या दयाळु सुल-तानांनींही आपली शिक्षा रद्द करून आपल्याला कर्नाटकची जहागीर देऊन आपला इतमाम वाढवला आहे.

शहा०—मी स्वप्नांत तर नाहीं ? का दुनयेचा स्वर्ग झाला ? दैत्य देव झाले ? व्याघ्र सिंह गरीब गाय बनले ? पाखरं पाण्यांत बुड्या मारून तळाशीं जाऊन राहिलीं; आणि मासे आकाशांत संचार करूं लागले ?

रण०-अल्लाच्या अमदानींत अजब चिजा भरलेल्या आहेत. दुनि-येचा गारुडी हा एक एक तमाशा करून लोकांना झुलवतो आहे. राजे-साहेब, काल रात्रीं सांडणीस्वारानं आपल्या नांवाचा हा खलिता आणला.

(खलिता देतो.) हा खलिता पोंचल्यावर एका घटकेच्या आंत आपल्याला मुक्त करावं, आणि तावडतोब भेटीला घेऊन यावं, म्हणून सुलतानांचा मला हुकुम झाला. हुकूम होताच मी स्वतः, घोरपडे, आणि नबाबजादे आपलं अभिनंदन करण्याकरितां आपल्या कोठडींत आलों. नजराण्याची तबकं–

(देववान देतो.)

देव०—राजेसाहेब ! यह मेरा नजराणा. आपका जिगरके कंठके स्नेहीपर मेहेर नजर रखो.

शहा०—आपण या वेळीं आला नसता तर बरं झालं असतं.

देव०—छेः, मी आये बिगर कैसा राहीन. अशा बऱ्या प्रसंगीं मी गैरहजर राहिलों तर मी नबाबजादा कसला. मी आंब्याच्या डहाळ्यासारखा आहे. शुभाला आणि अशुभाला सारखा उपयोगी. आपल्याला कैद केलं तेव्हां मी आपल्याला शिव्या दिल्या. आतां सुलतानांनीं आपला बहुमान केला, मी आनंदप्रदर्शनाला आहेच तयार. मी पहिल्यापासूनच आपल्या पक्षाचा. या खानसाहेबांना ठाऊक आहे; आणि आपल्याला नाहीं कीं काय ?–हा तिळगुळ घ्या, आणि गोड बोला. (तिळगुळ देतो.) यदा आपली संक्रांत झाली अंधारकोठडींत, त्यामुळं नाइलाज झाला. माझ्या झोंपेवर संक्रांत आली त्यामुळं. पण आतां, फक्कड झालं ! घ्या खानसाहेब ! तीळ घ्या गुळ घ्या गोड बोला.

या कोण राणीसाहेब ?–आमच्या तुकाऊ राणीसाहेब ? आपण तर माझी पाठची बहीण ! एका आईच्या उदरांतून जन्माला आलों; म्हणून कुणाला वाटेल. घ्या, तीळ घ्या गुळ घ्या गोड बोला. गोड बोला समजलं ना ? गोड बोला बरं.

वाः—छोटे सरकार ! घ्या तिळगुळ. तुमच्या तोंडांत घालू का सका. तीळ घ्या गुळ घ्या गोड–

व्यंको०—हराम खोर !

पद —(चाल-हमारे मंको मोलिया०)

खला तुका तुलाचना । लोकिं या लोकिं या । लाविला कलंक कुला । भार तूं फार तूं भूतला ॥ धृ० ॥ वक्रगती कुटिल महा । प्रखर विषसमाचि अहा । शासन तुज हेंचि पहा । हात खा लाथ खा अमंगळा ॥ १ ॥

तुका०—मेल्या ! कर काळं इथून. काल माझी बखोटी धरून घरा बाहेर काढीत होतास, माझ्या डोक्यांत लाथ मारलीस; आणि आज गोड बोला काय ? थांब आतां तुला रडायला लावते.

शहा०—काय या हरमखोरानं तुला लाथ मारली ?

रण०—देवराव ! यहांसे फोरन चले जाव, नाहींतर आतां जूतेच खाल.

देव०—वाः, मै सबको तिळगुळ दिया और आप मैकूं जूते लगाते ?

शहा०—चल जा आतां. तूं इतका मीच आहेस कीं, मी तुझ्यावर राग करावा इतकी तुझी लायकीच नाहीं. निघ इथून.

व्यंको०—(देवरावच्या थोबाडींत मारून एक लाथ देऊन) हात खा लाथ खा चले जाव. (लाथा मारतो.)

देव०—सलाम अले. (पळत पळत जातो; व व्यंकोजीही त्याच्या मागें धांवतो.)

रण०—छोटे सरकार ! फिरा मागं. (व्यंकोजी परत येतो.) राजेसाहेब ! आपण त्या कोठडींतून इथं आलां कसे ?

शहा०—आपल्याच मनुष्यानं मला भुयारांतून बाहेर काढलं.

रण०—माझ्या मनुष्यानं ! मी तर मनुष्य पाठवला नाहीं.

शहा०—असं कसं. आपल्या स्नेह्यांपैकींच मी एक आहे, असं तो म्हणाला. त्याच्याबरोबर एक स्त्री होती.

रण०—बरोबर. आपल्या भेटीला आम्हीं आलों, तेव्हां ती स्त्री आम्हीं पाहिली खरी. बरोबर. ती भुयारांत शिरली.

शहा०—त्या स्त्रीला मी कुलस्वामीच समजतों.

(जिजाबाई व सईबाई येतात.)

शहा०—हीच ती स्त्री! जिजा! ही स्त्री तुझ्याबरोबर! बोल! बोल! ही स्त्री कोण.

जिजा०—ही आपली सून. (सईबाई शहाजीला, रणदुल्लाखानाला, तुकाबाईला व जिजाबाईला नमस्कार करते.)

शहा०—माझी सून!-मुली! तूं माझी सून!—खानसाहेब! ही माझी सून!- तुकाऊ! ही माझी सून!

जिजा०—माझी सून-माझी सून म्हणून अभिमान वाटण्यासारखे आपल्या सुनेचे गुण आहेत तर.

शहा०—खास आहेत. तिचा पराक्रम मी स्वत:च्या डोळ्यांनीं पाहिला आहे. त्याबद्दल प्रश्नच नाहीं.

जिजा०—राजेसाहेब! आपण मुत्सद्दी आहां. मलिकंबर, चतुर साबाजी, यांच्या तोडीचे राजकारणी म्हणून लोक आपल्याकडे बोट करतात; म्हणून मी आपल्याला एक प्रश्न करते. याच वेळीं, नेमक्या याचवेळीं दिल्लीच्या शहाजहानकडून खलिता आणि दसहजारी; कशी आली? शहाजहानच्या धास्तीनं विजापुरचे सुलतान गडबडले आणि कर्नाटकची जहागीर आपल्या नांवें करून त्यांनींही सारवणी केली, आणि सगळ्यांच आनंद झाला; पण सगळ्या मुलखाचा जुलमी शहाजहान राजांबद्दलचा द्वेष विसरून, याच वेळीं एवढा उदार कसा झाला?

शहा०—खरोखरच हें आश्चर्य आहे. मघापासून दहा वेळां हा प्रश्न माझ्यासमोर आला; पण गडबडींत मला विचारतांच येईना. खान-साहेब! आपल्याला काय वाटतं या बाबतींत?

रण०—अल्लाची ही करामत आहे. सज्जनाच्या छळाच्या वेळीं तो असाच एखादा वाली उत्पन्न करीत असतो.

तुका०—काळावेळा गांठ पडली.

शहा०—या प्रसंगीं काळ आला होता; पण वेळेची गांठ पडली नाहीं. माझी अक्कल मुळीच चालत नाहीं या वेळीं.

जिजा०—कुणी तरी मांत्रिकानं शहाजहानचं भूत सुलतानावर घातलं असं नाहीं वाटत आपल्याला ?

शहा०—हो वाटतं ! तो मांत्रिक कोण असावा बरं ?

जिजा०—शिवाय पण त्या मांत्रिकाला तरी देवीच्या दृष्टांतावाचूनहीं सिद्धि थोडीच साधणार होती ? ही मसलत-राजेसाहेब ! आपल्या सुनेची. आपल्या मुत्सद्दीबाण्याला साजेशी सून आपल्याला लाभली आहेना ?

शहा०—मुली ! मी काय बोलूं ? तेंच मला समजत नाहीं. राजकारणांत माझ्या काळ्या केसाचे पांढरे केस झाले; पण असली बिनतोड मसलत आपल्याला कांहीं सुचली नाहीं. (पडद्यांत-" धांवा धांवा मला वाचवा " असें बाजी घोरपडे ओरडतो.)

रण०—हा काय चमत्कार ! (पुन्हां आंत-" धांवा धांवा मला वांचवा.)

शहा०—हा घोरपड्याचा आवाज ! (उठतो.)

रण०—खास त्याचाच. (सर्व उठतात. वेषांतर केलेला शिवाजी बाजी घोरपड्याला फरफटीत आणतो; व शहाजीच्या समोर आदळतो.)

बाजी०—माझे प्राण वांचवा ! कुणी तरी माझे प्राण वांचवा !

शिवा०—प्राण वांचवा ! प्राणाची किंमत तुला आतां तरी कळली का !

बाजी०—कळली-कळली.

शिवा०—राजेसाहेबांना भिंतींत गाडतांना तुला ती कळली नव्हती. स्वत:च्या भाऊबंदाचा बळी देतांना तुला ती कळली नव्हती. आपल्या आईबहिणीच्या कपाळचं कुंकु पुसतांना तुला ती कळली नव्हती.

बाजी०—खानसाहेब ! माझे प्राण वाचवा. तुम्ही तरी माझे प्राण वाचवा.

रण०—(शिवाजीस) सरदारसाहेब ! आपण कुणी परोपकारी पुरुष दिसता. शहाजी राजांना भिंतीत गाडताना आपण अचानक आलात; आणि अलोट पराक्रम करून त्यांची सुटका केलीत, असं आतांच हे म्हणाले. आपले राजेसाहेबावर आणि आमच्यावर अत्यंत उपकार झाले आहेत.

शिवाजी—यांत उपकार कसले ? माझं कर्तव्य मी केलं.

शहा०—हा आपल्या मनांचा थोरपणा आहे. माझे प्राण तर आपण वाचवलेच; पण त्याशिवाय आपण माझ्या शत्रूस गिरफदार करून मला ऋणी केलं. पुत्र सुद्धा आपल्या बापाकरता एवढं साहस करणार नाहीं.

शिवाजी—पण एखादा पुत्र तरी करील का ?

शहा०—एखादाच करील-खास करील. माझा शिवबा माझ्याकरता असलं साहस खास करील.

शिवाजी—पण या वेळीं तर त्यानं केलं नाहीं ना ?

शहा०—तुम्ही हें साहस केलेलं मी प्रत्यक्ष पाहिलं नसतं, तर ही माझ्या शिवबाचीच कृती, असं मी बेधडक म्हटलं असतं.

शिवाजी—कारण ?

शहा०—कारण, असला भयंकर साहसी पुरुष या महाराष्ट्रांत फक्त एकच आहे, आणि तो माझा लाडका शिवबा !

शिवाजी—(वेष काढून) अहाहा ! बाबा ! तोच मी आपला शिवबा पितृ ऋणाची फेड करण्याकरतां आपल्या शत्रूला—या बाजी घोरपड्याला इथं घेऊन आलों आहे. शंकराच्या इच्छेमुळं वीरभद्रानं दक्षप्रजापतीचं शीर तोडलं त्याप्रमाणं आपली इच्छा पूर्ण करण्याकरतां या हरामखोराचं डोकं मी धडापासून वेगळं करतो. (बाजीची मुंडी धरतो व त्याला बसवतो.)

शहा०—(शिवाजीचा हात धरून) थांब. शिवाजी याचं डोकं उडवूं नकोस हां. सूड घ्यायचं कारण नाहीं.

शिवा०—कारण नाहीं, ती पहा माझी आई आली. (जिजाबाई येते.) हिच्या नेत्रांतल्या एका अश्रुबिंदूकरतां मी याचा वध करतो आहे. आईच्या नेत्रांतला एकच दुःखाश्रु जगाचा प्रलय करायला पुरेसा आहे.

पद—(चाल-मूजद जनकनाथ.)

ये जगिं प्रलयकाल । माता क्षोभें मनिं तरि ॥ धृ० ॥
सुतनय तोचि असे । मातृव्रत पाळितसे । उद्धरिता
भूमाता । अनुभव दे ताता ॥ १ ॥

रण०—शिवाजी ! हा पातशाही सरदार आहे. हरामखोर असला तरी माझा भाई आहे. तुझ्या पाया पडतो. माझ्यासमोर याला मारूं नकोस. (गुडघे टेकतो.)

शहा०—पुत्र असलास तरी आजपासून तूं माझा परमेश्वरच आहेस. याचा सूड घ्यावा, अशी माझी इच्छा आहे; पण या आनंदाच्या वेळीं रक्तपात करूं नकोस, एवढं माझं मागणं आहे. जिजाऊ ! तूं—

जिजा०—बाळ ! जगाच्या कल्याणाकरतां रामानं रावणाचीं दहाहि तोंडं तोडलीं. परशुरामानं सहस्रार्जुनाचे हात उतरले. कृष्णानं कंसाचे केस धरून त्याला कंठस्नान घातलं. महाराष्ट्राच्या कल्याणाकरितां तूंहि लागेल तितके बळी घे. सध्यांचा प्रसंग घरगुती आहे. वडिलांच्याकरतां कां होईना; पण एका व्यक्तीकरितां तूं हा सूड घेतलास; असं नको व्हायला. पुन्हः प्रसंग येईल. शिशुपालाप्रमाणं त्याचे शंभर अपराध पूर्ण होऊं दे.

शिवा०—आई, तुझी आज्ञा मला प्रमाण आहे. बाजी ! तुझी पुण्याई आज या माझ्या मातेच्या रूपानं मला आवरून धरायला उभी राहिली. तिच्या पायावर मस्तक ठेव; आणि या मुलाच्या पाया पडून त्याची क्षमा माग. धर पाय. (बाजी घोरपडे त्याप्रमाणें करतो.) जा. आतां एकदम चालता हो. (बाजी घोरपडे जातो.) बाळ व्यंकू ! बाबांची तुझी भेट झाली ना ? खानसाहेब ! आपली भिक्षा आपल्याला मिळाली ना ?

रण०—शिवाजी ! शाबास-शाबास. तूंच म्हणून आज हा दिवस दाखवलास ! केवढं प्रचंड काम केलंस !

शिवा०—खानसाहेब ! प्रथम मी एकटा या कार्याला निघालों होतों; पण मी एकटा काय करणार होतों ? हा तानाजी, हे विश्वासराव जर माझ्या सहायाला नसते तर काय झालं असतं.

विश्वा०—जें आतां झालं, तेंच झालं असतं. महाराज ! या पायांची जन्मोजन्म सेवा घडावी; आणि त्याकरतां प्राण खर्ची घालावे; एवढया-साठींच आमचा जन्म आहे.

ताना०—महाराष्ट्राकरितां आपल्या बहुमोल प्राणावर उदार होऊन, जो असली धाडसाचीं कृत्यं करतो, त्याच्याकरितां हे देह पडले तर त्यांत पुण्यच आहे.

शिवा०—तानाजी ? माझ्यासारख्या क्षुल्लक व्यक्तीकरितां देह पड-ण्यापेक्षां महाराष्ट्रांतल्या एकेका खडयाकरितां एकेक मराठा बळी पडला तर त्यांत भाग्यच आहे.

शहा०—महाराष्ट्राकरितां मृत्यूचं वाण घेणाऱ्या वीरांचे जीव माझ्या-करितां संकटांत पडावे, याबद्दल मला लाज वाटते. शिवबा !

शिवा०—बाबा ! हें पितृऋण आहे, याची फेड करून घ्या, आणि महाराष्ट्राच्या ऋणांतून मुक्त व्हायची मला परवानगी द्या. बाबा ! आपलं ऋण फिटलंना ?

शहा०—फिटलं-सव्याज फिटलं ! उलट मी मात्र सर्वांचा ऋणी झालों. या माझ्या सुनेच्या ऋणांतून मी कसा मुक्त होईन देव जाणे !

सई०—माझं कसलं ऋण ! वडिलांच्या ऋणांतून मुक्त होण्याकरितां पतीनं आरंभलेल्या कार्याचा अर्धा भाग अर्धांगीनं उचलला; यांत तिनं विशेष काय केलं ?

शहा०—मुली ! तुझं कौतुक करावं तेवढं थोडंच आहे. तुला मी माझ्या डोकीवर घेऊन नाचलों, तरी माझ्या मनाचं समाधान होणार

नाहीं. तुझी वाहवा करावी तेवढी थोडीच आहे. मुली ! ये-ये मला तुझे मुके घेऊं दे. (तिचे मुके घेतो.)

तुका०-शिवबा ! मी तुझी क्षमा तरी कोणत्या तोंडानं मागूं ? आमच्या हाडींमासीं खिळलेल्या सवतीमत्सरानं अंध झाले होते, पण अचानक हें अंजन पडून माझी दृष्टि साफ झाली. बाई, मी लहान लेंकरूं आहे, मला क्षमा करा. मुली ! तुझ्या कर्तबगारीमुळं मला माझं सौभाग्य मिळालं. तूं महा-साध्वी आहेस. तुझ्या पायाची धूळ मस्तकावर घेऊन देखील तुझे उप-कार फिटणार नाहीत.

जिजा० मुली ! आज मी खरोखर धन्य झाले. शिवबा ! माझ्या आजपर्यंतच्या श्रमाचं सार्थक झालं. माई ! तुमचा माझ्या शिवबावर आतां शब्द राहिला नाहींना ?

शहा०-आईच्या शिस्तीचा प्रभाव असा आहे.

रण०-हा पुत्र बनवणारी माता हीच.

जिजा०-आणि या पुत्राला ही जन्म देणारा पिता हाच. मातेचं कर्तव्य माता करते यांत नवल नाहीं, पण पुत्रानं त्याचा उपयोग करून घेतला पाहिजे. पत्नीचं कर्तव्य पत्नीनं केलं तर आश्चर्य नाहीं, पण पतीनं त्याचं चीज केलं पाहिजे. देवाच्या कृपनें मला तसा पुत्र मिळाला; आणि शिवबालाही तशीच पत्नी लाभली. शिवबा ! तुझ्या पितृभक्तीची आज परीक्षा झाली.

शिवा०-आई ! तुझ्या शिक्षणाचा हा सगळा प्रताप आहे. तूंच मला पितृभक्तीचे धडे दिलेस. बाबांचा माझा विरोध राजकारणापुरता. त्यामुळं आतड्याचा संबंध थोडाच तुटतो. मला पितृद्रोही म्हणून नांवं ठेवणारांनीं हें लक्ष्यांत ठेवावं, कीं देशहिताच्या आड न येणारी बाबांची प्रत्येक आज्ञा पाळायला, मी केव्हांही तयारच आहें. आमचे मार्ग भिन्न असतील, पण त्यामुळं आमच्या एकमेकांवरच्या प्रेमांत कधीं अंतर

पडायचं नाहीं. फार तर काय, पण राजकारणांवरून उद्यां आम्हां दोघांत या शहाशिवाजीमध्यें जरी युद्धाचा प्रसंग आला; आणि बाबांच्या हातांतल्या तरवारीनं जरी माझी गर्दन काटली गेली, तरी माझं शिर बाबांच्याच पायांशीं पडेल, आणि माझं धड पितृभक्तीचं भजन गात त्यांच्याच समोर उभं राहील.

भरत वाक्य—(चाल–माधवा माधवा माधवा.)

भारता! भारता! भारता ! । सरल सबल सुत सोज्ज्वल ।
तव मोचन मनिं वांछित । अखंड । जमले नर अपार । द्याया
ऋण तातचरणिं जिता ॥ धृ० ॥ देशमुक्तिलाभातुर ।
पोहति हे पैलपार। स्वातंत्र्य क्षीरोदधितिरिं ॥जमले नर०॥

(पडदा पडतो.

समाप्त.